नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५५ * अंक १७७ * ** नागपूर ** * शनिवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

## खरीखरी..

## सर्वे भवन्तु सुखिनः ...

आज बिहार मधील ७५ लाख महिलांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपये जमा झालेले आहेत. गेल्या दीड दोन वर्षाच्या कालावधीमध्ये आणि निवडणुकीच्या तोंडावर आधी मध्य प्रदेशांमध्ये लाडक्या बहिणींना प्रसन्न केले गेले. त्यानंतर महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना पात्रता आणि अपात्रता न पाहता धडाधड चार-पाच महिन्यांचे साडेसात हजार रुपये देण्यात आले, आता तोच प्रयोग बिहारमध्ये करण्यात येत आहे. बिहार नावाच्या राज्याजवळ या बहिणींना देण्यासाठी एवढे पैसे नसतीलच म्हणून त्यांना मदत करण्यासाठी खुद्द पंतप्रधान अक्षरशः धावून आलेले आहेत. देशातील बहिणी इतक्याच लाडक्या आहेत तर इतर राज्यांच्या बहिणींनाही अशीच भेट देण्यास काय हरकत आहे? ज्या ज्या राज्यात निवडणूका आहेत, त्या त्या राज्यांना निवडणुकीच्या तोंडावर आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी अशी रक्कम देण्याचा पायंडा पाडला तर याची किती किंमत मोजावी लागेल याचाही हिशेब सरकारसह सर्वसामान्यांनी केलाच पाहिजे. महाराष्ट्र त्यातल्या त्यात सधन राज्य आहे म्हणजे अशी महाराष्ट्राची आधीपासूनच कीर्ती आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या मदतीला केंद्र धावून आलेच नव्हते, कारण महाराष्ट्राने स्वतःच्या बळावर ती रक्कम प्रदान केली. आता तो प्रवाह सुरू झाल्यापासून आपल्या सधन राज्यालाही वचनपूर्ती करताना धन वाचवण्यासाठी सधन विचार करावा लागत आहे. हाच पायंडा इतर राज्यांनी अवलंबला तर संबंधित राज्य आणि केंद्र सरकार यांच्यावर जो आर्थिक ताण पडेल तो काळजी करण्यासारखा नाही असे आपण समजले पाहिजे. आता जे सरकार सत्तेवर आहे त्या सरकारने येणकेण प्रकारेण सत्तासुंदरी आपल्याला कसेही करून आपले वरण करील म्हणजेच वरेल आणि स्वीकारेल याबाबतची युक्ती त्यांना सापडलेली आहे. भारतात आता हा नवा रिवाज सत्ताधारी पक्षांकडून सुरू झालेला आहे, विरोधी पक्षांना केवळ आश्वासने देता येतात. दिलेली आश्वासने पाळलीच पाहिजेत असे कुठे लिहिलेले आहे? तसे तर आपल्या देशातील ८० कोटी जनतेला पाच किलो अन्नधान्य मिळते इतर अनेक माध्यमांमधून बाकीचे फायदे मिळतात. मग पोट भरण्यासाठी आवश्यक ते सर्व मिळाल्यावर नोकरी धंदा करण्याची काय गरज आहे. आपल्या देशात बेरोजगारी आहे हे म्हणणे अक्षरशा धादांत खोटे आहे असे आम्ही छातीठोकपणे सांगू शकतो. सामान्य जनतेला दोन वेळच्या जेवणाशिवाय इतर गरजा भागवण्यासाठी धान्याबरोबर जे धन लागते. ते धन कधी राज्याच्या तर कधी केंद्राच्या कृपेने मिळाल्यावर त्यांना किती आनंद होत असेल याचे मोजमाप करणेही शक्य नाही. देशातील ६० ते ७० टक्के जनता एवढे मिळाले तरी त्यामध्ये सुखच मानते. उरलेल्या ३० ते ४० टक्क्यांपैकी अतिश्रीमंत, गर्भश्रीमंत, नवश्रीमंत, किंचित श्रीमंत आणि लघु श्रीमंत असे १५ ते २०% लोक असतील. सरकारी नोकरीतील व इतर मोठ्या आस्थापनांमधील किंवा इतर उद्योगपतींकडे अशी मंडळी साधारणपणे १०% असेल. मग उरलेल्या १० ते २० टक्के जनतेची काळजी करण्याचे कारणच नाही. या लोकांना कितीही दिले तरी ते असंतुष्ट असतात आणि असंतुष्टच राहतील आणि हे असले असंतुष्ट मनोवृत्तीचे लोक समाजात केवळ नकारात्मक विचार फैलावतात. मग अशावेळी त्याला खोडून काढण्यासाठी थोडासा खर्च केला म्हणजे सर्व समस्या आपोआपच लुप्त होतात किंवा हळूच गुप्त होतात. आपल्या मायबाप सरकारने जनतेची इतक्या मोठ्या प्रमाणावर सेवा करण्याची जी जबाबदारी स्वीकारली आहे. तशीच जबाबदारी जगातील कोणत्याही देशाने स्वीकारलेली नसेल. त्यामुळेच या कल्याणकारी योजनांचा आपण सारे मिळून उदोउदो करूया. अशाच प्रकारे जनसेवा अनंतकाळ करीत रहा, एवढ्या शुभेच्छा आपण आपल्या मताने सरकारला दिल्याच पाहिजेत. ज्या ज्या भगिनींना दहा/दहा हजार रुपये मिळाले आहेत त्यांचे त्यांचे आपण सर्वांनी आपल्याच मताने जबरदस्त अभिनंदन केलेच पाहिजे. ही लोकाभिमुखता जगातील इतर देश का दाखवीत नाहीत आणि हा भारताचा आदर्श आपल्यासमोर का ठेवीत नाहीत. हे कोडे आज तरी आम्हाला उलगडत नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## राज्यातील आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी
# एनडीआरएफमधून मदत

### गृहमंत्री अमित शहा यांना निवेदन सादर



### भरघोस मदतीचे आश्वासन



*राज्यातील पूर परिस्थिती पाहता पूरग्रस्तांच्या मदतीसाठी केंद्र सरकारने भरीव मदत करावी, या मागणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीत पंतप्रधानांनी भरघोस मदतीचे आश्वासन दिले असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर देखील निशाणा साधला.*

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**
राज्यात विशेषतः मराठवाड्यात यंदा पावसामुळे धुमाकूळ घातला आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांत यंदा अतिवृष्टी झाली असून, त्यात अमाप नुकसान झाले आहे. विशेषतः त्यात जवळपास ८४ जणांचा बळीही गेला आहे. त्यामुळे विरोधी पक्षांनी सरकारकडे हेक्टरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने अतिवृष्टी व महापुरात मृत्यू झालेल्या मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे मुंबईत आले असता त्यांच्याकडे देखील मदतीची मागणी मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. ते म्हणाले, महाराष्ट्रात झालेली अतिवृष्टी आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान याबाबत एक सविस्तर निवेदन गृहमंत्री अमितभाई शाह यांना दिले.

एनडीआरएफमधून भरीव मदत महाराष्ट्रातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी देण्यात यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली. अमित शहा यांनी देखील आपत्तीत सापडल्या शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन दिले.

## एकाच गावात एकाच आठवड्यात
# दोन शेतकरी आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी**
**महागाव/यवतमाळ, दि. २६ :**
महागाव तालुक्यातील दहिसावळी या लहानशा गावात एकाच आठवड्यात दोन तरूण शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यामुळे समाजमन सून्न झाले आहे.





दहिसावळी येथे २१ सप्टेंबर रोजी विपुल घोरपडे नामक शेतकऱ्याने आत्महत्या केली, या आत्महत्येची शाई वाळते न वाळते तोच बुधवार २४ सप्टेंबर रोजी त्याच दहिसावळी गावातील नामदेव बाबाराव बावणे या शेतकऱ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

यवतमाळ जिल्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी कुप्रसिद्ध आहे. कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ, कर्जाचा डोंगर, नापिकी, उत्पादनाला मिळणारे अत्यल्प दर अशा कारणांनी आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे.

बावने कुटुंब अल्पभूधारक आहे. त्यांच्यावर बँकेचे कर्ज आहे. त्यातच अतिवृष्टीमुळे संपूर्ण शेती खरडून गेली आहे. बँकेचे कर्ज कसे फेडायचे या चिंतेने ग्रस्त असल्यामुळे त्याने आत्महत्या केली.

यापूर्वी २१ तारखेला विपुल घोरपडे या शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्यावेळी तहसीलदार अभय मस्के यांनी त्यांच्या घरी साधी भेट दिली नाही लोकप्रतिनिधी, मंत्री सतत सांगत आहेत की सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशीच...पण, एका आठवड्यात एका गावात दोन आत्महत्या होत असताना अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी ढुंकून बघण्यास तयार नाही. उमरखेड महागाव विधानसभा मतदार संघाचे आमदार किसन वानखडे व खासदार हे केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत.

या परिसरात दोन वर्षात ८५ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. तरीही प्रशासनाला जाग आली नाही, ८५ पैकी फक्त ४० आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला मदत देण्यात आली. बाकी प्रकरणे धूळ खात पडून आहेत.

## बिहारच्या ७५ लाख महिलांना
# प्रत्येकी १०-१० हजार

### मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेचा शुभारंभ

■ **वृत्तसंस्था, पटना, दि. २६ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमध्ये मुख्यमंत्री महिला रोजगार योजना सुरू केली. पंतप्रधानांनी ७५ लाख महिलांच्या खात्यात प्रत्येकी १०,००० रुपये ऑनलाइन ट्रान्सफर केले.



जीविका दीदींना संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले, 'जर देशाने जन धन योजनेअंतर्गत ३० कोटींहून अधिक माता आणि भगिनींची खाती उघडली नसती, तर आज आपण इतके पैसे थेट तुमच्या खात्यात पाठवू शकलो असतो का? आज पाठवलेले पैसे तुमच्या खात्यात पूर्णपणे जमा होतील. कोणीही एक पैसाही चोरू शकत नाही. पूर्वी, योजनेचे निधी तुमच्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच चोरीला जात होते.

पंतप्रधान म्हणाले, आज आपल्या मुली मोठ्या संख्येने सशस्त्र दलात आणि पोलिसात सामील होत आहेत. आज आपल्या मुली लढाऊ विमाने उडवत आहेत. बिहारमध्ये राजद सत्तेत असतानाचे दिवस आपण विसरू नये. बिहारी कुटुंबातील मातांना अराजकतेचा फटका सहन करावा लागला. त्या वेळी रस्ते, पूल आणि कल्व्हर्ट अस्तित्वात नव्हते आणि या परिस्थितीचा त्रास महिलांना सहन करावा लागला.

राजदच्या राजवटीत बिहारमध्ये भीतीचे वातावरण होते. आज, नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली कायद्याचे राज्य परत आले आहे आणि महिलांना सर्वात जास्त दिलासा मिळाला आहे.

## सरकारी तसेच निवृत्त महिलांनी घेतला लाडकी बहीणचा लाभ

### ८ हजारांपेक्षा अधिक महिलांकडून १५ कोटी वसूल करणार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**
लाडकी बहीण योजनेनुसार फक्त वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या महिलांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. सरकारी कर्मचारी किंवा निवृत्त कर्मचारी यांना या योजनेतून लाभ घेण्यास स्पष्ट मनाई आहे. तरीही काही महिलांनी शासनाची फसवणूक केली.

महिला व बालकल्याण विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मदतीने अशा सर्व बोगस लाभार्थींची यादी तयार केली आहे. या यादीत जिल्हा परिषदेतील कर्मचारी, शिक्षक, शासकीय महिला कर्मचारी तसेच निवृत्त कर्मचारी अशा ८ हजारांपेक्षा अधिक महिलांचा समावेश असल्याचे समोर आले आहे.

सध्या गैरप्रकार करणाऱ्या लाभार्थी महिला कर्मचाऱ्यांची संख्या ८ हजारांपेक्षा अधिक असल्याचे उघड झाले आहे. यामुळे प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

या गैरप्रकारानंतर वित्त विभागाने तत्काळ कारवाईची तयारी केली असून, सुमारे १५ कोटी रुपयांची रक्कम वसूल करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.

ही वसुली दोषी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून किंवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमधून टप्प्याटप्प्याने तसेच काही प्रकरणांत एकरकमी पद्धतीने केली जाणार आहे. यासाठी वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि महिला व बालकल्याण विभाग यांच्यात समन्वय साधला जात आहे.

## सोनम वांगचुक यांना अटक

■ **वृत्तसंस्था, लेह, दि. २६ :**
दोन दिवसांपूर्वी लेहमध्ये झालेल्या हिंसाचारासाठी सरकारने त्यांना जबाबदार धरल्यानंतर लडाखी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना शुक्रवारी अटक करण्यात आली. तथापि, त्यांना कोणत्या प्रकरणात अटक करण्यात आली हे कळलेले नाही.



२४ सप्टेंबर रोजी झालेल्या हिंसाचारानंतर लेहमध्ये सलग तिसऱ्या दिवशी कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. शाळा आणि महाविद्यालये शनिवारपर्यंत बंद आहेत.

लेहमध्ये पूर्ण राज्याचा दर्जा आणि सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश करण्याच्या मागणीसाठी झालेल्या निदर्शनादरम्यान हिंसाचार उसळला. यात चार तरुणांचा मृत्यू झाला आणि ४० पोलिस अधिकाऱ्यांसह ८० जण जखमी झाले. आतापर्यंत ६० आरोपींना अटक करण्यात आली आहे.

गृह मंत्रालयाने वांगचुक यांच्या संस्थेचा, स्टुडंट्स एज्युकेशनल अँड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाख परकीय निधी परवाना रद्द केला आहे. परदेशी अनुदान किंवा देणग्या मिळविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना परकीय योगदान (नियमन) कायद्याअंतर्गत नोंदणी करणे आवश्यक आहे.

## मिग - २१ लढाऊ विमान 'रिटायर्ड'

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :**
भारतीय हवाई दलाचा कणा मानल्या जाणाऱ्या मिग-२१ विमानाला शुक्रवारी निवृत्ती देण्यात आली. चंदीगड हवाई तळावर या लढाऊ विमानाला निरोप देण्यात आला. विमानाची सेवा आज अधिकृतपणे संपली.

निरोप समारंभात हवाई दल प्रमुख ए.पी. सिंह यांनी २३ स्क्वॉड्रनमधील सहा विमानांसह शेवटचे उड्डाण केले. स्क्वॉड्रन लीडर प्रिया शर्मा यांनीही फ्लायपास्टमध्ये भाग घेतला. १९६३ मध्ये चंदीगडमध्ये या विमानाचा हवाई दलात समावेश करण्यात आला.



६२ वर्षांच्या सेवेदरम्यान, सुपरसॉनिक मिग-२१ ने १९६५ च्या भारत-पाक युद्धात, १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धात, १९९९ च्या कारगिल युद्धात आणि २०१९ च्या बालाकोट हवाई हल्ल्यात महत्त्वाची भूमिका बजावली. हे भारताचे पहिले सुपर सॉनिक जेट होते, म्हणजेच ते ध्वनीच्या वेगापेक्षा (३३२ मीटर प्रति सेकंद) वेगाने उडू शकते. आता ते तेजस एलसीए मार्क १ ए ने बदलले जाईल.

मिग-२१ च्या निवृत्ती समारंभाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख आणि संरक्षण मंत्रालयाचे अनेक अधिकारी उपस्थित होते.

## एमपीएससीची परीक्षा रद्द

■ **मुंबई, दि. २६ :**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यातील पूरस्थितीमुळे येत्या २८ सप्टेंबर रोजी होणारी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा लांबणीवर टाकण्याची घोषणा केली आहे.

आयोगाच्या निर्णयानुसार, आता ही परीक्षा ९ नोव्हेंबर रोजी घेतली जाईल. आयोगाने आज जारी केलेल्या एका शुद्धिपत्रकाद्वारे हा निर्णय कळवला आहे.

## समान नागरी कायदा काळाची गरज

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :**
दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी देशात समान नागरी संहिता लागू करण्याची बाजू मांडली. न्यायालयाने असे नमूद केले की पर्सनल लॉ बालविवाहाला परवानगी देतो, परंतु पोक्सो कायदा आणि बीएनएस त्याला गुन्हेगार ठरवतात. या कायद्यांमधील वारंवार होणारे संघर्ष लक्षात घेता, स्पष्ट कायदेशीर व्याख्या आवश्यक आहे.

न्यायमूर्ती अरुण मोंगा यांनी विचारले की, बऱ्याचदा आपल्याला असा पेच पडतो की, दीर्घकाळापासून चालत आलेल्या पर्सनल लॉ चे पालन केल्याबद्दल समाजाला गुन्हेगार ठरवावे का? पर्सनल लॉसारखे कायदे राष्ट्रीय कायद्यांना मागे टाकू नयेत म्हणून एक चौकट तयार करून, यूसीसीकडे वाटचाल करण्याची वेळ आली आहे का? अल्पवयीन मुलीशी लग्न केल्याचा आरोपी हामीद रझा याच्या जामीन अर्जाशी संबंधित प्रकरणावर ही सुनावणी झाली.

## आरक्षणाच्या लढाईत ओबीसींचाच विजय

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**
राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा आरक्षणाच्या लढाईत ओबीसींचाच विजय होणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.



दलित, आदिवासी व ओबीसी हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या व संसदेने मंजूर केलेल्या संविधानाच्या पोटचे घटक आहेत. त्यामुळे कायद्याच्या लढाईत आमचाच विजय होईल. आम्ही आमचे आरक्षण टिकवण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करणार आहोत, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी ओबीसी बांधवांना आत्महत्येसारखे पाऊल न उचलण्याचेही आवाहन केले.

ओबीसी आरक्षणासाठी राज्यात दररोज कुठे न कुठे आत्महत्या होत आहे. या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना ओबीसी बांधवांना आत्महत्या न करण्याचे आवाहन केले. कुणीही काळजी करू नका. आत्महत्या करण्याच्या वाटेला तर अजिबात जाऊ नका, असे ते म्हणाले.

## ५ हजार रोख, ५ किलो गहू, ५ किलो तांदूळ, पुरेसे नाही...

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६ :**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्त भागांचा दौरा करताना परिस्थितीची थेट माहिती घेतली. त्यांनी सांगितले की, कालही मी त्या भागात होतो आणि तिथे अजूनही पाऊस सुरू होता. अनेक नागरिक असुरक्षित ठिकाणी थांबले होते, त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सैन्य, एनडीआरएफ आणि प्रशासनाच्या मदतीने हेलिकॉप्टरद्वारेही सुटका करण्यात आली आहे.



या संदर्भात अजित पवार म्हणाले की, प्रशासन पूर्णपणे बचावकार्य आणि मदतकार्यात गुंतले असून, पुरामुळे घरं उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांना ५ हजार रुपये रोख मदत, तसेच ५ किलो गहू आणि ५ किलो तांदूळ यांसह आवश्यक धान्य उपलब्ध करून दिले जात आहे. मात्र त्यांनी याचबरोबर एक गंभीर मुद्दा मांडला, ज्या कुटुंबांचे घरातील सामान, संसारोपयोगी वस्तू पाण्यात वाहून गेल्या आहेत. त्यांची तात्पुरती सोय शाळा आणि इतर ठिकाणी केली आहे, पण जेव्हा ते घरी परततील तेव्हा त्यांना आणखी मदतीची गरज भासेल.

अजित पवार यांनी सांगितले की, पूरग्रस्त कुटुंबांना मिळणारी १० किलो धान्याची मदत अपुरी आहे. या कुटुंबांचा संसारच उद्ध्वस्त झाल्याने त्यांना अतिरिक्त मदतीची गरज आहे. त्यामुळे त्यासाठी अधिक तरतुदीची मागणी करण्यात येत आहे. यासोबतच केंद्र सरकारचेही त्यांनी लक्ष वेधले. काल गृहमंत्री अमित शहा मुंबईत आले होते. त्यांच्याकडेही आम्ही अतिरिक्त मदतीची मागणी केली आहे.

## पुन्हा एकदा भिडणार
# भारत - पाकिस्तान

### आतापर्यंत १२ वेळा किताबी सामन्यात भिडले

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**
पाकिस्तानने बांगलादेशला हरवून आशिया कप २०२५ च्या फायनलमध्ये प्रवेश केला. भारत बुधवारीच फायनलसाठी क्वालिफाय झाला होता. आता हे दोन्ही संघ २८ सप्टेंबर रोजी दुबई येथे होणाऱ्या पहिल्या आशिया कपच्या अंतिम फेरीत एकमेकांसमोर येतील. टीम इंडियाने ग्रुप स्टेज आणि सुपर ४ दोन्ही फेऱ्या जिंकल्या.




आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील एखाद्या स्पर्धेच्या किंवा तिरंगी मालिकेच्या अंतिम फेरीत भारत आणि पाकिस्तान आमनेसामने येण्याची ही १३ वी वेळ असेल. मागील १२ सामन्यांमध्ये पाकिस्तानने आठ वेळा विजय मिळवला, तर भारताने फक्त चार वेळा. दोन्ही संघ शेवटच्या वेळी २०१७ च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत जेतेपदासाठी भिडले होते, जिथे पाकिस्तानने विजय मिळवला होता.

भारताचा शेवटचा विजय २००७ च्या टी-२० विश्वचषकात झाला होता. भारत आणि पाकिस्तान यांच्यात ११ एकदिवसीय अंतिम सामने झाले आहेत, त्यापैकी पाकिस्तानने ८ जिंकले भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहिला स्पर्धेचा अंतिम सामना १९८५ मध्ये झाला होता. हा वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ क्रिकेटचा विजेता सामना होता, जो भारताने ८ विकेट्सने जिंकला.

एकूण, दोन्ही संघांनी विविध एकदिवसीय स्पर्धांमध्ये ११ अंतिम सामने खेळले आहेत, ज्यामध्ये पाकिस्तानने आठ आणि भारताने फक्त तीन जिंकले आहेत. ते दुसऱ्यांदा टी-२० फॉरमॅटच्या फायनलमध्ये आमनेसामने येतील सध्याचा आशिया कप टी-२० फॉरमॅटमध्ये खेळला जात आहे. या फॉरमॅटमध्ये दोन्ही संघ एकमेकांसमोर येण्याची ही दुसरी वेळ असेल.

२००७ च्या टी-२० वर्ल्ड कप फायनलमध्ये दोन्ही संघ एकमेकांसमोर आले होते. एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने ५ धावांनी जेतेपद जिंकले आणि त्यांची पहिली वर्ल्ड कप ट्रॉफी जिंकली.

## देशात दोन वर्षांत रोखले ४ लाख बालविवाह

### संयुक्त राष्ट्रांत भारताच्या कामगिरीचा अहवाल प्रसिद्ध

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २६ :**
बालविवाह रोखण्यात भारताने लक्षणीय यश मिळवले आहे. २०२३ पासून ४,००,००० बालविवाह रोखण्यात आले आहेत. बालविवाह प्रतिबंधक कायदा लागू झाल्यापासून ही सर्वाधिक संख्या आहे. तीन वर्षांत बालविवाहांमध्ये ६९% घट झाली आहे.



संयुक्त राष्ट्रांच्या महासभेदरम्यान एका कार्यक्रमात प्रसिद्ध झालेल्या 'टिपिंग पॉइंट टू झिरोः एव्हिडन्स टूवर्ड्स अ चाइल्ड मॅरेज फ्री इंडिया' या जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रनच्या अहवालात हा दावा करण्यात आला आहे. २०२३ मध्ये, संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांनी भाकीत केले होते की याच दराने ही प्रथा नष्ट होण्यासाठी ३०० वर्षे लागतील. जगातील एक तृतीयांश बालविवाह भारतात होतात.

राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग च्या अहवालानुसार, भारतातील २७ राज्ये आणि सात केंद्रशासित प्रदेशांमध्ये १.१५ दशलक्षाहून अधिक मुले बालविवाहाच्या उच्च धोक्यात आहेत, ज्यामध्ये उत्तर प्रदेशात सर्वाधिक संख्या आहे. २०२२ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत न्यायालयात ३,५६३ बालविवाह प्रकरणे नोंदवण्यात आली होती.

## शेतकऱ्यांना महिन्याचा पगार दिला असता, तर आभार मानले असते



### संजय राऊत यांच्या टीकेवर हसन मुश्रीफांचे प्रत्युत्तर

**कोल्हापूर :** वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर खोचक टीका केली आहे. मुश्रीफ म्हणाले की, संजय राऊत यांच्याबद्दल न बोलणेच बरे, कारण जर त्यांनी माझ्यासारख्या विरोधी पक्षाच्या खासदारकीचा एक महिन्याचा पगार दिला असता, तर मी त्यांचे आज आभार मानले असते. राज्यात ओला दुष्काळ आणि पूरग्रस्तांच्या मदतीसंबंधी निर्णय घेतले जात नसल्यामुळे राऊत यांनी सरकारवर टीकेचा बाण सोडला होता. त्याचबरोबर राऊत यांच्या वक्तव्यावरून अजित पवार यांच्या गोट्या खेळण्याचे वक्तव्यही चर्चेत आहे. हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, सुप्रिया सुळे, संजय राऊत किंवा विजय वडेट्टीवार हे विरोधी पक्षात आहेत आणि त्यांचे काम सरकारला पेचात पकडणे आहे. मात्र शेतकऱ्यांना मदत करणे आणि संकटातून वाचवणे हे शासनाचे काम आहे. त्यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांबाबत चिंता व्यक्त करत सांगितले की, गेल्या चार दिवसात अंबाबाईच्या दर्शनाला लाखो भक्त आले आहेत. मी आज दर्शन घेऊन अंबाबाईला प्रार्थना केली की, मराठवाड्यावर आलेले महापुराचे संकट लवकर दूर होवो आणि पूरग्रस्त नागरिकांचे नुकसान भरून काढण्याची ताकद शासनाला मिळो.

## कामगार आणि व्यवस्थापनाने संवादातून समस्या सोडवाव्यात : अण्णा बनसोडे



**मुंबई:** कामगारांच्या समस्या योग्य संवाद आणि समन्वयाच्या माध्यमातूनच सुटू शकतात, त्यामुळे कामगार आणि व्यवस्थापनाने यापुढेही नियमित संवादातून समन्वयाने समस्या सोडविण्याचे आवाहन विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले. विधानभवनात एक्साईड इंडस्ट्रीज लिमिटेड, चिंचवड येथील कामगारांच्या तक्रारींबाबत बैठक झाली.उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी कामगारांच्या विविध मागण्यांसंदर्भात तसेच कामगारांचे हक्क सुरक्षित राहतील याकडे व्यवस्थापनाने काटाक्षाने लक्ष देण्याचे निर्देश दिले. कामगार संघटनेचे पदाधिकारी आणि व्यवस्थापनाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

## उर्दू अकादमीच्या सुवर्ण महोत्सवाला निधी नाही

### माणिकराव कोकाटे यांना आमदार रईस शेख यांचे पत्र



**मुंबई :** राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या सुवर्ण महोत्सवाच्या तीन दिवशीय कार्यक्रमाच्या प्रसिद्धीला अल्पसंख्यांक विभागाने मंजूर केलेल्या १० कोटी निधीवर समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी टीका केली आहे. अकादमीला निधी देताना शासन हात आखडता घेते आणि प्रसिद्धीला मात्र उधळपट्टी करते, हा काय प्रकार आहे, अशी विचारणा आमदार शेख यांनी अल्पसंख्याक विकास मंत्री माणिकराव कोकाटे यांना पत्राव्दारे केली आहे. यासदर्भात माहिती देताना आमदार रईस शेख म्हणाले की, राज्य उर्दू साहित्य अकादमीला १८ सप्टेंबर रोजी वार्षिक निधी केवळ १ कोटी २० लाख रुपये तर वार्षिक कार्यालयीन खचार्साठी ७६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

## महाराष्ट्र सरकार ९८ वर्षांच्या लीजवर एसटी बस डेपो देण्यासाठी टेंडर काढणार

**मुंबई :** महाराष्ट्र राज्याचे परिवहनमंत्री मा. प्रताप सरनाईक यांनी जाहीर केले की राज्य सरकार महाराष्ट्रातील बस डेपो दीर्घकालीन ९८ वर्षांच्या लीजवर देण्यासाठी (४९ वर्षे + आणखी ४९ वर्षांची वाढ) टेंडर पुढील महिन्यात खुले करणार आहे. ते आज मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे नरेडको महाराष्ट्रतर्फे आयोजित करण्यात आलेल्या होमथॉन २०२५ या तीन दिवसीय मेगा प्रॉपर्टी प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी बोलत होते. होमथॉन प्रॉपर्टी एक्स्पोच्या निमित्ताने आयोजित रिअल इस्टेट फोरम २०२५ मध्ये भाषण करताना सरनाईक यांनी पुढे सांगितले की महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (मुंबईतील कुर्ला, बोरीवली आणि राज्यातील इतर शहरांमध्ये मिळून १३,००० एकरांहून अधिक मौल्यवान जागा आहे. या जमिनी आणि बस डेपो विकसित करण्यासाठी सरकारने निर्णय घेतला आहे की हे बस डेपो आता ३० वर्षांऐवजी ९८ वर्षांच्या दीर्घकालीन लीजवर दिले जातील. हे एसटी बस डेपो गुजरातमध्ये जसे विकसित केले आहेत तसे बस पोर्टमध्ये विकसित केले जातील. असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी राज्यातील रिअल इस्टेट विकासकांना या विकास आराखड्यात सहभागी होण्यासाठी आवाहन केले. त्यांनी हेही सांगितले की, पॉड टॅक्सी लवकरच बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये सुरू होणार असून त्याचा विस्तार मीरा-भाईंदर आणि ठाणेसह मुंबई महानगर प्रदेशात होईल. मंत्री सरनाईक म्हणाले की राज्य सरकार सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून, परवडणाऱ्या गृहनिर्माणाला चालना मिळावी यासाठी अर्ध-शहरी व ग्रामीण भागात रिअल इस्टेट विकास वाढण्याची अपेक्षा आहे.

# माथाडी कामगारांचे प्रश्न मार्गी लावणार

## समाजाच्या प्रत्येक घटकाचा विचार करणे हेच आमचे धोरण : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी**
**ठाणे, दि. २६ :**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारसरणीने वाटचाल करत समाजाच्या प्रत्येक घटकाच्या हिताचा विचार करणे, हेच राज्य शासनाचे धोरण आहे. दिवंगत अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी सुरू केलेली चळवळ कोणीही थांबवू शकत नाही. माथाडी कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, अण्णासाहेब पाटील माथाडी कामगार सहकारी पतपेढी आणि अण्णासाहेब पाटील माथाडी कामगार सहकारी ग्राहक सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी एपीएमसी कांदा-बटाटा मार्केट येथे दिवंगत आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त माथाडी कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी वन मंत्री गणेश नाईक, पणन मंत्री जयकुमार रावल, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, आमदार निरंजन डावखरे, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे अध्यक्ष एकनाथ जाधव, सरचिटणीस नरेंद्र अण्णासाहेब पाटील, कार्याध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, कार्याध्यक्ष गुलाबराव जगताप तसेच मोठ्या संख्येने माथाडी कामगार बंधू-भगिनी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम दिवंगत आमदार अण्णासाहेब पाटील आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांसाठी संघटन उभे केले. आपल्या समाजातील लोकांच्या हितासाठी, माथाडी कामगारांच्या विकासासाठी, व्यवस्था उभारण्यासाठी आपले घर-संसार पणाला लावणारे नेते इतिहासात कमीच आढळतात. त्यापैकी दिवंगत आमदार अण्णासाहेब पाटील एक होते. महाराष्ट्राच्या विविध ठिकाणांहून मुंबईत येणाऱ्या कामगारांना चांगले राहणीमान मिळावे, त्यांचा विकास व्हावा यासाठी दिवंगत अण्णासाहेब पाटील यांनी चळवळ सुरू केली. या चळवळीला त्यांनी संघटित स्वरूप दिले. अण्णासाहेबांच्या त्यागामुळे आणि प्रयत्नांमुळे माथाडी कामगारांना आवाज मिळाला, सुरक्षा मिळाली आणि पुढील पिढ्यांना स्वप्ने पाहण्याचा अधिकार मिळाला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी अण्णासाहेबांनी मोठा लढा दिला. मराठा समाजासाठी बलिदान दिले. त्यांच्या बलिदानातूनच मराठा आरक्षणाची चळवळ उभी राहिली. मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी कायद्याच्या चौकटीत राहून जे शक्य आहे ते करण्याचा प्रयत्न आम्ही केला. पुराव्याअभावी आरक्षणापासून वंचित असलेला मराठा समाज आता आरक्षणासाठी पात्र ठरला आहे.

मराठा तरुणांसाठी शैक्षणिक प्रतिपूर्ती योजना सुरू केली आहे. शिक्षणासाठी शहरात राहण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी भत्ता म्हणून दरवर्षी ६० हजार रुपये देण्यात येतात. मराठा तरुण-तरुणींना विविध प्रकारचे प्रशिक्षण मिळावे, त्यांना एमपीएससी, युपीएससी परीक्षा देता याव्यात यासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) स्थापन केली. आतापर्यंत सारथीच्या माध्यमातून ११२ तरुण आयएएस आणि आयपीएस म्हणून नियुक्त झाले आहेत. १ हजार ४८ तरुण-तरुणी महाराष्ट्र शासनात एमपीएससीद्वारे अधिकारी म्हणून नियुक्त झाले आहेत. आतापर्यंत सारथीच्या योजनांचा ८ लाख ३८ हजार ४७७ तरुण-तरुणींनी लाभ घेतला आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठा तरुणांमधून उद्योजक निर्माण करण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ स्थापन करण्यात आले असून, या माध्यमातून दीड लाख तरुण-तरुणी उद्योजक झाले आहेत.

## बीडमध्ये पत्रकार पुत्राची निर्घृण हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

बीड शहरातील गुन्हेगारी विश्वाला हादरवणारी मोठी घटना गुरुवारी रात्री घडली.



माने कॉम्प्लेक्ससारख्या कायम गजबजलेल्या परिसरात यश देवेंद्र ढाका (वय 22) या तरुणाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. यश हा स्थानिक वर्तमानपत्राचे पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा असून अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होता. रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास वर्दळीच्या ठिकाणी धारदार चाकूने त्याच्या छातीत वार करण्यात आला. या वारांमुळे तो रक्तबंबाळ झाला आणि गंभीर जखमी अवस्थेत जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे बीड शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या खुनामागील कारण अधिक धक्कादायक आहे. यश आणि त्याचा मित्र सूरज काटे यांच्यात महिनाभरापूर्वी वाढदिवस साजरा करताना वाद झाला होता. त्या वादाचे रूपांतर हळूहळू वैरात झाले. गुरुवारी रात्री पुन्हा त्यांच्यात वाद झाला आणि त्यातूनच सूरजने चाकू काढून थेट यशवर प्राणघातक हल्ला केला. छातीत आरपार झालेले दोन वार यशसाठी घातक ठरले. एका क्षुल्लक कारणावरून दोन मित्रांमध्ये झालेला हा जीवघेणा संघर्ष शहरात चर्चेचा विषय ठरला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचा ताफा माने कॉम्प्लेक्स परिसरात दाखल झाला. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून आजूबाजूच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. प्राथमिक तपासात सूरज काटे हा आरोपी असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.

## जर्मनीमध्ये रोजगाराची संधी, तरुणांना प्रशिक्षण देणार : दीपक केसरकर

■ **महासागर प्रतिनिधी**
**सावंतवाडी, दि. २६ :**



महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांसाठी एक मोठी संधी उपलब्ध झाली असून, जर्मनीमध्ये ३ ते ४ लाख रोजगाराच्या संधी आहेत. यासाठी महाराष्ट्र सरकारने जर्मनीशी करार केला आहे. सुरुवातीच्या टप्प्यात १० हजार तरुणांना प्रशिक्षण दिले जाईल आणि त्यानंतर एक लाख तरुणांना जर्मनीमध्ये नोकरी मिळवून देण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती माजी शिक्षणमंत्री आमदार दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

केसरकर म्हणाले की, महाराष्ट्र सरकार आणि जर्मनीच्या बेडन युटनबर्ग राज्याचा हा करार एक आदर्श उपक्रम आहे. काही लोक अपुऱ्या माहितीच्या आधारावर यावर आरोप करत आहेत, जे योग्य नाही. मी शिक्षणमंत्री असताना या योजनेला गती दिली होती. सध्या या कामाला उशीर होत असल्याने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला या योजनेचा समन्वयक म्हणून काम पाहण्यास सांगितले आहे .मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेनंतर या योजनेला पुन्हा गती मिळेल, असे ते म्हणाले.

या योजनेत फसवणुकीचा कोणताही प्रश्न नसल्याचे सांगत केसरकर म्हणाले की, दिलेली नियुक्तीपत्रे खोटी नाहीत. व्हिसा मिळवण्यासाठी परीक्षा पास होणे आवश्यक आहे. ही योजना सिंधुदुर्ग आणि जळगाव जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर सुरू होती. काही लोकांनी मुलांच्या मनात गैरसमज निर्माण केले आहेत. उद्योजक ओंकार कलावडे यांना सरकारने निधी दिल्याचा गैरसमज पसरवला गेला आहे. कलावडे हे एक उद्योजक असून, त्यांनी आपल्या स्वतःच्या खर्चाने या कामात सहभाग घेतला आहे.

शासनाकडून त्यांना एकही रुपया देण्यात आलेला नाही.जर्मन भाषेच्या प्रशिक्षणाबद्दल बोलताना केसरकर म्हणाले की, मुलांना ए-वन परीक्षा पास करण्यात यश आले आहे, पण ए-टू परीक्षा पास होणे आवश्यक आहे. ही परीक्षा पास झाल्याशिवाय व्हिसा मिळू शकत नाही. व्हिसा मिळवण्याचे महत्त्व मुलांना माहीत आहे. आता समन्वयक म्हणून माझ्यावर जबाबदारी आल्यावर मी सर्व मुलांना न्याय मिळवून देईन. सिंधुदुर्गातील जवळपास ९० मुले या योजनेत आहेत. त्यापैकी ४ मुलांना व्हिसा मंजूर झाला आहे.

## पदवीधर-शिक्षक निवडणुकीची चाहूल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २६ :**

राजकीय पटलावर पुन्हा एकदा खळबळ उडवणारा संकेत समोर आला आहे. येत्या काळात शिक्षणक्षेत्राशी थेट संबंधित आणि पदवीधरांवर आधारलेली निवडणूक प्रक्रिया सुरु होणार असल्याचे वृत्त समोर आल्यानंतर उमेदवारांबरोबरच पक्षीय नेत्यांचीही धावपळ वाढली आहे. या निवडणुकीत मतदारांची संख्या ठरवणारी नवी यादी हा संपूर्ण खेळ बदलणारा घटक ठरणार आहे, असा अंदाज वर्तवला जातोय.

राजकीय पक्षांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली जाते. कारण या मतदारसंघातून अनेकदा विधानपरिषदेच्या समीकरणात उलथापालथ झाल्याची उदाहरणं आहेत. त्यामुळे मतदार ओढून घेण्यासाठी पक्षांनी आधीपासूनच रणनीती आखायला सुरुवात केली आहे. त्यातच पात्र मतदारांनी नाव नोंदवण्यासाठी घेतलेले पाऊल हा निर्णायक मुद्दा ठरण्याची शक्यता आहे. यावेळी विशेष लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे २०२० मध्ये नोंदणी असलेल्या पदवीधर व शिक्षकांना देखील पुन्हा नव्याने नावनोंदणी करावी लागणार आहे. याचाच अर्थ, ज्यांनी आधीच आपलं नाव मतदारयादीत असल्याचं गृहीत धरलंय, त्यांना नव्याने अर्ज करावा लागेल.

## आयुष्मान भारतसारख्या योजनांमुळे परिवर्तनाची गती वाढली : संजीव बजाज

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. २६ :**



भारतातील आरोग्यसेवा क्षेत्र सध्या आजार झाल्यानंतरच्या उपचारांवरून प्रतिबंधात्मक उपचारांकडे वळत आहे. आयुष्मान भारतसारख्या योजनांमुळे ही परिवर्तनाची गती वाढली आहे. सिरम इन्स्टिट्यूट सोबत आम्ही एक असा डिजिटल प्लॅटफॉर्म उभारतो आहोत, जो लोकांना स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यास सक्षम करणार आहे असे मत बजाज फिनसर्व्हचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज यांनी व्यक्त केले.

टीपीए सेवा पुरवठादार असलेल्या विदाल हेल्थने आणि जगातील सर्वात मोठी लस उत्पादक संस्था असलेल्या सिरम इन्स्टिट्यूटने गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाविषयी जनजागृती आणि प्रतिबंधासाठी एक धोरणात्मक भागीदारी जाहीर केली त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला, ह्यविदाल हेल्थकेअर सर्व्हिसेस लि.च्या कार्यकारी संचालिका नीथा उत्तय्या यांच्यासह अधिकारी वर्ग व आदी मान्यवर उपस्थित होते.

अकोल्यासह महाराष्ट्रातील तसेच संपूर्ण भारतात दि. १ ऑक्टोबर २०२५ पासून, विदाल हेल्थचा डिजिटल प्लॅटफॉर्म हा पहिल्यांदाच एचपीव्ही लसीसाठी सर्वकष (एंड-टू-एंड), कागदपत्रविरहित, सोयीस्कर आणि कॅशलेस अनुभव देणारा असेल. यावर डॉक्टरची वेळ ठरवण्यापासून, संमतीपत्र भरणे आणि प्रमाणपत्र मिळवण्यापर्यंत सगळी प्रक्रिया डिजिटल स्वरूपात असतील. यात औषधांच्या डोसच्या वेळेची आठवण, उपचारांचे पालन आणि नेटवर्क व्यवस्थापन यांमध्ये मदत करणार आहे. त्यातून सातत्यपूर्ण देखभाल करणे रुग्णांना शक्य होईल. यावेळी ह्यसिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला म्हणाले, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी एचपीव्ही लस अत्यंत महत्त्वाची आहे. तिचा प्रभाव वाढविणे तसेच उपलब्धता व जनजागृती गरजेची आहे. विदाल हेल्थसोबतची भागीदारीच्या या माध्यमातून अत्यावश्यक लसी अधिक सहजपणे उपलब्ध करून जनतेचे आरोग्य सुधारण्याचा आमचा उद्देश आहे.

विदालच्या कार्यकारी संचालिका नीथा उत्तय्या म्हणाल्या की, सिरम इन्स्टिट्यूटशी भागीदारी उपक्रमाच्या माध्यमातून भारतात वाढत चाललेल्या हॉस्पिटलायझेशनचा व वैद्यकीय स्वरुपाचा खर्च कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

एचपीव्ही लसीकरणाच्या सुविधेची थेट डिजिटल स्वरूपात भर पडली आहे. ही सुविधा मधल्या कोणत्याही दलालांशिवाय किंवा विलंबाशिवाय रुग्णांना मिळू शकणार आहे.

## न्यायालयाबाहेर वाल्मीकीचा थेट पोलिसांवर हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

कल्याणमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. न्यायालयाच्या परिसरातच कैद्यांनी पोलिसांवर हल्ला केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेत एक पोलिस कर्मचारी जखमी झाला असून परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

ही घटना कल्याण न्यायालयात आठ आरोपींना हजर केल्यानंतर, त्यांना पुन्हा आधारवाडी कारागृहात परत नेण्याच्या वेळी घडली. या प्रकरणी महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे न्यायालय परिसरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

घटनेची सुरुवात न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर झाली. आरोपींना पुन्हा जेलमध्ये नेण्यासाठी पोलिसांनी गाडी बोलावली होती. मात्र, गाडीत जागा कमी असल्याने पोलिस नाईक किशोर पेटारे यांनी काही आरोपींना पाठीमागील आसनावर बसण्यास सांगितले. या साध्या सूचना दिल्यानंतरच आरोपी रागावले आणि त्यांनी पोलिसांशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यातूनच चार आरोपींनी अचानक पोलिसांवर हल्ला चढवला.

आरोपी आकाश वाल्मीकी, गणेश उर्फ शालु मरोठीया, योगींदर उर्फ भोलू धरमवीर मरोठीया आणि विवेक शंकर यादव यांनी एकत्र येऊन पोलिस कर्मचाऱ्याची कॉलर पकडली, धक्काबुक्की केली आणि शिवीगाळ करत धमक्या दिल्या. यातून किशोर पेटारे हे जखमी झाले आहेत.

## पत्रकार कल्याण निधी वाढीसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचा संघर्ष यशस्वी

### महाराष्ट्र सरकारचा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २६ :**

पत्रकार कल्याण निधी वाढीसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचा तीन वर्षांचा संघर्ष अखेर यशस्वी ठरला आहे. आज महाराष्ट्र शासनाने शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी अंतर्गत २० कोटी रुपयांच्या पुरवणी अनुदानास प्रशासकीय मान्यता दिली असून त्यामुळे या निधीची एकूण ठेव १०० कोटींवरून १२० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. या निर्णयामुळे आकस्मिक मृत्यू, अपघात किंवा गंभीर आजाराच्या प्रसंगी पत्रकारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या मदतीचा आधार आणखी भक्कम झाला आहे. तसेच ज्येष्ठ पत्रकारांसाठी दरमहा मिळणाऱ्या मानधनाचा लाभ अधिक व्यापक स्वरूपात देणे शक्य होणार आहे.

या ऐतिहासिक निर्णयाबाबत व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे म्हणाले की, पत्रकारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी आम्ही तीन वर्षं अहोरात्र लढा दिला. शासन दरबारी अनेकदा निवेदने दिली, सात वेळा आंदोलने केली.

सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्या संघर्षाला यश आलं आहे. निधीत २० कोटींची वाढ करून सरकारने पत्रकारांप्रती कृतज्ञतेची भावना दाखवली आहे. हा विजय व्हॉईस ऑफ मीडियाच्या नाही तर तो संपूर्ण पत्रकार बांधवांचा आहे. आम्ही महाराष्ट्र सरकारचे मनःपूर्वक आभार मानतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांसाठी नेहमी चांगली भूमिका घेतली आहे.

याचबरोबर राज्याध्यक्ष अनिल म्हस्के यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, पत्रकारांच्या आकस्मिक संकटाच्या वेळी दिलासा देणारा हा निधी म्हणजे आशेचा हात आहे. निधी वाढल्याने अनेक कुटुंबांचे डोळे पुसले जातील. या मागणीसाठी व्हॉईस ऑफ मीडियाने राज्यभर सातत्याने लढा दिला आणि अखेर सरकारने सकारात्मक निर्णय घेतला.

## स्वच्छता मोहीम निरंतर सुरू राहणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**



मुंबई महापालिकेच्या सफाई कामगार आणि कर्मचाऱ्यांमुळे मुंबई स्वच्छ, सुंदर आणि हिरवीगार आहे. मुंबईकरांचे आरोग्य सुदृढ आहे. स्वच्छता कर्मचारी हे स्वच्छतेचे दूत, वास्तवातील 'हिरो' आहेत. मुंबईकरांच्या आरोग्यासाठी आणि स्वच्छ-सुंदर शहरासाठी सखोल स्वच्छता मोहीम (डीप क्लीन ड्राईव्ह) सातत्याने सुरू राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका विविध उपाययोजना राबवित असून त्याचे अनुकरण राज्यातील इतर महानगरपालिकांनी करावे, असे आवाहन उपमख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

'स्वच्छता ही सेवा २०२५' या अभियानांतर्गत 'स्वच्छोत्सव' उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्ह्याचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत सामूहिक श्रमदान करण्यात आले.

महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव के. एच. गोविंद राज, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, महानगरपालिका उपायुक्त, सहायक आयुक्त, अधिकारी, कर्मचारी, कामगार शाळा आणि महाविद्यालयांचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, नागरिक या मोहिमेत सहभागी झाले होते.

महानगरपालिकेच्या ए विभागातील महात्मा गांधी मार्ग (मेट्रो चित्रपटगृह ते फॅशन स्ट्रीट) परिसरात लोकसहभागातून सामूहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. रस्ते, पदपथ स्वच्छ करत पाण्याने धुवून काढण्यात आले. यावेळी स्वच्छतेविषयक सामूहिक शपथ घेण्यात आली.

## मराठवाड्यात पुन्हा पावसाचा कहर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**



राज्यभरात सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. मराठवाडा आणि विदर्भावर अस्मानी संकट अधिक गडद होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यभर पावसाचा जोर वाढणार आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, 27 ते 29 सप्टेंबरदरम्यान मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. विशेषतः 27 सप्टेंबर रोजी पावसाची तीव्रता अधिक असण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मच्छिमार बांधवांसाठी 24 ते 29 सप्टेंबरदरम्यान समुद्रात न जाण्याचा इशारा जारी करण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांत मराठवाडा ढगफुटीप्रवण प्रदेश बनला आहे. 2020 नंतरच्या काळात या भागात सलग तीन वेळा ओला दुष्काळ जाहीर करावा लागला. मागील पाच वर्षांत 42 हून अधिक तालुक्यांतील खरीप हंगाम ढगफुटीमुळे उद्ध्वस्त झाला आहे. यंदाही 12 ते 23 सप्टेंबरदरम्यान झालेल्या मुसळधार पावसामुळे तब्बल 24 लाख हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे.

# पेट्रोलपंप व्यावसायिकाच्या खुनासाठी चुलत भावाकडून १० लाखांची सुपारी

## दोन अल्पवयीन मारेकऱ्यांसह आठ जणांना पोलिसांनी घेतले ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २६ :

बडनेरा जुनी वस्तीमध्ये राहणाऱ्या एका ४२ वर्षीय पेट्रोलपंप व्यावसायिकाचा दोन अल्पवयीनांनी चाकूचे वार करून खून केला. ही घटना बुधवारी (दि. २४) रात्री १० वाजता अंजनगाव बारी मार्गावर घडली आहे. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी दोन अल्पवयीनांसह आठ जणांना ताब्यात घेतले. हा खून करण्यासाठी मृतकाच्या चुलत भावाने दहा लाखांची सुपारी दिल्याचे पोलिस तपासात समोर आले. हा खून मालमत्तेच्या वादातून झाला आहे.



मिलिंद मुरलीधर लाड (४२, रा. बारीपुरा, जुनीवस्ती, बडनेरा) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी मिलिंद यांचा चुलतभाऊ विक्रम लाडसह आठ जणांना ताब्यात घेतले आहे. मिलिंद लाड यांचा बडनेरा ते अंजनगाव बारी मार्गावर नायरा पेट्रोलपंप आहे. २४ सप्टेंबरला रात्री साडेनऊ ते दहा वाजताच्या सुमारास मिलिंद लाड व त्यांच्या पंपावरील कर्मचारी चंदन मोरे हे दोघे दुचाकीने बडनेराकडे निघाले होते. लाड दुचाकी चालवत होते तर चंदन मोरे मागे बसले होते. दरम्यान मार्गात दोन अनोळखी मुलांनी अचानक मधात येऊन लाड यांच्या खांद्यावर चाकूने वार केला. १ ऑगस्टला पोलिस अंमलदार आशा तायडे, २२ ऑगस्टला लिपिक अतुल पुरी आणि २४ सप्टेंबरला व्यावसायिक मिलिंद लाड यांचा 'कॉन्ट्रॅक्ट किलर'ने खून केला आहे. ॲड. सुनील देशमुख, प्रमुख जिल्हा सरकारी वकील. खाली कोसळले. त्यानंतर त्या दोन मारेकऱ्यांनी लाड यांच्यावर चाकूचे वार केले. चंदन मोरे यांनी लाड यांना बचावण्याचा प्रयत्न केला तर मारेकऱ्यांनी त्याला तू येथून निघून जा, अन्यथा तुझाही जीव घेणार, अशी धमकी दिली. त्यामुळे मोरे पळून गेला. दरम्यान लाड यांना रुग्णालयात पोहोचवले असता त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. घटनेची माहिती बडनेरा पोलिसांना दिल्यानंतर पोलिस घटनास्थळी आले. पोलिसांनी या प्रकरणी मिलिंद यांचे चुलतभाऊ गजानन वामनराव लाड (४८) यांच्या तक्रारीवरून अज्ञाताविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी घटनेनंतर अवघ्या काही वेळात दोन्ही मारेकऱ्यांना ताब्यात घेतले. ते दोघेही अल्पवयीन असल्याचे समोर आले. लाड यांच्या खुनाची सुपारी मिळाली होती, असे त्यांनी सांगितले आहे. दरम्यान गुरुवारी सायंकाळी पोलिसांनी विक्रम लाड यासही ताब्यात घेतले. विक्रमने थेट या अल्पवयीनांना सुपारी दिली नाही तर मुख्य मारेकरी असलेले अल्पवयीन व विक्रम लाड यांच्या मधात पाच जण असल्याचे समोर येताच पोलिसांनी त्यांनाही ताब्यात घेतले. नेमकी कोणाला किती रक्कम मिळाली, याबाबत पोलिस तपास करत आहेत.

**सुपारी देऊन ५५ दिवसांत शहरातील तिसरा खून**

मिलिंद यांचा चुलतभाऊ विक्रमनेच दहा लाखांची सुपारी देऊन हा खून घडवून आणल्याचे समोर आले आहे. त्यांच्यात असलेल्या मालमत्तेच्या वादातून हा खून झाला. या प्रकरणात विक्रम, दोन अल्पवयीनांसह ८ जणांना ताब्यात घेतले आहे. विक्रम व मिलिंदमध्ये मालमत्तेवरून वाद विक्रम व मिलिंद यांच्यात मालवत्तेवरून वाद असून तो विकोपाला गेला होता. काही वर्षांपूर्वी पेट्रोलपंप या दोघांनी मिळून सुरु केले होते. काही दिवसानंतर ते मिलिंदच सांभाळत होते. याशिवाय अन्य काही मालमत्तेवरूनही त्यांच्यात वाद सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# एसटीतून आरक्षण मागणीसाठी बंजारा समाजाची गर्दी



■ महासागर प्रतिनिधी
पुसद, दि. २६ :

महाराष्ट्र राज्यातील बंजारा जमातीला हैदराबाद गॅझेट व सीपी अँड बेरार प्रोव्हिंसमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सुरत आदिवासीच्या आरक्षणाला बाधा न पोचवता स्वतंत्र अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करावे, या मागणीसाठी पुसदमध्ये बंजारा समाज बांधवांनी पारंपारीक वेशभुषा परिधान करुन भव्य मोर्चा काढला. यावेळी डफफडे वाजवीत महिला, पुरुष, तरुण, तरुणी, वयोवृद्ध सहभागी असलेला जनसागर पुसद शहरात अवतरल्याची प्रचीती येत होती. बंजारा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी गुरूवारी दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास फुलसिंग नाईक महाविद्यालय ते श्रीरामपूर येथील आसेगावकर पेट्रोल पंपापर्यंत मोर्चा काढून उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना मार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. बंजारा समाज बांधवांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून हातात सेवालाल महाराजांचे झेंडे, विविध घोषणांचे बॅनर घेऊन आरक्षणाची मागणी केली. यावेळी निवेदन प्रा. संजय चव्हाण यांच्या नेतृत्वामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. मोर्चेकरांना संजय महाराज (पोहरागड) मुंबई येथील राजू नाईक, उल्हास चव्हाण, पंजाब चव्हाण (याडीकार) आयुषी राठोड यांनी संबोधित केले. मोर्चेकरी फुलसिंग नाईक महाविद्यालय येथे सकाळी १० वाजता पासून जमा होत होते. यवतमाळ, दिग्रस, काळी दौलत, माहूर,महागाव या ठिकाणावरून येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

यावेळी आरक्षणाच्या मुद्द्यावर बंजारा समाजातील अनेक तरुणांनी जीवन यात्रा संपवली आहे. आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलणाऱ्याच्या कुटुंबीयांना महाराष्ट्र शासनाने दहा लाख रुपयांची मदत द्यावी अशी मागणी करण्यात आली.

# शिवाजी मैदानात अवतरले केदारनाथ धाम

## बर्फावरुन चालत गेल्यानंतर जगदंबेचे दर्शन



**यवतमाळ** : अतिशय पवित्र मानण्यात येणाऱ्या चार धाम पैकी एक धाम असलेल्या आणि बारा ज्योतीर्लींगांपैकी एक प्रमुख ज्योतीर्लींग असलेल्या केदारनाथ धाम येथील मंदिराचा अगदी हुबेहुब देखावा शहरातील शिवाजी मैदानामध्ये साकारण्यात आला आहे. शिवाजी नगर दुर्गोत्सव मंडळाने साकारलेल्या या देखाव्यामुळे जणू केदारेश्वर धामच शिवाजी मैदानात अवतरल्याची अनुभूती या ठिकाणी येणाऱ्यांना येत आहे.

शहरातील जुना परिसर म्हणून परिचीत असलेल्या शिवाजी नगर परिसरात राहणाऱ्या काही प्रतिष्ठित मंडळींनी पुढाकार घेत शिवाजी नगर दुर्गोत्सव मंडळाची नोंदणी केली. त्यानंतर या भागातील प्रसिद्ध असलेल्या शिवाजी मैदानामध्ये नवरात्री उत्सव साजरा करण्यात येत आहे. या मंडळाचे यंदाचे ९ वे वर्ष असून त्यांनी केदारनाथ धामचा देखावा साकारला आहे. मंडळाचे अध्यक्ष नाना गाडबैले यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या या देखाव्याची निर्मीती गेल्या काही वर्षात आपल्या कामातून कल्पकतेचा ठसा उमटवणाऱ्या युवा मंडप डेकोरेटर शुभम राऊत याने केली आहे. या देखाव्यासाठी कलकत्ता येथील सुमारे २५ प्रशिक्षीत कारागीर १ महिना रात्रंदीवस काम करीत होते. या कारागिरांनी थर्माकॉल, बल्ली, बासे, कापड यांचा वापर करुन देखावा तयार केला.

त्यामुळे नागरिकांनी हा देखावा एकदा अवश्य पहावा असे आवाहन शिवाजी नगर सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळाचे अध्यक्ष नानाभाऊ गाडबैले, सचिव अमीत उत्तरवार, उपाध्यक्ष अनील बेलोरकर, कोषाध्यक्ष नितीन लाड, रवी माने, बाळासाहेब काळे, विशाल झाडे, राजु काळे गणेश धांदे, नंदु पाटील यांच्यासह सर्व सदस्यांनी केले आहे. बारा ज्योर्तिलींगाचेही घेता येणार दर्शन केदारनाथ मंदीराच्या देखाव्याच्या आतमध्ये जातांना सर्व भावीकांना बर्फावरुन चालक काही दुर जावे लागणार आहे.

त्यामुळे केदारनाथ येथे आल्याची अनुभीती मिळणार आहे. मंदीराच्या आतमध्ये दुर्गामुर्तीची स्थापन करण्यात आली असुन आतमध्ये सर्व १२ ज्योतीर्लींग स्थापण करण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी १२ ज्योतीर्लींग पाहता येणार आहेत. असे सांगण्यात आले आहे.

# नवीन वीजदर व नियम रद्द करावे

## विदर्भ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
उमरखेड, दि. २६ :

विदर्भ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनतर्फे उमरखेड येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालयात सहाय्यक अभियंता यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये दि. १ जुलै २०२५ पासून लागू करण्यात आलेले नवीन वीज शुल्क व इतर जाचक नियम तत्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात नमूद केले आहे की, बँकेचे कर्ज, वीजबिल, कर्मचारी पगार, व्यापारातील तीव्र स्पर्धा या सर्वांमध्ये उधोजक आधीच कोंडीत सापडला आहे. त्यात वीज वितरण कंपनीने केलेल्या दरवाढीमुळे उद्योग चालवणे अशक्य झाले आहे. आज उद्योग चालवणारा व्यापारी स्वत:साठी रोजगार शोधण्याच्या स्थितीत आला आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला की, ही दरवाढ तसेच अटी-नियम जर मागे घेतले नाहीत तर अनेक लघुउद्योगांना जबरदस्तीने बंद करण्याची वेळ येईल. यामुळे समाजातील शेकडो लोकांचा रोजगार धोक्यात येणार असून अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल. दरवाढीमुळे सर्वसामान्य ग्राहक, शेतकरी, व्यापारी, लघु उद्योग सर्वांनाच मोठा फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

दरवाढ व इतर नियम तातडीने रद्द करून पूर्ववत करावेत, अन्यथा उधोजकांना कठोर आंदोलन करावे लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

# विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची विविध शिबीरांकरिता निवड

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २६ :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत येणा-या पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयातील १८० विद्यार्थी - विद्यार्थीनी स्वयंसेवकांची विविध शिबीरांकरिता निवड करण्यात आली आहे. निवड झालेले विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. राष्ट्रीय गणतंत्र दिन पथसंचलन शिबीर, राष्ट्रीय एकात्मता शिबीर, राष्ट्रीय साहसी शिबीर, राज्यस्तरीय आव्हान शिबीर, राज्यस्तरीय गणतंत्र दिन पथसंचलन शिबीर, राज्यस्तरीय साहसी शिबीर, राज्यस्तरीय उत्कर्ष शिबीर, राज्यस्तरीय प्रेरणा शिबीर अशा विविध शिबिरांसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक विद्यार्थी -विद्यार्थीनींची निवड चाचणी घेण्यात आली. अमरावती जिल्हासह अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम जिल्हास्तरीय शिबिरामधून शारीरिक सक्षम गटातून ९० विद्यार्थ्यांची तसेच सांस्कृतिक गटातून ९० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. जिल्हास्तरावर निवडलेल्या स्वयंसेवकांची विद्यापीठस्तरीय निवड चाचणी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. विशाल गजभीये, डॉ. विकास देशमुख, यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निलिमा दवणे, परीक्षक म्हणून लेफ्टनंट डॉ. रोहीतकुमार अग्रवाल, वृषभ डहाके, डॉ. नेत्रा मानकर, डॉ. अंकुश गिरी, प्रा. अमोल अढाऊ, डॉ. वनिता भोपत उपस्थित होते. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी याप्रसंगी सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यापीठस्तरीय निवड चाचणीमध्ये अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम या जिल्ह्यांमधून १८० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले. सर्वांची दोन गटांमध्ये विभागणी करुन शारीरिकदृष्ट्या सक्षम गटाची विद्यापीठाच्या क्रिडांगणावर वजन, उंची, छाती, धावणे, परेड, पुलअप्स, सीटअप, चीनअप, अशा शारीरिक चाचणी घेवून केंद्र व राज्य शासनाच्या गणतंत्र दिन पथसंचलन शिबीरासाठी १२ मुले, १२ मुली, राष्ट्रीय साहसी शिबीरासाठी २ मुले, २ मुली, राज्यस्तरीय आव्हान शिबीरासाठी ७५ मुले, ५० मुली व राज्यस्तरीय साहसी शिबीरासाठी ५ मुले, ५ मुलींची विद्यापीठामार्फत निवड करण्यात आली. परिक्षक म्हणून लेफ्टनंट. डॉ. रोहीतकुमार अग्रवाल व वृषभ डहाके यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक गटामध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र येथे आपल्या उत्कृष्ट कला - कौशल्याचे सादरीकरण केले. यामधून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी ९ मुले, ९ मुली, राज्यस्तरीय प्रेरणा शिबीरासाठी ५ मुले, ५ मुली, राज्यस्तरीय उत्कर्ष शिबीरासाठी ९ मुले, ९ मुलींची निवड करण्यात आली. परिक्षक म्हणून डॉ. अंकुश गिरी, प्रा. अमोल अढाऊ, डॉ. नेत्रा मानकर, डॉ. वनिता भोपत यांनी काम पाहिले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, संचालन डॉ. हर्षाली वानखडे, तर आभार जिल्हा समन्वयक डॉ. विशाल गजभिये यांनी मानले.

निवड झालेल्या सर्व स्वयंसेवकांचे कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नंददीपच्या मनोरुग्ण निवारा केंद्राच्या पायाभरणीला सुरुवात

## किसन बोरले यांच्या पुढाकाराने एका हॉलचे बांधकाम

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २६ :



संदीप व नंदिनी शिंदे यांच्या बेघर मनोरुग्ण सेवेला दानशुरांचा पाठिंबा मिळत आहे. हरिओम (बाबूजी) भूत यांनी बोथबोडण फाट्यावर दान दिलेल्या साडेतीन एकर भूमीवर किसन बोरले यांच्या पुढाकाराने एक हॉलचे बांधकाम होणार आहे.याचा भूमिपूजन सोहळा गुरुवारी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. आर्णी महामार्गावरील बोथबोडण गावानजीक बेघर मानसिक रुग्णांसाठी प्रशस्त असे निवारा केंद्र उभारले जाणार आहे.भूत यांच्या दातृत्वाने मिळालेल्या या भूमीला मनोरुग्ण सेवेसाठी समर्पित करण्यासाठी शहरातील दानशूर सरसावले आहेत. शहरातील प्रतिष्ठित किसनराव बोरले यांनी २०५० फूट हॉल बांधून देण्याचा मानस नंददीपचे संचालक संदीप व नंदिनी शिंदे दाम्पत्यापुढे व्यक्त केला. त्यानुसार २५ सप्टेंबर रोजी त्यांनी बोथबोडण येथे जाऊन नियोजित जागेची पाहणी केली.गणमान्य मान्यवरांच्या उपस्थितीत भूमिपूजन करण्यात आले. बोरले यांच्या सौजन्याने महिला प्रभूजींसाठी हा हॉल उपयुक्त ठरणार आहे. नंददीप हे माझे एकट्याचे नसून सर्वांचे आहे.या मनोरुग्ण सेवेला तुमच्यातील संवेदनशीलता पुढे नेत असून मी फक्त एक माध्यम आहे,असे बोलून शिंदे यांनी दानशूर व्यक्ती,सेवाभावी डॉक्टर,स्वयंसेवक तसेच या सेवेला प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या मदत करणाऱ्या लोकांचे आभार मानले.यावेळी घनश्याम बागडी यांनी दुसऱ्या एका हॉलसाठी ५ लाखांची मदत जाहीर केली. सोहळ्याला चंदूलाल बागडी, केंद्राचे मानसोपचार तज्ज्ञ डॉ.श्रीकांत मेश्राम,प्रशांत बनगीनवार, डॉ. कविता बोरकर, स्वयंसेवक निशांत सायरे, व्यवस्थापक राजू आजनकर आदी उपस्थित होते. नंददीप फाऊंडेशनच्या या प्रकल्पातून बेघर मनोरुग्ण सेवा अधिक बळकट होईल,असा विश्वास मान्यवरांनी याप्रसंगी व्यक्त केला. जनतेने या सेवाकार्यात सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# १३ क्षयरुग्णांना पोषण आहार किट वाटप

■ महासागर प्रतिनिधी
अकोट , दि. २६ :

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र मुंडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गजानन महाराज पादुका संस्थान मुंडगाव यांनी निक्षय मित्र बनून १३ क्षयरुग्णांना दोन महिन्यांकरिता आहार किटचे वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत निक्षय मित्र हा उपक्रम सुरू असून, या क्षयरुग्णांना सामुदायिक सहाय्य हा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा एक प्रमुख उपक्रम आहे. ज्याच्या द्वारे रुग्णांना अतिरिक्त साह्य मिळावे, यासाठी श्री गजानन महाराज पादुका संस्थान मुंडगावद्वारे १३ क्षय रुग्णांना दत्तक घेऊन दोन महिन्यांच्या २६ पोषण आहार किट वाटप करण्यात आली.


**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
ई-निविदा सूचना
निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-17
दिनांक: २४.०९.२०२५

डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. खालील कामासाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांना कळवा:- कामाचे नाव त्याच्या परिसरासह: सोलापूर विभागातील कुर्डुवाडी-मिरज विभागातील एस अँड टी गीअर्सच्या देखरेखीसाठी रिमोट डायग्नोस्टिक अँड प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्स (आरडीपीएम) सिस्टमची तरतूद. निविदा क्रमांक SUR-N-T-2025-26-17, कामाची अंदाजे किंमत रु. ५,५७,६१,८३०.६२/-, निविदा फॉर्मची किंमत शून्य, जमा करावयाची सर्वात कमी रक्कम रु. ४,२८,७००/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी - १२ महिने. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: १६.१०.२०२५. तपशील आयआरईपीएस वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती असल्यास ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील मॅन्युअल / पोस्टल / ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग ३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. बयाणा रक्कम (ईएमडी) नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारली जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे वैयक्तिकरित्या पोहोचवावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक
एस अँड टी शाखा
SUN 82
टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें



**CHANGE OF NAME**

MY BOARD CERTIFICATE HAS INCORRECT NAME MY OLD NAME WAS **JASPREET SINGH JARNAIL SINGH DHINDSA.** NOW MY ADDHAR CARD AND PAN CARD CORRECT NAME WAS MY NEW NAME IS **JASPREET SINGH JARNAIL SINGH DINSHA**

**ADD:-** PLOT NO. 922, NARI ROAD, BABA DEEP SINGH NAGAR, UPPALWADI, AT POST:- NAGPUR-440026, MAHARASHTRA, INDIA

**MOB:** 07350829057 / 09890253977



MAHAVITARAN

**E-TENDER NOTICE**

Superscribed percentage rate e-tenders are invited from established, reputed, experienced contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the work of **1.** Extension of Control room at 33/11 KV Ioni Sub Station Tq. Arni under, O&M Division, Darwha Dist. Yavatmal. **(Rs. 10.80 Lakhs), 2.** Civil Renovation and Maintenance Works of HR Section and Account Section at O&M Division office Morshi, Tal. Morshi, Dist. Amravati. **(Rs. 12.64 Lakhs ) & 3.** Annual Contract of Up-Keeping of offices & Pump Operation at Prakash Bhawan Premises Gaddigodam Tq & Dist Nagpur **(Rs. 23.60 Lakhs)** vide e-tender specification numbers: **SEC/NGP/e-T-18/2025-26** to **SEC/NGP/e-T-20/2025-26** respectively. The e-tenders with all details will be available on MSEDCL's website **www.mahadiscom.in** from from **Dated 27.09.2025 to 06.10.2025** and submission on **07.10.2025 up to 13.00 Hrs.** Corrigendum if any will NOT be published in the newspaper the bidders have to check it on website itself. The right to reject any orall tenders without assigning any reason whatsoever is reserved by the Superintending Engineer (C) Civil Circle, Nagpur. **Contact No. 7875762716.**

**PRO No. NZ/ 115 /2025**
**Dated -26.09.2025**

**Superintending Engineer (C)**
**CCCM Circle, Nagpur**



महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**ई-निविदा सुचना**

मुख्य अभियंता (बांधकाम), महानिर्मिती, कोराडी कार्यालयामध्ये दोन बोलमधून ऑनलाईन निविदा मागवीण्यात येत आहेत.
**बोली दस्तावेजाची विक्री :** २७.०९.२५ पासून ते १७.१०.२५, १०:०० वा. पर्यंत. निविदा शुल्क : रु. ११८०.००/-
**बोली सादर करण्याची अंतिम तारीख :** १७.१०.२०२५ रोजी ११:०० वा. पर्यंत.

| अ.क्र. | निविदा आरएफएक्स क्र. | कामाचा तपशिल | इसारा रक्कम | ईएमडी |
|---|---|---|---|---|
| १ | ३०००६२१२८ | मुख्य अभियंता (बांधकाम), कोराडी येथे नागपूर येथील हिवाळी विधानसभा अधिवेशन-२०२५ साठी भाड्याने टॅक्सी उपलब्ध करून देणे. | रु. ०७,३४,२६१.६/- | रु. १०,८४३/- |

१. उपरोक्त निविदा संबंधीत अधिक तपशील संकेतस्थळ https://eprocurement.mahagenco.in वर उपलब्ध आहेत.
२. या निविदेची कोणतीही सुधारणा आणि किंवा बोली दस्तावेजामधील सुधारणेची अधिसूचना केवळ संकेतस्थळ https://eprocurement.mahagenco.in वर अधिसूचीत करण्यात येईल. संभावीत बोलीदारांनी कृपया याची नोंद घ्यावी.

**मुख्य अभियंता (बांधकाम) महानिर्मिती, कोराडी**



**सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : १८.०९.२०२५**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

क्र.टिपीएस-१८२५/अनौसं-३८/प्र.क्र.११७/२०२५/कलम ३७ (१कक) (क) व कलम २० (३)/नवि-१३:- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख "उक्त युडीसीपीआर नियमावली" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/ वियो. व प्रायो. कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त युडोसीपीआर नियमावली दि. ०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे:

आणि ज्याअर्थी, उक्त युडीसीपीआर नियमावलीच्या विनियम क्र.६.२.२ मधील तक्ता क्र.६E मधोल अनुक्रमांक ८ येथे स्टेडियम सह पॅव्हेलियिन विकसित करण्ययावत तरतूद समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त युडीसीपीआर नियमावलीमध्ये या सूचनेसोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकात्मिक क्रिडा संकुल (Integrated Sports Complex) अंतर्गत स्टेडियम, क्रिडांगण, बंदिस्त क्रिडासंकुल यासह सर्व प्रकारच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिडा स्पर्धांसाठी आवश्यक ती मोकळी मेदाने /बांधकाम, प्रेक्षक गॅलरी, खेळाडूंची निवासस्थाने, ट्रेनिंग व्यवस्था, अनुषंगीक कर्मचारी निवासस्थाने / कार्यालये या वापरां व्यतिरिक्त काही क्षेत्रावर तारांकित हॉटेल, क्रिडा सुविधा इ. प्रयोजनाकरिता बांधकाम अनुज्ञेय करण्याचे दृष्टीकोनातून उक्त युडीसीपीआर नियमावलीच्या विनियम क्र.६.२.२ मधील तक्ता क्र.६E मध्ये नवीन तरतुद अनुक्रमांक ९ समाविष्ट करणे तसेच विनियम क्र.४.२७.५ सुधारित करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे व त्यासाठी उक्त युडीसीपीआर नियमावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थो, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (क) व कलम २०(३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्रुषंगिक शक्तीचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना / हरकतीवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिकारी" असा करण्यात येत आहे) असे शासनाचे मत झाले आहे:

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती / छत्रपती संभाजीनगर विभाग,
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापुर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण.
८. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
१०. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(प्रणव कर्पे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

क्र. संमावज/नाग/४०९/२०२५

# भारतात होईल का जेन झेडचा उठाव?

नेपाळमधे सरकारच्या विरोधात जनरेशन झेड (युवाशक्ति) ने उठाव केला, हिंसाचार झाला, युवकांच्या प्रक्षोभापुढे प्रशासन हतबल झाले, सरकारला राजीनामा देऊन पळ काढावा लागला. नेपाळच्या अगोदर श्रीलंका व बांगला देशातही युवाशक्तिच्या आक्रोशापुढे सत्तांतर झाले. मग भारतात तसे घडू शकते का? याच धामधुमीत काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केलेल्या एका ट्वीटमळे अनेकांचा डोळे विस्फारले आहेत. राहुल गांधी म्हणतात, देशातील युवक, देशातील विद्यार्थी, देशातील जनरेशन जी संविधानाचे रक्षण करील. लोकशाही वाचवतील आणि मतांची (व्होट) चोरीही रोखतील. मी त्यांच्याबरोबर आहे. जय हिंद.

---------------

नेपाळमधे युवकांनी रस्त्यावर येऊन केलेल्या आंदोलनाचा राहुल गांधी यांनी उल्लेख केलेला नसला तरी त्यांचे ट्वीट वाचताना नेपाळमधील युवकांचा संघर्ष डोळ्यापुढे येतो. राहुल गांधी यांनी असे ट्वीट करून युवकांच्या मनात असंतोष खदखदतो आहे. असा सरकारला इशारा दिला आहे?

गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत व्होट चोरी कशी झाली याचे पुरावे देत राहुल गांधींनी गेले काही दिवस निवडणूक आयोगाची व सरकारची झोप उडवली आहे. व्होट चोरीला निवडणूक आयोग संरक्षण देत आहे असा त्यांनी जाहीर आरोप केला आहे. देशातील युवकांची ताकद आपल्या पाठिशी आहे असे काँग्रेस सांगत आहे तर देशात काँग्रेसला नेपाळप्रमाणे आंदोलन घडवायचे आहे असा आरोप भाजपा करीत आहे. त्यातच सॅम पित्रोदा यांनी पाकिस्तानात राहणे आपल्याला घरासारखे वाटते असे सांगून भाजपाला अंगावर ओढवून घेतले आहे.

नेपाळमधे सप्टेंबर महिन्याच्या सुरूवातीला हजारो युवकांनी रस्त्यावर येऊन सरकारविरोधात संघर्ष केला, हिंसाचार, जाळपोळ केली. सरकारी इमारती, राष्ट्रपती- पंतप्रधान- मंत्र्यांची निवासस्थाने पेटवली, न्यायालयांच्या इमारतींना आगी लावल्या, मंत्र्याना पळता भुई थोडी केली, मंत्र्यांचा पाठलाग करून त्यांना लाथा घातल्या, हे सर्व आश्चर्यकारक होते.

पोलीस गोळीबारात पंचावन्न तरूणाचा बळी गेला. नेपाळ सरकारने फेसबुक, एक्स, यु ट्युब, इंस्टाग्राम आदी सोशल मिडियावर बंदी घातल्याचे निमित्त होऊन युवकांची माथी भडकली व ते रस्त्यावर उतरले. सोशल मिडिया केवळ टाइम पासचे माध्यम नाही तर शिक्षण, रोजगार व जागतिक घडामोडींची वेगवान माहिती मिळविण्याचे साधन आहे असा दावा केला जात आहे.

आजकाल तर रिल्स हे कमाईचे साधन बनले आहे. व्हिडिओ कॉलवरून देश विदेशात लक्षावधी लोक संवाद साधत असतात. परस्परांशी संवादाचे सोशल मिडिया प्रभावी साधन आहे. जगभरात ऑनलाइन बिझनेस किती अब्ज होत असेल हे सांगता येणेही कठीण आहे. मग नेपाळ सरकारने युवाशक्तिच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम का केले?



**स्टेटलाईन**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

नेपाळमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतातील युवक संविधानाचे रक्षण करतील व मतांची चोरी रोखतील असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे म्हणूनच त्यांना भारतात नेपाळप्रमाणे आंदोलन होऊ शकते, असे सुचवायचे आहे का?

राहुल गांधी यांनी बिहारमधे व्होट अधिकार यात्रा काढली, राजदचे नेते व लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांनीही राहुल यांना तेथे साथ दिली. कर्नाटकात व महाराष्ट्रात एकेका मतदारसंघात सहा- सहा हजाराहून अधिक मतांची कशी चोरी झाली त्याची आकडेवारी त्यांनी दिली. बिहार यात्रेत दिलेली घोषणा व्होट चोर- गद्दी छोड ही देशात घरोघरी पोचली.

या घोषणेनंतर भाजपाचे केंद्रातील व राज्याराज्यातील प्रवक्ते, नेते व मुख्यमंत्री हे राहुल खोटे बोलतात म्हणून एक सुरात तुटून पडले. राहुल गांधींनी आपल्या पत्रकार परिषदांमधे केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांवर मत चोरांचे संरक्षक असा आरोप केला.

आपल्याकडे मत चोरीचे शंभर टक्के पुरावे आहेत असे सांगत त्यांनी दिल्लीत सादरीकरण केले. राहुल गांधी आता शांत बसायला तयार नाहीत. आपला देश व आपले संविधान हे महत्वाचे आहे असे ते वारंवार सांगत आहेत. राहुल गांधी भारत जोडो यात्रेत युवकांनी न्यायासाठी झटले पाहिजे अशी भाषा वापरल होते आता पुन्हा युवा शक्तिला ते आवाहन करताना दिसत आहेत.

भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी एक्सवर म्हटले आहे झ जनरेशन झेड घराणेशाहीच्या विरोधात आहे. पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी , सोनिया गांधी आता राहुल आणि प्रियंका या घराणेशाहीला जनरेशन झेड कशी मान्यता देईल? जेन जी भ्रष्टाचाराच्या विरोधात आहे. युपीए सरकारमधील घोटाळे कसे विसरता येतील? राहुल यांचे विदेश दौरे व सॅम पित्रोदा यांना विदेशी पैसा कोठून मिळतो याची गृहमंत्रालयाने चौकशी करावी.

नेपाळमधील युवा क्रांती सरकारमधील घराणेशाही विरोधात होती. काँग्रेसची भारतात ओळखच घराणेशाही व घोटाळे अशी आहे असे भाजपा खासदार प्रदीप भांडारी यांनी म्हटले आहे. माजी खासदार सुब्रत पाठक यांनी तर कहरच केला आहे.

ते म्हणतात- नेपाळसारखी भारतात क्रांती झाली तर लोक राहुल- अखिलेश यांच्या घरांना आगी लावतील. ठाकरे यांच्या शिवसेनेने राहुल गांधींच्या वक्तव्याला साथ दिली आहे. भारतातही असे घडू शकते , भाजपाने तयार राहावे, जनता दल युनायटेडचे निरज कुमार यांनी म्हटले आह, भारत म्हणजे बांगला देश नाही आणि नेपाळही नाही. भारताचे संविधान मजबूत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले की, निवडणूक आयोगाला बदनाम करणे ही काँग्रेसची जुनी चाल आहे.

सॅम पित्रोदा यांनी, पाकिस्तानात मी गेलो तर मला घरासारखे वाटते, बांगला देश व नेपाळमधेही असेच वाटते असे म्हटल्याने राहुल गांधींवर तुटून पडणारी भाजपाची फळी पित्रोदांकडे वळली. त्यांना देशद्रोही ठरविण्यापर्यंत मजल गेली. शाहजाद पुनावाला यांनी एक्सवर म्हटले २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यावर काँग्रेसची चुप्पी, आणि पुलवामा घटनेच्या वेळी पाकिस्तानला साथ अशी काँग्रेसची भूमिका आहे .

राहुल गांधी वारंवार सांगत आहेत की, संविधान धोक्यात आहे. पण हे सांगताना ते केवळ मतांच्या चोरीविषयी बोलत आहेत की रस्त्यावर युवाशक्ति उतरेल असा ते इशारा देत आहेत? सोशल मिडियावर राहुल यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रियांचा वर्षावर होताना दिसतो आहे. राहुल गांधी एक्सवर व्होट चोरी फॅक्टरी असा उल्लेख करीत आहेत आणि दुसरीकडे मुंबईत रात्री दोन वाजता नवा ॲपल फोन खरेदी करण्यासाठी तरूणाईची झुंबड बघायला मिळत आहे.

काँग्रेसच्या काळात घरगुती गॅस सिलिंडरसाठी रांगा दिसायच्या आता ऐपल फोन साठी रांगा लागत आहेत. बिहारमधील निवडणुकीच्या निकालानंतर समजेल की जनरेशन झेड राहुल गांधीबरोबर आहे की अन्य कोणाबरोबर. आग आणि हिंसाचाराच्या माध्यमातून नव्हे तर मतदानातून सत्तांतर घडविण्याची ताकद देशातील युवकांमधे आहे. भारत हा बांगला देश , श्रीलंका किंवा नेपाळपेक्षा वेगळा आहे.

---

: पर्यटन :

## सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासाचा आधारस्तंभ

जागतिक संतुलन टिकवण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे. जगातील देशांना आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे. पर्यटनाचे महत्त्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासून २७ सप्टेंबर विश्व पर्यटन दिवस साजरा करण्याची घोषणा केली.

आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते. भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्व शांतीचा दुत आहे. पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा काम करीत असते. त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दिल्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतु, वन्यप्राणी, वनसंपदा यांना जीवदान मिळेल.

भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतात. पर्यटनस्थळे देशाला सुशोभित करतात, देशाच्या विकासाला चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून होत असते. भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन व सुशोभित आहे. यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते.

पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की, देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.

भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे, देवी-देवतांची स्थळे, ताजमहल, कुतुबमिनार, बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत. पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना भारतीय पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन ह्युस्टन येथील हाऊडी मोदी कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते. कारण यामुळे पर्यटनाला चालना मिळेल.

जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत. परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित दिसतात. ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला चालना दिली पाहिजे. वाढते प्रदुषण, प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान, भुकंप, सुनामी, महापूर, ज्वालामुखीचा उद्रेक, वाढती लोकसंख्या यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटनकांवर होतो. याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे. याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे.

जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशीअर वितळत आहे. यामुळे पर्यटनावर, पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो. आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यु ऑफ युनिटी भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजंठा वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार, ताजमहाल इत्यादी अनेक ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसिध्द आहे.

संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे. भारतात पर्यटन स्थळी देव-दानव, ऋषि-मुनी, साधु-संत, वेषभुषा, पुजापध्दती, भारतीय संस्कृती, विविध भाषा, थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व विविध धर्माचा इतिहास अशा अनेक वेगवेगळ्या पध्दती, मनोरंजनात्मक, साहित्य, पौराणिक कथा, इतिहास व संस्कृतीचे दर्शन भारतातील पर्यटन स्थळी पहायला मिळते. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळ्या पध्दतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते.

भारतातील खान-पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात ३१७ गडकिल्ले आहेत यातील फक्त ९६ गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत. परंतु आजही २२१ गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे.

यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज, लग्नसमारंभ, मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देवू नये. यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. सरकारी खर्चातून करून पर्यटनासाठी सुशोभित केले पाहिजे.यातच महाराष्ट्राचा गौरव आहे. यामुळे भारतातील पर्यटनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागेल.

महाराष्ट्राचा इतिहास अजरामर आहे. भारतात आजही औरंगाबादला (संभाजीनगरला) पर्यटनसिटी म्हणुन संबोधल्या जाते. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्त्व देण्याची गरज आहे. कारण यामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते.आज संपूर्ण विश्वाला पर्यटन वाढविण्यासाठी सामोर येण्याची गरज आहे. यामुळे जगात प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण होईल, प्रत्येक देशात मित्रता वाढेल, पर्यावरणात सुधारणा होण्यास मदत होईल. या दृष्टीकोनातून २७ सप्टेंबरला संपूर्ण जगाने संकल्प केला पाहिजे की पर्यटन हेच जनतेला आनंद प्रदान करू शकते.

विश्वातील देशांनी पर्यटनाकडे जातीने लक्ष दिले तर प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि बळकट होण्यास मदत होईल.यामुळे प्रत्येक स्तरातून पर्यटनाला चालना मिळायलाच पाहिजे. पर्यटनामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक व आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात चालना मिळते. पर्यटनामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रत्वाची भावना वाढते. परंतु जानेवारी २०२० पासून चिनीचांडालांनी पर्यटनाला व पर्यटकांना ग्रहण लावल्याचे आपण पाहिले.

अतिथी देव भव म्हणजे पाहुण्यांचा सन्मान करणे. परंतु चीनने संपूर्ण जगाच्या पर्यटनावर व पर्यटकांवर पाणी फेरल्याचे दिसून आले.त्यामुळे आज संपूर्ण जगासाठी चीन विषेला साप झाला आहे.जगात अनेक देशांमध्ये मोठ-मोठी पर्यटन स्थळे आहेत.युक्रेन पर्यटनाच्या बाबतीत व महिलांच्या सुंदरतेचे बाबतीत प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया युद्धामुळे युक्रेन सध्याच्या परिस्थितीत स्मशानभूमी बनल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे चीनने श्रीलंकेला आर्थिकदृष्ट्या कंगाल केले आहे.त्यामुळे श्रीलंकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. याकरिता सध्याच्या परिस्थितीत श्रीलंका पर्यटनावर जास्त भर देत आहे.कारण जगातील अनेक लोक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून श्रीलंकेकडे पहातात.कारण श्रीलंकेची आर्थिक बाजू बळकट करण्याचे काम पर्यटनामुळे होत असते.

सध्याच्या परिस्थितीत जे-जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या-त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे.त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी, वन्यप्राणी, पशुपक्षी, स्थल, जल, वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची गरज आहे.

पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे. यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा-अपेक्षा,आकांक्षा, नवीदिशा निर्माण होईल. भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे. यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

---

# मायबाप सरकार.. शेतकऱ्यांनी जगावे की मरावे?

आज जवळपास दहा वर्ष झाले, पाऊस पुरेसा व योग्य वेळी पडत नाही. निसर्गाचं ऋतुचक्र पूर्णपणे बदलून गेले आहे. पाऊस पडला की नुसता कहर करून टाकतो. पुराने, वादळ वाऱ्याने व गारपिटीने थैमान घातले जाते. अवकाळी पाऊस शेतकरी, कामगार व कर्मचाऱ्यांना घरी बसवतो. शेतातील कापूस, सोयाबीन व इतर धान्य भुईसपाट करून टाकतो. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेला जातो.

मृग नक्षत्रात बरोबर योग्यवेळी पाऊस पडल्यावर शेतकरी शेतात पेरणी करतात कधी पाऊस शेतकऱ्यांना चांगला साथ देतो तर कधी आलेले पीक अतिवृष्टी व गारपिटीमुळे भुईसपाट व जमीनदोस्त होते. शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन व त्यांची आर्थिक उलाढाल ही शेतीवर अवलंबून असते. शेतीने चांगली साथ दिली आणि शेतात भरभरून पीक आले तरच शेतकऱ्यांची भरभराट होते. परंतु, शेतीने जर निसर्गाच्या अवकृपेमुळे दगा दिला आणि शेतीत डौलाने आलेले चांगले पीक व धान्य हिरावून नेले तर शेतकरी पूर्णपणे हतबल होतो, खचून जात टोकाचा निर्णय घेतो. गळफास लावून किंवा विष घेवून स्वतःचे जीवन संपवतो.

त्याला घर प्रपंच चालवणे, मुलाबाळांचे शिक्षण व सावकाराचे वाढते कर्ज पाहून ते असे टोकाचे निर्णय घेतात. सध्या शेतकरी पूर्णतः शेतीवर अवलंबून असल्यामुळे जवळपास दहा वर्षापासून शेतीचे ऋतुचक्र पूर्णपणे बदलून गेल्यामुळे शेतकऱ्यांवर वाईट दिवस आले आहेत. आज शेतकऱ्यांचा विचार केला तर महाराष्ट्रात म्हणा अथवा देशात म्हणा सर्वाधिक आत्महत्या या शेतकऱ्यांच्या होत आहेत. याला नैसर्गिक ऋतुचक्र, आपण स्वतः आणि शासन सर्वस्वी जबाबदार आहे.

माणूस स्वतः झाडांची बेसुमार कत्तल करून ऋतुचक्र बिघडवत आहे. अलीकडे दहा वर्षांत झाडांची बेसुमार कत्तल होत आहे आणि लोक उद्योग धंद्यासाठी किंवा कारखानदारीसाठी जंगलतोड करत आहेत आणि तिथे मोठमोठे कारखाने व उद्योगधंदे उभे करून निसगार्चे देखणे रूप बिघडवत आहेत. हे काम शेतकरी करत नसून मोठमोठे लोक जेणेकरून ज्यांच्याकडे अमाप संपत्ती व पैसा आहे असेच लोक जंगलतोड करत आहेत आणि तिथे मोठमोठ्या संस्था, उद्योगधंदे व कारखाने उभे करून निसगार्चा नायनाट करत आहेत.

शासन सुद्धा अशा लोकांना समर्थन देत आहे. निसगार्चा विचार करायला कोणीही तयार नाही. शेतकरी जगला तरच हे सुंदर जग टिकेल, कारण या जगाला पोसण्याची ताकद फक्त आणि फक्त शेतकऱ्यांमध्येच आहे आणि हा शेतकरी जर आज आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवत असेल तर खरंच लोकशाही प्रधान देशासाठी ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल. मायबाप सरकार शेतकऱ्यांचा जराही विचार करायला तयार नाही. त्यांच्या शेतातील नुकसान झालेल्या मालाला योग्य नुकसान भरपाई द्यायला तयार नाही.

शेतकऱ्यांचा विचार न करता गलेलठ्ठ पगारी असणाऱ्या शासकीय नोकरदारांचा व प्रशासनातील राजकीय पुढाऱ्यांचा विचार करण्यास शासन मश्गुल झाले आहे. हल्ली मराठवाडा किंवा महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशात अतिवृष्टी झाली आहे. सोयाबीन, मुग, उडीद व कापूस पावसाच्या माऱ्याने हिरावून नेले आहे. शेतीला तळ्याचे स्वरूप आले आहे. शेतात पाणी साचल्याने संपूर्ण पीक जळून खाक होण्याच्या मार्गावर आहे. आता शेतकऱ्यांपुढे जगावे की मरावे? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांना शेतात चांगले पीक आले तर घरी सुखाची झोप लागते आणि शेतातील पीक अतिवृष्टीच्या व निसर्गाच्या कचाट्यात सापडले तर शेतकरी हवालदिल होऊन चिंताग्रस्त झालेला असतो. त्याला सुखाची झोप येत नाही ना कुठे मन लागत नाही. हीच परिस्थिती सध्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर ओढवली आहे.

सध्या महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील शेतकरी निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकले आहेत. त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. नाहीतर शेतकरी आत्महत्या वाढत जातील, शेतकरी शेती पिकवणे थांबवतील आणि शेतकऱ्यांवाचून या जगाला उपाशी मरावे लागेल, एवढे मात्र नक्की.

शासनाला माझी विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांना सुखी करावे हेच शेतकरी तुम्हाला उद्या आणखीन सत्तेवर बसवल्याशिवाय राहणार नाहीत एवढे मात्र नक्की...



**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, जि. लातूर.**
**7498715661**

---

# गुगल गुरूचा वाढदिवस!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते.

अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते.

मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल ठेवण्यात आले.

गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो.

७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे.

१९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे.

जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

---



# महिनाभर कांदा-लसूण खाणे सोडा पहा, शरीरातील बदल!

आता नवरात्र सुरु आहे. जवळपास सर्वांचे उपवास आणि व्रत असतात. त्यामुळे जे लोक उपवास करतात किंवा देवीला नैवद्य दाखवतात ते लोक कांदे आणि लसूण अजिबात खात नाही.

काहींना रोज भाज्यांमध्ये कांदा लसणाची सवय असते किंवा काहींना जेवणासोबत रोज कांदा खाण्याची सवय असते. किमान महिनाभर जरी कांदा-लसूण खाणे सोडून दिले तर शरीरात काय फायदे होतील?

आयुर्वेदानुसार, कांदे आणि लसूण खाणे टाळल्याने तुमच्या शरीराला अनेक फायदे होऊ शकतात. कांदे आणि लसूण दोन्ही त्यांच्या तीव्र वासामुळे तामसिक पदार्थ मानले जातात. ज्यामुळे राग, मत्सर, घमंड, प्रसिद्धीची इच्छा, स्वकेंद्रितता आणि सांसारिक सुखांची प्रचंड इच्छा हे गुण वाढता. शिवाय, ते ॲलियम प्रजातीतील आहेत त्यामुळे ते शरीरात ॲन्ड्रोजन किंवा लैंगिक उत्तेजक म्हणून काम करणारे फिनोलिक फायटोकेमिकल्सने समृद्ध असतात.

आयुर्वेदानुसार, कांदे आणि लसूण लैंगिक शक्ती वाढवण्यासाठी आणि वंध्यत्वावर उपचार करण्यासाठी वापरले जातात. त्यांचे सेवन थेट मध्यवर्ती मज्जासंस्थेला उत्तेजित करते. त्यामुळे जे धार्मिक लोक आहेत ते कांदा, लसूण खाणे टाळतात.

कांदा आणि लसूण सोडल्याने शरीर आणि मन शुद्ध होते आणि शांत होते असे अनेक लोक मानतात, तर काहीजण म्हणतात की ते पचन आणि रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करू शकते. तर, सत्य काय आहे? कांदा आणि लसूण सोडल्याने खरोखरच आरोग्यावर लक्षणीय परिणाम होतो का ते फक्त एक मिथक आहे?

**शरीरातील उष्णता वाढू शकते** : लसूण आणि कांदा शरीराला थंडावा देतात. म्हणजेच ते शरीरातील उष्णता नियंत्रित करण्यास मदत करतात. जर तुम्ही अचानक ते खाणे बंद केले तर तुमच्या शरीरातील उष्णता वाढू शकते, ज्यामुळे डोकेदुखी, तोंडात अल्सर आणि त्वचेवर पुरळ उठू शकते.

**पचन समस्या वाढेल** : लसूण आणि कांद्यामध्ये नैसर्गिक बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतो. जे पचन सुधारण्यास मदत करतो आणि गॅस, बद्धकोष्ठता आणि आम्लता सारख्या समस्या कमी करतो. जर तुम्ही अचानक कांदा, लसूण खाणे बंद केले तर काही लोकांमध्ये पोटफुगी आणि अपचनाचा त्रास होऊ शकते.

**हृदयाच्या आरोग्यावर परिणाम** : लसूण हे नैसर्गिक रक्त पातळ करणारे मानले जाते, जे कोलेस्टेरॉलही नियंत्रित करण्यास आणि हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करते. ते टाळल्याने रक्तदाब वाढू शकतो आणि हृदयरोगाचा धोका किंचित वाढू शकतो.

लसूण आणि कांदे हे डिटॉक्सिफायिंग पदार्थ आहेत जे शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात. कांदा, लसूण खाणे अचानक बंद केले तर शरीरात विषारी पदार्थ जमा होऊ शकतात.

---

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## वैराग्य व त्याग..!

सांसरीक समस्यापायी
जो धारण करे वैराग्य
तो मनस्वी असे दुःखी
कसे उजळेल त्याचे भाग्य?

आधी येते वैराग्य मग
स्वखुशीने होतो त्याग
त्यात अहंपणाचा
इवलासाही नसतो डाग..!

खायला असून पंचपक्वान
जो करे स्वच्छेने एकादशी
तद्वत सुखे असता सेवेशी
जो स्वईच्छेने सर्व त्यागी
त्याला म्हणती खरा वैरागी ..!

---

**वाचक लिहितात**

### नवरात्र : शक्तीपूजा आणि स्त्रीसन्मान!

नवरात्रात देवीच्या विविध रूपांची पूजा म्हणजेच शक्तीची पूजा केली जाते. नवरात्र म्हणजे भक्ती आणि शक्तीचा संगम! आदिशक्तीची रुपे महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती यांची उपासना नवरात्रात केली जाते. वेद, पुराण, धर्मग्रंथ यामध्ये स्त्रीला शक्तीचे स्वरूप मानले आहे. यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता म्हणजे जिथे स्त्रीचा सन्मान होतो तिथे देवता वास करतात, असे मनुस्मृतीत सांगितले आहे.

पण आज समाजात मोठा विरोधाभास दिसून येतो. आजही समाजात स्त्रीला कमी लेखणे, तिला अपशब्द वापरणे, छेडछाड, अत्याचार, बलात्कार अशा घटना सुरूच आहेत. एका बाजूला देवीची आरती, पूजा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला दैनंदिन जीवनात स्त्री शक्तीला तुच्छ, अपमानास्पद वागणूक दिली जाते. असे केल्याने खरंच देवीची कृपा प्राप्त होईल का? नक्कीच नाही!

त्याकरिता आपल्या घरात, समाजात स्त्रीचा सन्मान व्हायला हवा. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलायला हवा. जेव्हा प्रत्येक स्त्रीला रोजच्या जीवनात सुरक्षितता, समानता आणि आदर मिळेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने नवरात्रोत्सव साजरा होईल.

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

# आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान



**अकोला, २६ सप्टेंबर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली 'आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान' देशभर सुरू होत आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती (२५ सप्टेंबर) ते भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जयंती (२५ डिसेंबर) या काळात हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा उद्देश प्रत्येक भारतीयाला स्वदेशी संकल्पाशी जोडणे, लोकसहभागातून राष्ट्रनिर्मितीला गती देणे आणि वोकल फॉर लोकल चा संदेश घराघरात पोहोचवणे असल्याचे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आणि डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी डोंबिवलीत केले. नमो रमो या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या गरबा कार्यक्रमस्थळी घर घर स्वदेशी हा संदेश देणाऱ्या महाकाय आकाश फुग्याचे अनावरण या वेळी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान अंतर्गत राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि मंडल पातळीवर कार्यशाळा, महिला व युवा संमेलन, व्यापारी व उद्योग परिषद, स्वदेशी मेळावे तसेच आत्मनिर्भर भारत संकल्प रथ यांसारखे विविध कार्यक्रम देशभर होणार आहेत. शेतकरी, महिला, युवक, कारागीर, छोटे दुकानदार, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक क्षेत्र तसेच व्यापारी व उद्योग क्षेत्र यामध्ये सक्रिय सहभाग होणार असून घर घर स्वदेशी या भावनेतून स्वदेशी उत्पादनांचा प्रसार, लघुउद्योगांना प्रोत्साहन आणि स्थानिक उद्योजकांना आधार देणे हा अभियानाचा मुख्य उद्देश राहणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती मोहीम, स्पर्धा, परिसंवाद, स्वदेशी मेळावे तसेच सोशल मीडियावर जनसंपर्क अभियान राबवले जाईल. मी फक्त स्वदेशी स्वीकारतो हा संकल्प लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, युवक व महिला यांच्याकडून करण्याचे नियोजन असल्याचे ते म्हणाले. या निमित्ताने #GharGharSwadeshi, #AtmanirbharBharat आणि #VocalForLocal या हॅशटॅगद्वारे या चळवळीला डिजिटल बळ दिले जाणार असून या अभियानाच्या माध्यमातून देशाची आर्थिक प्रगती, सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक आत्मनिर्भरता अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

समस्त महाराष्ट्रवासियांना नवरात्रीच्या शुभेच्छा देताना डोंबिवलीतील नमो रमो नवरात्रीच्या निमित्ताने गेली ८ वर्षे स्थानिक कारागीर, उत्पादक, महिला बचतगट आणि व्यावसायिकांना अगोदरपासूनच पाठबळ देत असल्याचे चव्हाण यांनी आवर्जून सांगितले. या प्रसंगी भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजपा महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस शशिकांत कांबळे, मंडल अध्यक्ष मितेश पेणकर, करण जाधव, धनाजी पाटील, सौ. प्रिया जोशी, शक्तिवान भोईर, रितेश फडके, पवन पाटील, लक्ष्मण पंत, परेश तेलंगे, विश्वजीत करंजुले, नितेश म्हात्रे, स्वप्निल काटे, समीर भंडारे, नवनाथ पाटील, माजी नगरसेवक मुकुंद (विशू) पेडणेकर तसेच सर्व पदाधिकारी आणि भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# एसबीआय कार्ड आणि इंडिगो यांची धोरणात्मक भागीदारी

**नागपूर, २६ सप्टेंबर :** एसबीआय कार्ड या भारतातील आघाडीच्या क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्या संस्थेने आणि इंडिगो या भारतातील लोकप्रिय विमान सेवेने इंडिगो ब्लूचिप लॉयल्टी प्रोग्रॅमचा एक भाग म्हणून इंडिगो एसबीआय कार्ड लाँच केले. हे प्रीमियम को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड इंडिगो एसबीआय कार्ड आणि इंडिगो एसबीआय कार्ड एलिट या दोन प्रकारांमध्ये आणले आहे. वारंवार प्रवास करणाऱ्या ग्राहकांसाठी अधिक फायदेशीर अनुभव देण्यासाठी हे कार्ड आणले आहे. ग्राहकांना इंडिगोच्या इकोसिस्टममधील सेवांवर केलेल्या खर्चावर तसेच हॉटेल आणि ट्रॅव्हल बुकिंगसह इतर अनेक श्रेणींवर रिवॉर्ड्स मिळतील. ग्राहक हे कार्ड एसबीआय कार्ड स्प्रिंटद्वारे डिजिटल पद्धतीने एसबीआय कार्डच्या एसबीआय कार्ड.कॉम या वेबसाइटवर जाऊन घेऊ शकतात. तसेच एसबीआय कार्डच्या रिटेल किऑस्कला भेट देऊन ऑफलाइन पद्धतीनेही घेऊ शकतात.

लाँचच्या प्रसंगी एसबीआय कार्डच्या व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सलीला पांडे म्हणाल्या, ग्राहककेंद्री संस्था म्हणून आम्ही त्यांच्या बदलत्या गरजा खऱ्या अर्थाने समजतो आणि म्हणूनच इंडिगोसोबत ही धोरणात्मक भागीदारी करून इंडिगो एसबीआय कार्ड आणले आहे. इंडिगो एसबीआय कार्ड हे अतुलनीय लाभ देणारे एक पॉवरफुल उत्पादन आहे. या कार्डमुळे प्रत्येक प्रवास अधिक फायदेशीर आणि सोयीस्कर होतो. आम्हाला विश्वास आहे की हे प्रीमियम क्रेडिट कार्ड आमच्या भक्कम को-ब्रँड कार्ड पोर्टफोलिओचा एक महत्त्वाचा भाग ठरेल.

इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स म्हणाले, इंडिगो ब्लूचिपद्वारे आम्ही आमच्या निष्ठावंत ग्राहकांसाठी मूल्यवर्धन वाढवण्याचे नवे मार्ग सतत शोधत आहोत. एसबीआय कार्डसोबतची आमची भागीदारी या प्रवासातील एक महत्त्वाचे पाऊल आहे. वारंवार प्रवास करणाऱ्या ग्राहकांसाठी मोठ्या प्रमाणावर उपयुक्तता, सोयी आणि फायदे देण्यासाठी हे को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड डिझाइन करण्यात आले आहे. या कार्डमुळे दैनंदिन खर्चाचे रूपांतर रिवॉर्ड देणाऱ्या ट्रॅव्हल एक्स्पिरियन्समध्ये होते. आमच्या ग्राहकांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल विशेष लाभ देण्यासाठी एसबीआय कार्डसोबत सहकार्य करण्यास आम्हाला आनंद होत आहे.

प्रवासाचा अनुभव नव्याने परिभाषित करण्याच्या उद्देशाने इंडिगो एसबीआय कार्डतर्फे वेलकम बेनिफिट्स आणि माइलस्टोन बेनिफिट्स देण्यात येतात. पहिल्या वर्षाचे वार्षिक शुल्क भरताना आणि पहिल्या व्यवहारावर ग्राहकांना ५,००० पर्यंत इंडिगो ब्लूचिप्स मिळतील. विशेष माइलस्टोन बेनिफिट्स समाविष्ट असलेल्या कार्डद्वारे ग्राहकांना इंडिगो एसबीआय कार्डवर वार्षिक रुपये २ लाखाच्या खर्चासाठी २,५०० इंडिगो ब्लूचिप्स मिळतात, तर इंडिगो एसबीआय कार्ड एलिटवर वार्षिक रुपये ३ लाख खर्चासाठी ६,००० इंडिगो ब्लूचिप्स मिळतात.

# अदाणी एनर्जी सोल्युशन्सला 'झिरो-वेस्ट-टू-लँडफिल' प्रमाणपत्र मिळाले

*अहमदाबाद, २६ सप्टेंबर : अदाणी एनर्जी सोल्युशन्सने सांगितले की आज त्यांच्या सर्व ऑपरेशनल साइट्स आणि कॉर्पोरेट हेडक्वार्टरला आंतरराष्ट्रीय गुणवत्ता हमी प्रदाता इंटरटेक कडून झिरो-वेस्ट-टू-लँडफिल (झेडडब्ल्यूएल) प्रमाणपत्र मिळाले आहे. कंपनीने १००% कचऱ्याचा पुनर्वापर केला आणि लँडफिलमध्ये कोणताही कचरा टाकला नाही.*

*झिरो-वेस्ट-टू-लँडफिल म्हणजे लँडफिलमध्ये जाणाऱ्या कचऱ्यापैकी किमान ९०% कचरा लँडफिलमध्ये टाकण्याऐवजी कमी करणे, पुनर्वापर करणे, रीसायकल करणे आणि पुनप्राप्त करणे. ही कचरा व्यवस्थापन धोरणे संसाधने जास्त काळ वापरात ठेवून नवीन कच्च्या मालाची गरज कमी करते आणि पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करण्यास मदत करते. हा टप्पा एईएसएलच्या ईएसजी प्रवासातील महत्त्वपूर्ण यश दर्शवतो, जो आर्थिक वर्ष २१ मध्ये सुरू झाला होता, जेथे कंपनीने स्वतःला जागतिक स्तरावर टॉप १० इलेक्ट्रिक युटिलिटी कंपन्यांमध्ये स्थान मिळवणे हे ध्येय ठेवले होते. गेल्या तीन वर्षांत, कंपनीने अनुक्रमे ९९.८७%, ९९.८८% आणि ९९.९९% कचरा पुनर्निर्देशन दर मिळवला, ज्यामुळे सलग तीन वर्षे ९९% पेक्षा जास्त कचरा पुनर्वापर दर राखणारी ती भारतातील पहिली ट्रान्समिशन कंपनी बनली. यावर्षीही एईएसएल ही एकमेव ट्रान्समिशन युटिलिटी आहे, जिच्या कचरा पुनर्वापर दराने १००% चा सुवर्ण आकडा गाठला आहे.*

*एईएसएलच्या ऑपरेशनल साइट्स १६ राज्यांतील ५४ ठिकाणी पसरलेले आहेत. या ठिकाणांपैकी बरीच ठिकाणे दुर्गम आणि कठीण प्रदेशात आहेत, त्यामुळे झेडडब्ल्यूएल प्रमाणपत्र मिळवणे आव्हानात्मक होते. हे यश कंपनीच्या मजबूत ईएसजी बांधिलकीचे प्रतीक आहे, जी कार्यकुशलता आणि शाश्वततेला एकत्र जोडते.*

# सारा अली खान स्ट्रीक्स शाइन हेअर सीरमचा नवीन चेहरा



**मुंबई, २६ सप्टेंबर :** स्ट्रीक्स या हायजिनिक रिसर्च इन्स्टिट्यूट प्रायव्हेट लिमिटेडच्या (एचआरआयपीएल) ब्रॅण्डने आपल्या स्ट्रीक्स शाइन हेअर सीरम या उत्पादनाचा चेहरा म्हणून बॉलिवूडमधील सर्वांची लाडकी अभिनेत्री सारा अली खानशी करार केला आहे. फ्रिझ गॉन, स्मूथ शाइन ऑन या टीव्हीसीद्वारे ब्रॅण्डने साराच्या गमतीशीर, आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकताना हे सीरम काही सेकंदात गुंता सोडवून केस कसे सुळसुळीत, चमकदार, मोकळे करते हेही दाखवले आहे.

चैतन्याने सळसळणारे व्यक्तिमत्व, ताजीतवानी मोहकता आणि शैलीची सहज समज या गुणांमुळे सारा अली खानमध्ये स्ट्रीक्सच्या आपल्या ग्राहकांना आत्मविश्वासाने चमकण्यात मदत करण्याच्या तत्त्वाचे प्रतिबिंब दिसते. नैसर्गिक दिमाख आणि सर्वांना आपलीशी वाटणारी छबी यांमुळे ती स्ट्रीक्स शाइन हेअर सीरम या केसाचा कायापालट करण्याच्या क्षमतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या उत्पादनाचा चेहरा म्हणून चपखल शोभून दिसते. हा सहयोग साजरा करण्यासाठी स्ट्रीक्सने साराचा सहभाग असलेल्या फ्रिझ गॉन, स्मूथ शाइन ऑन या आपल्या नवीन टीव्हीसी अभियानाची शुभारंभ केला आहे. गच्चीवर जोरात वाहणारा वारा आणि गर्दीतून करावे लागणारे प्रवास यांसारखे दैनंदिन क्षण या जाहिरातीत टिपण्यात आले आहेत, ज्या प्रसंगांमध्ये केसात अनपेक्षितपणे खूप गुंता होतो आणि स्ट्रीक्स शाइन हेअर सीरम लावले असता काही सेकंदात केस मुलायम, चमकदार आणि कॅमेरासाठी सज्ज कसे होतात हे या जाहिरातीत दाखवले आहे.

एचआरआयपीएलच्या मार्केटिंग विभागाच्या वरिष्ठ उपाध्यक्ष प्रियांका पुरी म्हणाल्या, स्ट्रीक्स चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी सारा अली खान हा परिपूर्ण चेहरा आहे. या चळवळीत केसांची काळजी घेणे हे केवळ उत्पादनापुरते मर्यादित नाही, तर आत्मविश्वासासाठी व दैनंदिन शैलीसाठी ते आवश्यक आहे. केस गुंतण्याचा त्रास प्रत्येकीला कुठेही होऊ शकतो आणि स्ट्रीक्स शाइन हेअर सीरम हा गुंत्याचे रूपांतर काही क्षणात मुलायम, चमकदार, कॅमेरासाठी सज्ज केसामध्ये करणारे एक सोपे, दैनंदिन उत्पादन आहे ही कल्पना फ्रिझ गॉन, स्मूथ शाइन ऑनचा घोषवाक्याद्वारे प्रत्यक्षात येते. या कथेत सारा जान आणत असल्यामुळे देशभरात आत्मविश्वास व शैलीच्या जोरावर दररोज चमकत राहण्याच्या नवीन लाटेला प्रेरणा देण्यास सज्ज झालो आहोत.

सारा अली खान या सहयोगाबद्दल उत्साह व्यक्त करत म्हणाली, मी स्ट्रीक्स परिवारात सामील होण्यासाठी खरोखर उत्सुक आहे. माझ्यासाठी केस केवळ रचनेपुरते नाहीत, तर तो आत्मविश्वासाचा व स्वअभिव्यक्तीचा भाग आहे. स्ट्रीक्स शाइन हेअर सीरमची मला खूप आवडणारी गोष्ट म्हणजे ते सीरम केसाला तत्काळ मुलायम आणि चमकदार करते आणि ते लावणाऱ्या व्यक्तीला एक परिपूर्ण रूप देते.

# सॅमसंगकडून गॅलेक्सी ए५६ ५जी आणि गॅलेक्सी ए३६ ५जी मध्ये नवीन रंग



**मुंबई, २६ सप्टेंबर :** भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड असलेल्या सॅमसंगने आज सणासुदीच्या काळात ट्रेंडी स्मार्टफोन खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी गॅलेक्सी ए५६ ५जी आणि गॅलेक्सी ए३६ ५जीमध्ये तरूणांच्या आवडीचे रंग आणले आहेत. गॅलेक्सी ए५६ ५जी आता ऑसम पिंक रंगात तर गॅलेक्सी ए३६ ५जी ऑसम लाइम रंगात उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहकांना अधिक पर्याय मिळतात.

गॅलेक्सी ए५६ ५जी आणि गॅलेक्सी ए३६ ५जीसह सॅमसंग आमच्या प्रमुख उपकरणांमधून सर्वात आवडत्या एआय नवकल्पनांना लोकशाहीकृत करण्याचे उद्दिष्ट ठेवते. मर्यादित कालावधीसाठी, ग्राहक गॅलेक्सी ए५६ ५जी आणि गॅलेक्सी ए३६ ५जीवर शून्य डाउन पेमेंट, शून्य व्याज आणि शून्य त्रासाचा आनंद घेऊ शकतात. त्यामुळे ५जी अनुभव पूर्वीपेक्षा अधिक सुलभ होतात.

गॅलेक्सी ए५६ ५जी सध्या ऑसम ऑलिव्ह, ऑसम लाइट ग्रे आणि ऑसम ग्राफाइटमध्ये उपलब्ध आहे तर गॅलेक्सी ए३६ ५जी ऑसम लव्हेंडर, ऑसम ब्लॅक आणि ऑसम व्हाइटमध्ये उपलब्ध आहे. गॅलेक्सी ए५६ ५जीमध्ये मेटल फ्रेम असून ती स्टायलिश आणि मजबूत आहे आणि कॉर्निंग गोरिल्ला ग्लास व्हिक्टस+ प्रोटेक्शनसह येते. त्यामुळे तो या सेगमेंटमधील सर्वात टिकाऊ स्मार्टफोनपैकी एक बनतो. कॅमेरा सेटअप बिग पिक्सेल सेन्सरसह येतो, ज्यामुळे वापरकर्त्यांना चमकदार फोटो आणि ब्लर-फ्री व्हिडिओ कॅप्चर करता येतात. दोन्ही स्मार्टफोनमध्ये ५०एमपी ओआयएस मेन, १२एमपी अल्ट्रा-वाइड, ५मेगापिक्सेल मॅक्रो आणि १२ मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरे आहेत जे विविध प्रकाश परिस्थितीत तीक्ष्ण, स्थिर शॉट्स देतात. प्रगत ४ एनएमवर आधारित एक्झिनोस १५८० प्रोसेसरद्वारे समर्थित, गॅलेक्सी ए५६ ५जीमध्ये सुधारित कूलिंग आणि स्मूथ मल्टी-टास्किंग, स्ट्रीमिंग आणि गेमिंगसाठी १२ जीबीपर्यंत रॅम आणि २५६ जीबीपर्यंत स्टोरेज आहे. १२००-नाइट व्हिजन बूस्टरसह मोठा ६.७-इंचाचा एफएचडी+ सुपर अमोलेड डिस्प्ले कोणत्याही प्रकाशात तेजस्वी, तल्लीन करणारा पाहण्याचा अनुभव सुनिश्चित करतो.

गॅलेक्सी ए३६ ५जीमध्ये परिष्कृत डिझाइन आणि विश्वासार्ह कामगिरी यांचा मेळ आहे. हे प्रगत ४एनएमवर आधारित क्वालकॉम स्नॅपड्रॅगन प्रोसेसरसह येते. त्यात १५% मोठे व्हेपर चेंबर आणि एका चार्जमध्ये २९ तासांचा व्हिडिओ प्लेबॅक सहज कामगिरी देतो. गॅलेक्सी ए३६ ५जीमध्ये ५० एमपी ओआयए मेन, ८एमपी अल्ट्रा-वाइड, ५एमपी मॅक्रो आणि १२ एमपी फ्रंट कॅमेरा आहे.

गॅलेक्सी ए५६ ५जी आणि गॅलेक्सी ए३६ ५जी वापरकर्त्यांसाठी सुधारित वैशिष्ट्ये आणत आहेत. हे सर्वश्रेष्ठ मोबाइल एआय सूट, अ‍ॅडव्हान्स्ड एआय फंक्शन्ससह ऑसम इंटेलिजेंसमुळे शक्य झाले आहे. दोन्ही स्मार्टफोन जेमिनी लाईव्हसह येतात आणि गॅलेक्सी वापरकर्त्यांसाठी एआयसह रिअल-टाइम व्हिज्युअल संभाषणे आणतात. सर्कल टू सर्च विथ गुगल फीचर वापरकर्त्यांना वर्तुळ, हायलाइटिंग किंवा टॅप करून स्क्रीनवर काहीही त्वरित शोधणे शक्य होते तर ऑब्जेक्ट इरेजर फीचर पार्श्वभूमीतील व्यत्यय दूर करते. त्यामुळे दैनंदिन कामे आणि फोटो एडिटिंग सोपे होते.

## क्रोमा येथे फेस्टिव्हल ऑफ ड्रीम्सचा उत्सव सुरू



**नागपूर, २६ सप्टेंबर :** क्रोमा या टाटा समूहातील ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर कंपनीने वार्षिक फेस्टिव्हल ऑफ ड्रीम्स मोहिमेच्या माध्यमातून सणासुदीचा उत्सव सुरू केला आहे. या मोहिमेत ग्राहकांसाठी अत्यंत आकर्षक ऑफर्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सणाच्या दिवसातील आनंद आणि उत्साह वाढवण्यासाठी या ऑफर्स खास तयार केलेल्या आहेत.

स्मार्टफोन, टीव्ही, वॉशिंग मशीन, लॅपटॉप आणि रेफ्रिजरेटर यांसह इतर उत्पादनांवर ग्राहक सवलत, कॅशबॅक, ईएमआय आणि एक्सचेंज यांचे उत्कृष्ट फायदे मिळवू शकतात. तसेच जीएसटी करामध्ये सुधारणा झाल्यामुळे टीव्ही आणि एसीवर अतिरिक्त १० टक्के बचत साधता येऊन आपली घरगुती उपकरणे अद्ययावत करणे त्यांना अधिक फायदेशीर होणार आहे. देशातील दोनशेहून अधिक शहरांमधील क्रोमाच्या ५६० हून अधिक स्टोअर्समध्ये, तसेच croma.com व Tata Neu या अ‍ॅपद्वारे ग्राहकांना ही खरेदी अगदी सहज करता येईल. स्वतःसाठी खरेदी करणे असो वा मित्र-परिवारासाठी सणासुदीचे गिफ्ट निवडणे असो, ग्राहकांना सर्वोत्तम योजनांचे लाभ निश्चित मिळतील.

इंफिनिटी रिटेल लिमिटेडच्या प्रवक्त्याने या संदर्भात सांगितले, सणासुदीची खरेदी सहजसोपी, आनंददायी आणि तणावमुक्त असावी, या हेतूने आम्ही दसरा, धनत्रयोदशी, दिवाळी आणि भाऊबीजेच्या आसपास खास ऑफर्स आणि सर्वात आवडत्या श्रेणींवर थेट बचत अशा अनेक ऑफर्स सादर करीत आहोत. यामुळे प्रत्येक भारतीय घरात उत्सवाचा अतिरिक्त आनंद निर्माण होईल. आमच्या ग्राहकांना फेस्टिव्हल ऑफ ड्रीम्सच्या माध्यमातून त्यांच्या प्रियजनांसोबत सणासुदीचे आनंदी आणि समाधानकारक अनुभव घेता यावेत, असे आमचे प्रयत्न आहेत.

क्रोमातील कनेक्टेड शॉपिंगच्या अनुभवामुळे ग्राहकांना ऑनलाइन उत्पादने शोधणे, स्टोअरवरून घेणे, तज्ञांच्या मदतीसह खरेदी करणे आणि पेपरलेस चेकआऊट यांचा लाभ घेणे सोयीस्कर होते. सर्व प्लॅटफॉर्म्सवर एकसंध प्रमोशन्स असल्यामुळे, स्टोअरमध्ये जाऊन किंवा ऑनलाइन पद्धतीने खरेदी करताना ग्राहकांना समान मूल्य मिळते. आपल्या नजीकच्या क्रोमा स्टोअरमध्ये जाऊन ग्राहक पूर्ण सणासुदीची रेंज पाहू शकतात. तेथे त्यांना आमच्या टीमकडून मॉडेल्समधील तुलना, एक्सचेंज व बँक ऑफर्स, डिलिव्हरी / इंस्टॉलेशन यांमध्ये मदत होईल. ऑनलाइन खरेदी करणाऱ्यांसाठी याच समान ऑफर्स, तसेच सोयीस्कर डिलिव्हरी आणि ऑर्डर ट्रॅकिंग उपलब्ध आहे.

## जागतिक पर्यटन दिनानिमित्त एण्ड टीव्ही अभिनेत्रींनी पर्यटन आठवणींना उजाळा दिला!




**मुंबई, २६ सप्टेंबर :** पर्यटन म्हणजे फक्त नवीन स्थळांचा शोध घेण्यापर्यंत मर्यादित नाही तर स्वतःमधील क्षमतांचा शोध घेणे, कालातीत आठवणी निर्माण करणे आणि क्षणांचा आनंद घेणे देखील आहे, जे आनंद, शांतता देण्यासोबत प्रेरित करतात. जागतिक पर्यटन दिनानिमित्त एण्ड टीव्ही अभिनेत्रींनी नुकतेच आनंद घेतलेल्या पर्यटनाबाबत अनुभव, तसेच साहसी गाथा, कुटुंबासोबत व्यतित केलेला वेळ आणि उत्साहपूर्ण ट्रिपबाबत सांगितले. या अभिनेत्री आहेत प्रियमवदा कांत (एण्ड टीव्हीवरील आगामी मालिका 'घरवाली पेडवाली' मधील लतिका), सपना सिकरवार (मालिका 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (मालिका 'भाबीजी घर पर है' मधील अंगूरी भाबी).

मालिका 'घरवाली पेडवाली' मधील प्रियमवदा कांत ऊर्फ लतिका म्हणाल्या, ''यावर्षी मला जपानला जाण्याची अविस्मरणीय संधी मिळाली आणि तो अनुभव अत्यंत जादुई होता. क्योटोमधून माझ्या प्रवासाला सुरुवात झाली, जेथे प्रसन्न मंदिरे व प्राचीन परंपरा पाहून मला जुन्या काळात गेल्यासारखे वाटले. त्यानंतर मी टोकियो शहरामध्ये गेले, जे कधीच थांबत नाही. जपानची संस्कृती, उबदारपणा आणि पाककलाने माझे लक्ष वेधून घेतले, ज्यामुळे ट्रिप शोध, उजाळा आणि नवीन पैलूंच्या प्रवासामध्ये बदलली.'' मालिका 'हप्पू की उलटन पलटन' मधील सपना सिकरवार ऊर्फ बिमलेश म्हणाल्या, ''या वर्षाच्या सुरूवातीला मी माझ्या कुटुंबासोबत थायलंडला गेले होते आणि ती वर्षातील सर्वात उत्साहवर्धक ट्रिप ठरली. आकर्षक समुद्रकिनारे, उत्साही बाजारपेठा आणि तोंडाला पाणी आणणाऱ्या थाय पाककला यांनी प्रत्येक क्षण संस्मरणीय केला. फुकेटमध्ये आम्ही नयनरम्य सौंदर्यामध्ये भारावून गेलो, बोट राइडचा आनंद घेतला आणि वॉटर स्पोर्ट्ससह साहसी कृत्यांचा देखील अनुभव घेतला. बँकॉकमधील मंदिरांना भेट दिल्यानंतर शांतमय भावनेचा अनुभव मिळाला, जेथे आम्ही उत्साहासह शांतमय क्षणांमध्ये भारावून गेलो.''

मालिका 'भाबीजी घर पर है' मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''मी नुकतेच शिकागोमध्ये सुट्टीदरम्यान माझ्या मुलीचा वाढदिवस साजरा केला आणि तो सर्वात संस्मरणीय अनुभव ठरला. विलीज टॉवर येथे उल्लेखनीय दृश्ये पाहण्यापासून लेक मिशिगनवरून शांतमय चालण्याचा आनंद घेण्यापर्यंत प्रत्येक क्षण खास वाटला. पण माझ्या मुलीसोबत हे अनुभव शेअर करण्याचे क्षण अमूल्य ठरले, तिच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मला देखील खूप आनंद झाला. या प्रवासानंतर मी युनायटेड स्टेट्समध्ये गेले, जेथे भरपूर एक्स्प्लोअर केले आणि प्रत्येक गंतव्याची स्वतःची अद्वितीय मोहकता आहे.''

## शब्दकोडे क्रमांक २२२५



**आडवे शब्द :-**
१) रक्षा
२) अहोरात्र
५) संतापी
७) वारा
९) भ्रम, भ्रांती
१०) सुरुच्या झाडाचा चीक
११) माळ, सर
१२) धोड्यावरून मारलेली फेरी
१४) विल्हेवाट, निकाल
१५) तात्काळ
१८) मोठी वाटी
१९) हत्तीचा छावा
२०) सत्ता
२१) रजत, रुपे
२३) सुंदर तरुणी
२५) मुलाची किंवा मुलीची मुलगी
२७) उपकार
२८) हातात हात घेऊन अभिवादन करण्याची क्रिया
३१) लाजणारा
३२) माल साठविण्याची जागा
३३) कच्चा लाकडी पूल
३७) नट्टापट्टा
३९) एकावर एक रचलेले
४१) रस्ता
४३) कुबेराचा सेवक
४४) माकडातील एक प्रकार
४५) वाकडा नसलेला
४७) पर्वत, वस्तू
४८) मलई
४९) एक प्रश्नार्थक शब्द
५१) न सुटणारा विळखा
५१) वयाने जास्त असलेली वधू
५३) झाडावर पिकू लागलेले फळ
५४) छोटा सुरा
५५) शोक, दुःख
५७) दरवाजा
५९) ठोक, हाण
६१) यात्रेस जाणे
६२) दुर्दशा, दुश्चिन
६३) आश्चर्याची गोष्ट,
६४) देव
६६) कारस्थान
६७) खून, वध, हत्या
६९) अस्तावस्त पसरलेले सामान
७०) चामखीळ
७२) दुप्पट
७४) श्रीकृष्णाचे एक नाव
७७) छातीत होणारा भीतीचे ठोके
७९) लाज
८०) हजार शेराचे वजन

**उभे शब्द :-**
१) मीठ
२) ढीग
३) पूर्ण चोवीस तास
४) नवऱ्याची दुसरी पत्नी
५) प्रफुल्लित, टवटवीत
६) कडक
७) जमीन खोदण्याचे एक हत्यार
८) नवरदेव
९) स्तुती करणारा,
१३) पोट (हिं.)
१४) एक द्विदल धान्य
१६) नवऱ्याची वा बायकोची आई
१७) खटला दाखल करणारा
२१) भला
२२) हेलकावा, चळवळ
२४) मनातील कल्पना
२६) तळे, सरोवर
२८) हेळसांड दुर्लक्ष
२९) लग्नातील वर-वधू
३०) व्रत
३४) पंकज
३५) पवित्र
३६) पुत्र, मुलगा
३८) मावा
४०) द्रवपदार्थ
४१) घोंगड्या विणणारी जमात
४२) ढाळ, उतरणे, टेकडी
४६) रक्कम, ठराविक पैसे
४८) ** बुद्धी नाठी
५०) काळजी, फिकीर
५१) माकडांना खेळविणारा
५२) मिश्रण, भेसळ
५३) बाजीप्रभुंनी लढविलेली जागा
५४) अरुंद तोंडाचे चिंचोळे पात्र
५६) शेतकऱ्यांना सरकारने दिलेले कर्ज
५८) बैलाचा सण
५९) रेलचेल विपुलता
६०) श्रीमंत
६१) घाव, प्रहार
६२) गुन्हा
६५) श्वासोच्छ्वासाची क्रिया
६६) कशा प्रकारचा
६७) शस्त्र,
६८) वाकण्याची क्रिया
६९) पडणे
७०) पुष्परस
७१) सडलेला
७३) बगळा
७४) अवस्था, स्थिती
७६) थाळी
७८) एक छोटे चर्मवाद्य

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



# डीएसपी म्युच्युअल फंड तर्फे भारतातील पहिला फ्लेक्सीकॅप ईटीएफ फंड – डीएसपी निफ्टी ५०० फ्लेक्सीकॅप क्वालिटी ३० ईटीएफ योजनेचा शुभारंभ

**मुंबई, २६ सप्टेंबर :** डीएसपी म्युच्युअल फंडाने गुंतवणूकदारांसाठी डीएसपी निफ्टी ५०० फ्लेक्सीकॅप क्वालिटी ३० ईटीएफ या नवीन फंडाचा शुभारंभ करत असल्याची आज घोषणा केली. हा फंड भारतातील पहिला फ्लेक्सी कॅप एक्सचेंज ट्रेडेड फंड (ईटीएफ) आहे. हा फंड ईटीएफ निफ्टी ५०० फ्लेक्सीकॅप क्वालिटी ३० टीआरआय* या निर्देशांकानुसार आपली वाटचाल करणार आहे. हा निर्देशांक मानक बिंदू असून ईटीएफ फंड त्याच्या आधारे दर्जेदार व्यवसायांवर लक्ष केंद्रित करताना लार्ज, मिड आणि स्मॉल-कॅप कंपन्यांमध्ये गतिमान पध्दतीने गुंतवणूक करणार आहे.

भारतीय शेअर बाजार अनेकदा प्रवाहानुसार सतत चढउतार दर्शवतो. या प्रवाहामध्ये लार्ज, मिड आणि स्मॉल कंपन्या टप्प्याटप्प्यात चांगली कामगिरी करतात. परंतु बहुतांश गुंतवणूकदारांसाठी, कोणत्या समभागामध्ये गुंतवणूक करायची, किती निधी गुंतवायचा आणि समभागातून केव्हा आपली गुंतवणूक इतरत्र वळवायची, हे ठरविणे अतिशय कठीण असते. परंतु त्याचबरोबर खूप खर्चिकही असते.

ही गुंतागुंत ईटीएफ फंड सहज दूर करतो. मिड आणि स्मॉल कंपन्यांचे समभाग वेगाने वाटचाल करत असताना फ्लेक्सीकॅप ईटीएफ फंड अतिशय पारदर्शक पध्दतीने आणि नियमांच्या चौकटीत या समभागांमधील गुंतवणूक स्वयंचलित पध्दतीने वाढवत जातात. जेव्हा हे समभाग शिखर पातळीवर पोहचतात, त्यावेळी या समभागांमधील गुंतवणूक काढून ती लार्ज कॅप समभागांमध्ये गुंतविली जाते. समभागांच्या निवडीसाठी अतिशय कठोर निकष वापरले जातात. त्यामुळे मूलभूतपणे अतिशय मजबूत असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूकदाराचा निधी राहील, याची शाश्वती यातून मिळते.

नवीन फंडाच्या शुभारंभप्रसंगी बोलताना डीएसपी म्युच्युअल फंडाच्या पॅसिव्ह इन्व्हेस्टमेंट्स अँड प्रोडक्ट्स विभागाचे सीएफए (प्रमुख) अनिल घेलानी म्हणाले, दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी लवचिकता आणि गुणवत्ता या दोन शक्तिशाली संकल्पना आहेत. या ईटीएफद्वारे, आम्ही गुंतवणूकदारांना असा पर्याय सादर करत आहोत, जो सतत देखरेख किंवा गुंतवणूकीचे हस्तांतरण करण्याची आवश्यकता न पडता शेअरबाजाराच्या विविध टप्प्यांशी स्वयंचलित पध्दतीने जुळवून घेतो. त्याचवेळी, केवळ दर्जेदार कंपन्यांवर लक्ष केंद्रित करत दीर्घकाळ कार्यरत राहणाऱ्या कंपन्यांमध्येच पैसे गुंतविले जातात, हा विश्वास गुंतवणूकदारांना प्रदान करणे, हे या ईटीएफ फंडाचे मुख्य उद्दीष्ट आहे.

डीएसपी म्युच्युअल फंडाच्या पॅसिव्ह फंड्स विभागाचे व्यवसाय प्रमुख गुरजीत कालरा म्हणाले, भारतीय बाजारपेठेत फ्लेक्सी कॅप धोरणाचा अभाव आहे. बहुतांश विविधांगी फंड किंवा फ्लेक्सीकॅप फंड हे मिड आणि स्मॉल कॅप गटातील समभागांत अतिशय मर्यादित प्रमाणात निधी गुंतवतात. डीएसपी निफ्टी ५०० फ्लेक्सीकॅप क्वालिटी ३० ईटीएफ फंडामुळे गुंतवणूकदारांना अखेर एकाच फंडाच्या आधारे लार्ज, मिड आणि स्मॉल समभागांमध्ये गुंतवणूक करण्याचा एक सोपा, पारदर्शक आणि अल्प खर्चिक मार्ग उपलब्ध झाला आहे. दीर्घ कालावधीत संपत्ती निर्मितीसाठी हा फंड सर्व परिस्थितींमध्ये योग्य पर्याय प्रदान करू शकतो.

# कलाकारांनी आपल्या मुलींसोबतचे नाते आणि त्यांच्याकडून आपल्याला मिळालेल्या प्रेरणेचे रहस्य उलगडले

**मुंबई, २६ सप्टेंबर :** मुलींना अनेकदा पालकांचे सर्वात चांगले मित्र म्हटले जाते. त्या बदलत्या काळात प्रेम, हास्य आणि जीवनाचे धडे देऊन त्यांना मार्गदर्शन करतात. या बालिका दिनानिमित्त चे कलाकार त्यांच्या मुलींसोबत असलेल्या त्यांच्या खास नात्याबद्दल आणि या तरुण मुली त्यांना अनपेक्षित मार्गांनी कशा प्रकारे प्रेरणा देतात याबद्दल मोकळेपणाने बोलतात. यात हर्ष वशिष्ठ (रमेश, घरवाली पेडवाली), योगेश त्रिपाठी (हप्पू सिंग, हप्पू की उलटन पलटन) आणि रोहिताश्व गौर (मनमोहन तिवारी, भाभीजी घर पर है) यांचा समावेश आहे. ते आपल्या मुली केवळ आपले जग तर पूर्ण करतातच पण आपल्या नवीन ऊर्जा देतात आणि आनंदाने जीवन कसे स्वीकारायचे हेदेखील शिकवतात. घरवाली पेडवाली या आगामी शोमधील हर्ष वशिष्ठ उर्फ रमेश म्हणतो, बाप होण्याचा अनुभव मला खूप भाग्यवान वाटतो. हप्पू की उलटन पलटनमधील योगेश त्रिपाठी उर्फ दरोगा हप्पू सिंग म्हणतो, माझी चार वर्षांची मुलगी खऱ्या अर्थाने माझ्या आयुष्याचा प्रकाश आहे. तिचे निरागस हास्य, जिज्ञासू छोटे डोळे आणि त्यातील चमक मला खूप आनंद देतात. ती मला दररोज एक चांगला माणूस आणि अधिक प्रेमळ वडील बनण्यासाठी प्रेरणा देते. इतकी लहान असूनही ती मला मौल्यवान धडे शिकवते – जसे की वर्तमानात जगणे आणि साध्या गोष्टींमध्ये आनंद शोधणे. तिला मोठे होताना, शिकताना आणि एक्सप्लोर करताना पाहणे हा सर्वात मोठा आशीर्वाद आहे. ती माझ्यासाठी सर्वकाही आहे आणि मी नेहमीच तिचा सतत आधार, तिचा विश्वासू आणि तिचा सुपरहिरो राहण्याचे वचन देतो. ती माझी सूर्यप्रकाश आहे आणि नेहमीच राहील. भाभीजी घर पर है मधील रोहिताश्व गौर उर्फ मनमोहन तिवारी म्हणतात, माझ्या मुली माझी सर्वात मोठी ताकद आणि माझे सर्वात आनंदी साथीदार आहेत. त्या माझे आयुष्य प्रेमाने भरतातच पण मला मनाने तरुण देखील ठेवतात. आजकाल त्या मला जनरेशन झेडची स्टाइल शिकवतात! मला अनेकदा आश्चर्यचकित करणाऱ्या नवीन अपशब्दांशी ओळख करून देण्यापासून ते सोशल मीडियावर काय ट्रेंडिंग आहे हे धीराने समजावून सांगण्यापर्यंत त्या मी अपडेट राहीन याची खात्री करतात. आमच्या आवडत्या गंमतीजमतींपैकी एक म्हणजे एकत्र मजेदार रील बनवणे. मी कदाचित एडिटिंगमध्ये गडबड करेन परंतु त्या मला लहान शिक्षकांसारखे मार्गदर्शन करतात. त्यांच्याकडून मला हे नवीन युग अधिक चांगल्या प्रकारे समजते आणि मी या सुंदर शिक्षण प्रवासाच्या प्रत्येक क्षणाचा आनंद घेतो.

# सोयाबीन, तूर, पऱ्हाटी कृषी कार्यालयात फेकले

## मंत्र्यांना जिल्हाबंदीचा इशारा : ओला दुष्काळची मागणी



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २६ :

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात सर्वदूर हाहाकार उडाला असून, सर्व प्रकारची शेतीपिके नष्ट झाली आहेत. या पार्श्वभूमीवर ओला दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी करत शिवसेना उद्धव ठाकरे पक्षातर्फे बुधवारी २४ सप्टेंबरला आंदोलन केले . शिवसैनिकांनी कृषी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात धडक देत तेथे सोयाबीन, तूर, पऱ्हाटी फेकली. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. दरम्यान मागणीनुसार निर्णय न झाल्यास भविष्यात मंत्र्यांना जिल्ह्यात दौरे करु दिले जाणार नाही, असा इशाराही या वेळी देण्यात आला आहे.

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता पोलिसांना पाचारण करण्यात आले होते. त्यामुळे संतप्त आंदोलनकर्ते अधिकच भडकले होते. त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत शासनाला तातडीने आमच्या भावना कळवून ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली. या वेळी झालेल्या चर्चेमुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. गेल्या दोन महिन्यांपासून जिल्ह्यात अधूनमधून मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. त्यामुळे चांगली बहरलेली शेतिपिके काही भागात अक्षरश: वाहून गेली, तर काही भागात अनेक दिवस पावसात राहिल्यामुळे सडली.

अशा स्थितीत भविष्यात शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानाचा सामना करावा लागणार, हे अटळ आहे. त्यामुळेच शासनाने ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली जात आहे.

शेतीपिकांची नेमकी नासाडी कशी झाली, याची वास्तविक स्थिती पुढे यावी म्हणून कृषी अधिकाऱ्याच्या कक्षात घुसून संबंधित अधिकाऱ्यांच्या दिशेने सोयाबीन, तूर, पऱ्हाटीच्या पेंड्या फेकल्या, असे शिवसेना जिल्हाप्रमुखांचे म्हणणे आहे.

त्यासाठीच आम्ही शासनाकडे याचना करित असून, त्वरेने जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. गेल्या काळात अतिवृष्टी झाल्यामुळे अमरावती जिल्हाच नव्हे तर महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या शेतात पाण्याचे लोट वाहून हाहाकार उडाला आहे त्यामुळे शेतातील सोयाबीन, तूर, कापूस व अन्य पिके शेतातच सडून गेली आहे.

परिणामी शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. पंचनामे आणि इतर सोपस्कार यामुळे शेतकरी सतत नाडवले जात आहे, अशी संतप्त चर्चाही या वेळी संबंधित अधिकाऱ्यांसोबत करुन त्यांना धारेवर धरण्यात आले.दरम्यान सरकारने सरसकट पंचनामे करून नुकसान झालेल्या सर्व पिकांची पाहणी करावी, जिल्हा कृषी अधिकारी, तहसीलदार व अन्य अधिकाऱ्यांनी बांधावर जाऊन ही पाहणी करावी तसेच जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर होईल, असा वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे पाठवावा, असेही या वेळी बजावण्यात आले.

अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी न करता इतर कामांमध्ये व्यस्त असणाऱ्या मंत्र्यांवरही या वेळी टीका करण्यात आली.

एवढेच नव्हे तर मागणीनुरुप निर्णय न घेतल्यास एकाही मंत्र्याला अमरावती जिल्ह्यात फिरू देणार नाही, असा इशारा देण्यात आला. या वेळी जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांच्यासह नरेंद्र पडोळे व मनोज कडू यांच्यासह विजय ठाकरे, प्रमोद धनोकार, कपिल देशमुख, नितीन हटवार, शिवराज चौधरी, सचिन ठाकरे, वैभव मोहोकार, आदित्य ठाकरे, राजेश बंड, रामा सोळंके, बिजय जामोदकर, बिजय पाचगरे, दिलीप काळे, प्रदीप गौरखेडे,सतीश हरणे उपस्थित होते.

# वरुड येथे बिरसा क्रांती दलाच्या जिल्हाध्यक्षासह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



■ महासागर प्रतिनिधी
वरुड, दि. २६ : पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्त वरुड येथे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्या निवासस्थानी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या उपस्थितीत प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. भारतीयांसाठी आपलं अखंड आयुष्य समर्पित करणारे, 'एकात्म मानवतावाद' या उदात्त विचारधारेचे प्रणेते असलेले पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे कार्य आणि तत्त्वज्ञान प्रत्येक भारतीयाला आजही प्रेरणा देत असून सर्वांसाठी मार्गदर्शक आहे. असे प्रतिपादन यावेळी रविराज देशमुख यांनी केले. देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून सध्या भारतीय जनता पार्टी केंद्रात आणि राज्यात बहुमताने सत्तेवर आहे. छोट्या कार्यकर्त्यांपासून तर बड्या नेत्यांपर्यंत प्रत्येकाचे पक्षासाठी योगदान असून पक्षामध्ये प्रवेश सुद्धा जोरात सुरू आहे. त्याच दृष्टीने दिनांक २५ सप्टेंबर रोजी वरुड येथे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख व वरुड-मोर्शी विधानसभेचे आमदार उमेश उर्फ चंदूभाऊ यावलकर यांच्या नेतृत्वात बिरसा क्रांती दलाचे अमरावती जिल्हाध्यक्ष प्रा. कमलनारायण उईके व त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीत पक्षप्रवेश पार पडला. प्रवेश करणाऱ्या मध्ये झटमझिरीचे सरपंच तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक हिराकांत उईके, इघऊ तालुका कोषाध्यक्ष नितेश उईके, सीमा हिराकांत उईके, लालू युवनाते, राज उईके, महादेव कवडे, बलीराम सलामे, संजय परतेती, संजय युवनाते, सचिन कुमरे, गजानन धुर्वे, गजानन सलामे, गजानन आपकाजे, प्रवीण लांजेवार, अजय धुर्वे, साहेबराव आहाके, मुन्ना कुमरे, मनोहर धुर्वे, गोलू उईके, मोतीराम धुर्वे, राज उईके, मोतीराम धुर्वे, अक्षय भलावी, राजेश धुर्वे, सुरज युवनाते, मयूर पांडे, आशिष बावणे, सुमित सोनारे, योगेश नागवंशी, गजानन आपकाजे, सचिन कमरे, नितेश धुर्वे, रोशन बिलगये, अरमान शाह, राजेंद्र भोसले, गौरव बिलगये, रामदयाल मरसकोल्हे, प्रकाश मरसकोल्हे, दिनेश उईके, महेंद्र कोडापे, रवींद्र कोडापे, रोशन सलामे, सौरभ नागले, रोहित मसराम, दीपक धुर्वे, हर्षल नागले, दिलीप मसराम, यशवंतीताई धुर्वे, रोशनखेडा सरपंच रिंकी ताई धुर्वे, संगीताताई इडपाची, दीपक अधाऊ, गुलशन साखरे, धामणधसचे मनोज उईके, गुलाब कवडेती, रामसिंग उईके, जामगाव ग्रामपंचायत सदस्य संजय युवनाते, विशाल धुर्वे, आकाश धुर्वे, प्रशांत सर्याम, राजकुमार कुमरे, वनराज युवनाते, राम उईके, आकाश धुर्वे, सूरज होसरे, अंकुश पाटील, शरद धुर्वे, राकेश परतेती, माजी पोलिस उपनिरीक्षक देवदास उईके, अरविंद परतेती, सोनू उईके, जयपाल कुमरे, रियाझ खान, सादिक पठाण, संजय परतेती, जानराव परतेती, जीवन परतेती, दीपक उईके, कमलेश उईके, रवी यादव, गणेश इडपाची, शाम धुर्वे, विनोद धुर्वे, राहुल उईके, मुकेश धुर्वे, धनराज धुर्वे, विजय कवडेती, चैतराम उईके, गुलाब कवडेती, प्रवीण धुर्वे, दिलीप युवनाते, रवी इडपाची, गणेश उईके, विनोद सिरसाम, लखन आहाके, कैलास सलामे, मंगेश ताडाम, किशोर उईके, भाऊराव आहाके, निलेश धुर्वे, संदीप कुमरे, रामदास वरठी, रवी नामुर्ते, भावना बागडे, प्रियंका जागदेवे, मोहित धुर्वे, दक्ष धुर्वे, विशाल उईके, विराज उईके, अजय परतेती, चंदन उईके, दिलीप धुर्वे, अशोक आहाके, शंकर पंधरे, अनिकेत आहाके, हिमांशू परतेती, रुपेश, नितेश मरसकोल्हे यांनी पक्षप्रवेश घेतला.

## पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणघाट, दि. २६ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक तथा भारतीय जनसंघाचे माजी अध्यक्ष दिवंगत दिनदयाल उपाध्याय यांचे जयंती निमित्त आमदार समीर कुणावार यांचे स्थानिक जनसंपर्क कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कुशल संघटक पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या भारतीय राजनीती व समाज जीवनातील आठवणींना उजाळा दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'एक पेड मा के नाम या उपक्रमाअंतर्गत याप्रसंगी वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी माजी नगराध्यक्ष प्रेम बसंतानी, छाया सातपुते, भूषण पिसे, रवी रोहनकर शारदा पटेल रवीना आखाडे धनश्री बरघणे वैशाली सुरकार, प्रा. डॉ. राजू निखाडे, अनिता मावळे ,शुभांगी गेडाम, नीता गेडेकर, नितीन गेडेकर, प्रेमिला हिवंज, उमा पानबटकर, प्रेमिला झिंगरे,, रवीना शेख,स्वप्निल सुरकार, अनिल चाफले आदी उपस्थित होते.

## 'एक दिन एक घंटा एक साथ' श्रमदानाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २६ :
महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर दरम्यान आयोजित स्वच्छोत्सव अभियानांतर्गत, पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार, २५ सप्टेंबर रोजी कारला चौक परिसरात स्वच्छता व श्रमदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ विश्वविद्यालयाचे कुलसचिव कादर नवाज खान यांच्या हस्ते करण्यात आला. स्वच्छता अभियानात विश्वविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, शोधार्थी व विद्यार्थी यांनी सहभाग घेऊन परिसराची स्वच्छता करून श्रमदान केले. या वेळी नोडल अधिकारी डॉ. बालाजी चिरडे, सह-नोडलअधिकारी बी.एस. मिरगे, डॉ. एच.ए. हुनगुंद, डॉ. उमेश कुमार सिंह, डॉ. संदीप वर्मा, डॉ. मुन्नालाल गुप्ता, डॉ. हेमचंद्र ससाने, डॉ. प्रमोद जोशी, डॉ. आम्रपाल शेंडे, डॉ. श्रीनिकेत कुमार मिश्र, डॉ. सीमा बर्गट, धीरज मसराम, सुधीर खरकाटे, मिथिलेश राय, हेमन्त कुमार दुबे, रामप्रसाद कुमरे, रवींद्र वानखडे, संदीप पेटकर, कुंडलीक वाघमारे, आशीष कुंभरे, प्रफुल राऊत, सतीश आडे, आकाश गवळी, सतीश डोंगरे, सुभाष कांबळे, प्रमोद चव्हाण, गीता राऊत, रोशनी उमाटे, पुष्पा गुबडे, गणेश पडधान, योगेश चिमणे, अनिल डोंगरे, मंगेश वाघमारे यांच्यासह शोधार्थी व विद्यार्थ्यांनी कारला चौक ते पोलिस कॉलनी मार्गावर स्वच्छता करून श्रमदान केले. अभियानात ग्रामपंचायत, पिपरी, मेघे चे कर्मचारी आणि स्वच्छता कामगार यांनीही सहकार्य केले. २ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या अभियानांतर्गत 'एक पेड माँ के नाम', निबंध लेखन, घोषवाक्य, पोस्टर, रील्स, भाषण, नुक्कड नाट्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जात आहे.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरच्या ९८ वर्षांच्या इतिहासातील काळा दिवस

## अध्यक्ष ललित गांधी यांच्या राजीनाम्याची सभासदांकडून ठाम मागणी



■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २६ :

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँण्ड ॲग्रीकल्चर ची एक्स्ट्रा ऑर्डिनरी जनरल मीटिंग नुकतीच आयोजित झाली. मात्र या बैठकीत घडलेल्या घटनांनी चेंबरच्या ९८ वर्षांच्या परंपरेला मोठा धक्का बसला आहे. सभासदांच्या तीव्र आक्षेपामुळे बैठक तहकूब करावी लागली आणि हा दिवस चेंबरच्या इतिहासातील काळा दिवस म्हणून नोंदला गेला. बैठकी दरम्यान मांडण्यात आलेल्या घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेत गंभीर विसंगती असल्याचे स्पष्ट झाले. सभासदांना दिलेल्या ड्राफ्टमध्ये तफावत होती, मूळ घटनामध्ये फेरफार करून चुकीची मांडणी करण्यात आली होती, तसेच नियमानुसार सात दिवस आधी दस्तऐवज पाठविण्याऐवजी तो केवळ तीन दिवस आधी सभासदांपर्यंत पोहोचविण्यात आला. मजकुरात शब्दांची खेळवाजुळव करून अस्पष्ट वाक्यरचना तयार करण्यात आली होती आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकतेचा घोर अभाव असल्याचे निर्दर्शनास आले. या सर्व प्रकारावर केवळ सर्वसाधारण सभासदच नव्हे, तर मॅनेजिंग कमिटीतील सदस्यांनी देखील तीव्र आक्षेप नोंदवला. यावरून हे उघड झाले की अध्यक्ष ललित गांधी यांनी मॅनेजिंग कमिटीला डावलून एकतर्फी व मनमानी पद्धतीने ड्राफ्ट तयार करून थेट एक्स्ट्रा ऑर्डिनरी जनरल मीटिंगसमोर ठेवला.

बैठकीला ट्रस्ट बोर्ड चेअरमन श्री. आशिष पेडणेकर, माजी अध्यक्ष श्री. संतोष जी मंडलेचा, माजी अध्यक्षा मीनल ताई मोहाडीकर, माजी वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दशरती, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे तसेच गव्हर्निंग कौन्सिल आणि मॅनेजिंग कमिटी सदस्यांसह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. उपस्थित सभासदांच्या भावना संतापाने भरलेल्या होत्या आणि अध्यक्षांच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी त्यांनी व्यक्त केली. नियमाप्रमाणे घटनादुरुस्तीची प्रक्रिया अनेक टप्प्यांतून पार पडावी लागते. प्रारंभी एक्स्पर्ट कमिटी तयार होणे, त्यानंतर मॅनेजिंग कमिटी व गव्हर्निंग कौन्सिलमध्ये चर्चा होणे आणि शेवटी सर्वसाधारण सभासदांकडून हरकती मागविणे ही पायरी आवश्यक आहे. मात्र या सर्व टप्प्यांना बगळून अध्यक्षांनी थेट ड्राफ्ट सभासदांसमोर मांडला. या कृतीमुळे केवळ नियमभंगच नाही तर संस्थेवर एकहाती ताबा मिळविण्याचा प्रयत्न असल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. याशिवाय, सभासदांनी निर्दर्शनास आणले की मत्स्य कमिटी स्थापन करण्याच्या मागणीला अध्यक्ष सतत विरोध करीत आले आहेत. काही सभासदांनी तर सामाजिक भेदभाव करून वैयक्तिक हितसाधनाचा प्रयत्न केल्याचा आरोपही केला. या पार्श्वभूमीवर अध्यक्षांचा मनमानी कारभार संस्थेच्या हितासाठी घातक असल्याचे मत अनेकांनी मांडले. बैठकीत वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे व माजी अध्यक्षांनी पुढाकार घेऊन सभासदांच्या भावना ठामपणे मांडल्या. संस्थेच्या भविष्यासाठी, परंपरेच्या रक्षणासाठी व पारदर्शक कामकाजासाठी या डावाला अडथळा आणणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सभासदांचा ठाम आवाज असा की, मनमानी कारभार सहन केला जाणार नाही. अध्यक्ष ललित गांधी यांनी नैतिकतेच्या आधारावर तात्काळ राजीनामा द्यावा. अन्यथा सभासदांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी उचलून धरली जाईल. या घटनेमुळे ९८ वर्षांची परंपरा जपणाऱ्या महाराष्ट्र चेंबरच्या इतिहासात प्रथमच एक्स्ट्रा ऑर्डिनरी जनरल मीटिंग तहकूब करावी लागली. यामुळे सभासदांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली असून, भविष्यातील कारभारासाठी नवा अध्याय सुरू होणार असल्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत.



## दिव्यांगाना सर्व योजनेचा लाभ एका छताखाली घेता येईल : मुकाअ सोमन

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २६ :दिव्यांग समाजाचा एक घटक आहे त्यांच्यातही विविध क्षमता असते त्यांना संधिची गरज असून समाजाच्या मुख्य प्रवहात येण्याकरीता सर्वांच्या सहकार्याची गरज आहे, दिव्यंगाना सर्व योजनेचा लाभ मिळण्या करीता दिव्यांग सक्षमिकरण स्थापना करण्यात आली असून दिव्यांगाना सर्व योजनेचा लाभ एकाछता खाली घेता येईल जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांनी दिव्यांग सक्षमिकरन कार्यालयाचे उद्धघाटन प्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी अतिरिक्त मुकाअ सुरज गोहाड, प्रतिभा भागवतकार जिल्हा दिव्यांग सक्षमीकरन अधिकारी, डॉ अमोल भोसले उपमुख्यकार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन व पंचायत ,वैशाली रसाळ प्रकल्प विकास अधिकारी, महेंद्र गजभिये शिक्षणाधिकारी, धीरज परांडे ग्रामीण पानी पुरवठा अधिकारी विनीत साबळे लघु सिंचन अधिकारी, मनोज पाते मुख्य लेखा धिकारी, सोनाली शिंदे सहायक सल्लागार दिव्यांग विभाग,किशोर थुल नोडल अधिकारी ,जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संजय जाधव इत्यादी या उदघाटन प्रसंगी उपस्थित होते. याप्रसंगी पराग सोमण मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे स्वागत दिव्यांग शाळेतील मुकबधीर विद्यार्थ्यांनी पुष्प देऊन केले व इतरही प्रमुख अतिथिचे स्वागत विद्यार्थ्यांनी केले.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **BHARTI SHRIDHARRAO POHEKAR**. NOW MY NEW NAME IS **NIDHI PUNDLIK CHAVRE**.
ADD : H. NO. 462 BEHIND KHOBRAGADE HOSPITAL SUBHASH ROAD GANESHPETH NAGPUR - 440018

MY OLD NAME WAS **MOHD IMRAN MOHD FARUKH AKBANI / MHIMRAN MHFARUKH AKBANI**. NOW MY NEW NAME IS **IMRAN FAROOK AKBANI**.
ADD : FLAT NO. 208, RATAN TOWER NO.2 SHANTI NAGAR NAGPUR - 440002

MY OLD NAME WAS **SK ISRAIL SK ISMAIL**. NOW MY NEW NAME IS **SHAIKH ISRAIL SHAIKH ISMAIL**.
ADD : RAHIM NAGAR UMARKHED DISTRICT YAVATMAL 445206

MY OLD NAME WAS **MANTASHA AERUM**. NOW MY NEW NAME IS **MANTASHA ASHRAF ANSARI**.
ADD : P.NO.42, BHANDARA ROAD, NEAR PARDI POLICE STATION, RAM BHUMI SOCIETY, NAGPUR - 440008

MY OLD NAME WAS **GAYATRI GIRISH DESHPANDE**. NOW MY NEW NAME IS **ALKA GIRISH DESHPANDE**.
ADD : 141, VENKATESH CONAL ROAD ASHTVINAYAK NAGAR TARODA ROAD NANDED - 431601

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
[illegible]
जाहीरनामा
[illegible]
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता


## पीडीए स्टेंटिगद्वारे नवजात शिशुला दिले नवजीवन



■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २६ : गर्भधारणेनंतर अवघ्या साडेपाच महिन्यात जन्मलेल्या, दोन किलोपेक्षाही कमी वजन असलेल्या आणि अत्यंत गुंतागुंतीची अवस्थेतील नवजात बाळाच्या जन्मत: लाभलेल्या गंभीर हृदयविकारावर सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील नवजात शिशुतज्ज्ञांनी पीडीए स्टेंटिंगच्या सहाय्याने अद्ययावत उपचार करीत नवजीवन प्रदान केले. मागील महिन्यात नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील या नवजात शिशुला सावंगी रुग्णालयातील निओनॅटोलॉजी विभागात दाखल करण्यात आले होते. तपासणीत या बाळाला जन्मजात हृदयविकार म्हणजेच टेट्रालॉजी ऑफ फॅलोट विथ पल्मोनरी अट्रेशिया असल्याचे निदान आले. बाळाचे प्राणवायू संतृप्ती (सॅच्युरेशन) न राखल्याने लगेचच तिला इंट्युबेट करण्यात आले आणि आपत्कालीन स्थितीत पीडीए स्टेंटिंग करण्याचा निर्णय नवजात शिशुतज्ज्ञांनी घेतला. पीडीए स्टेंटिंग ही हृदय कॅथेटरायझेशन प्रक्रिया आहे ज्यामध्ये जन्मजात हृदयरोग असलेल्या बाळामध्ये रक्तप्रवाह सुरळीत करण्यासाठी पीडीए म्हणजेच पेटंट डक्ट्स आर्टेरिओसस नावाच्या रक्तवाहिनीमध्ये एक लहान स्टेंट ठेवला जातो. ही अत्यंत गुंतागुंतीची मात्र नवजीवन देणारी प्रक्रिया रुग्णालयातील तज्ज्ञ डॉ. वैभव राऊत, डॉ. सागर कारोटकर, डॉ. रेवत मेश्राम, डॉ. महावीर लाकरा व डॉ. राशी गुप्ता यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आली. उपचारादरम्यान बाळाला ताप आल्याने मेंदूज्वर (मेनिन्जायटिस) असण्याची शक्यता निर्माण झाली. त्यासाठी लंबर पंक्चर करून तपासणी करण्यात आली आणि योग्य वेळी प्रतिजैविक औषधोपचार सुरू करण्यात आला. या काळात बाळाला वारंवार झटके येऊ लागले. या अवस्थेला रिफ्रॅक्टरी सीझर म्हणून ओळखले जाते व ही अवस्था अतिशय गंभीर असते. मात्र डॉक्टरांनी योग्य वेळी पायरीडॉक्सिन थेरपी आणि अँटी-एपिलेप्टिक औषधोपचारांचा वापर करून बाळाला येणारे झटके नियंत्रणात आणले. नवजात शिशूचे वजन अत्यंत कमी असताना आणि त्यातही आरोग्याबाबत गुंतागुंत निर्माण झाली असताना डॉक्टरांनी स्टेंटिंगची आव्हानात्मक प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्णत्वाला नेली. डॉक्टरांच्या अनुभवी व कौशल्यपूर्ण प्रयत्नांनी आणि नवजात शिशु अतिदक्षता विभागातील सुयोग्य उपचारांमुळे बाळाची प्रकृती सुधारू लागली.


कोर्ट विद्यमान श्री. सुरेश वाघचौरे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, पारशिवनी यांचे न्यायालय पारशिवनी

रा.मा.क्र. /जन्म-मृत्यु नोंद/२०२४-२५
मौजा-बिटोली, प.ह.नं. ०५
ता. पारशिवनी, जि. नागपूर

जाहीरनामा

मौजा-बिटोली (जो.ख.) ता. पारशिवनी, जि. नागपूर येथील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, [illegible]

सदर जाहीरनामा आज दिनांक १२/०९/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(सुरेश वाघचौरे)
तालुका दंडाधिकारी, पारशिवनी

कोर्ट विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, भिवापूर यांचे कार्यालय
भिवापूर रोड, भिवापूर, जिल्हा नागपूर
[illegible]
(बी.डी. टेळे)
कार्यकारी दंडाधिकारी, तथा तहसिलदार, भिवापूर

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
[illegible]
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
[illegible]
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
[illegible]
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# बालांगण

## मिसिसिपी

मिसिसिपी ही उत्तर अमेरिकेतील सर्वात मोठ्या नद्यांपैकी एक आहे. तिची लांबी सुमारे३,७३० किलोमीटरआहे. तिचा उगम अमेरिकेच्या मिनिसोटा राज्यातीललेक इटास्का येथून होतो. नदी पुढे दक्षिणेकडे वाहतमेक्सिकोच्या आखातात मिळते.मिसिसिपी नदीला अनेक उपनद्या मिळतात. त्यापैकीमिसूरी नदीआणिओहायो नदीया सर्वात मोठ्या उपनद्या आहेत. त्यामुळे मिसिसिपीला 'फादर ऑफ वॉटर' असेही म्हणतात.

स्थानिक अमेरिकन जमातींमध्ये अशी एक कथा आहे की मिसिसिपी नदी ही एकाविशाल सर्पाचे रूपांतरआहे. हा सर्प लोकांना त्रास देत असे, म्हणून देवाने त्याचे पाण्यात रूपांतरकेले आणि तो कायमचा नदी झाला. म्हणूनच ते लोक नदीला पवित्र मानतात.

जीवनदायिनी

मिसिसिपी नदी ही अमेरिकेतीलसर्वात मोठा वाहतूक मार्गआहे. बोटी, जहाजे आणि बार्जद्वारे धान्य, कोळसा, पेट्रोलियम, लाकूड व इतर वस्तूंची वाहतूक नदीमार्गाने मोठ्या प्रमाणावर केली जाते. यामुळे अमेरिकेची शेती व उद्योग यांना खूप फायदा झाला आहे.



नदीकाठावर सेंट लुईस, मेम्फिस, न्यू ऑर्लिन्स यासारखी अनेक शहरे वसली आहेत.शिवाय नदीतून प्रवास करणाऱ्या बोटी व संगीत यामुळे 'मिसिसिपी रिव्हर कल्चर' जगप्रसिद्ध आहे.मिसिसिपी नदीवर २५ पेक्षा जास्त छोटी धरणे व दरवाजे बांधलेले आहेत. त्यामुळे जहाजांची वाहतूक सोपी झाली आहे. १९१३ मध्ये बांधलेले कीओकुक धरण हे मिसिसिपीवरील पहिले मोठे धरण मानले जाते. इथे मोठे जलविद्युत केंद्र आहे.मिसिसिपी नदी ही अमेरिकेसाठीजीवनदायिनी नदीआहे. शेती, उद्योग, वाहतूक, वीज निर्मिती आणि संस्कृती सर्व गोष्टींमध्ये तिचा मोठा वाटा आहे.



## उद्रेक ज्वालामुखीचा

मुलांनो, तुम्ही ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या बातम्या ऐकल्या असतील. भारतात एकच जिवंत ज्वालामुखी आहे. आता ज्वालामुखीचा उद्रेक का होतो, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. ज्वालामुखीच्या उद्रेकाविषयी जाणून घेऊ.

ज्वालामुखीच्या म्हणजे एका डोंगराच्या खाली असलेला लाव्हा रस. हा लाव्हा रस खूप गरम म्हणजे तापलेला असतो. पृथ्वीच्या गर्भात बरंच काही दडलं आहे. इथे सतत हालचाली सुरू असतात. पृथ्वीच्या खाली ऊर्जा निर्माण झाली की दगड वितळू लागतात. यामुळे जमिनीच्या खालच्या भागातून दबाव वाढू लागतो. परिणामी, डोंगरातून लाव्हा रस बाहेर पडतो. यालाच ज्वालामुखीचा उद्रेक असं म्हणतात.

माहीत आहे?

ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर वायू आणि दगड मोठ्या प्रमाणावर वर येतात. यामुळे लाव्हा रस वाहू लागतो. यासोबतच गरम राखही हवेत पसरते. ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या राखेत दगडाचे छोटे कणही असतात. या टोकदार कणांमुळे जखम होऊ शकते. भारतात फक्त एकच जिवंत ज्वालामुखी आहे तर मंगळ ग्रहावरचा ओलंपस मॉन्स हा आपल्या सूर्यमालेतला सर्वात मोठा ज्वालामुखी आहे.




## गमतीदार रेल्वे स्थानकं

छोट्यांनो, तुम्ही गल्ल्यांची, चौकांची, रस्त्यांची भन्नाट नावं ऐकली असतील. आपल्याकडे रेल्वे स्थानकांना म्हणजेच स्टेशन्सना अशीच काही हटके नावं देण्यात आली आहेत. अशी रेल्वे स्थानकं अस्तित्वात आहेत, यावर तुमचाही विश्वास बसणार नाही. चला तर मग, अशाच काही आगळ्यावेगळ्या रेल्वे स्थानकांची सफर करू या.

- सहेली म्हणजे मैत्रीण. मध्य प्रदेशमधल्या होशंगाबादजवळ 'सहेली' नावाचं रेल्वे स्थानक आहे.
- उत्तर प्रदेशमध्ये 'भैंसा' नावाचं रेल्वे स्थानक आहे. हे स्थानक आग्रा या शहराजवळ आहे.
- पंजाबमधल्या जालंधर जिल्ह्यात 'काला बकरा' नावाचं स्थानक आहे.
- उत्तर प्रदेशमधल्या सोनभद्रमध्ये 'बिल्ली जंक्शन' आहे. हे अगदी छोटंसं ठिकाण आहे. बिल्ली हे एखाद्या स्थानकाचं नाव असेल यावर कोणाचाही विश्वास बसत नाही!
- उत्तर प्रदेशमध्येच 'सुअर' नावाचंही स्थानक आहे. सुअर म्हणजे डुक्कर. हे स्थानक मुरादाबाद विभागाअंतर्गत येतं.
- राजस्थानमधल्या पाली जिल्ह्यात 'नाना' हे स्थानक आहे. या स्थानकात दोन एक्सप्रेस गाड्या थांबतात.
- हरयाणामधल्या पानीपत जिल्ह्यात 'दिवाना' नावाचं स्थानक आहे. या स्थानकाचं नाव ऐकून लोकांच्या चेहऱ्यावर आपसूकच हसू येतं.
- राजस्थानमधल्या जोधपूरमध्ये 'बाप' नावाचं रेल्वे स्थानक आहे!

गंमत ग्यान

## देशोदेशीचे पतंग महोत्सव



छोट्या मित्रमैत्रिणींनो, आपल्याकडे संक्रांतीला पतंग उडवतात. विविध ठिकाणी काईट फेस्टिवलचं आयोजन होतं. गुजरातमध्ये आयोजित होणाऱ्या पतंग महोत्सवात वेगवेगळ्या आकाराचे पतंग उडवले जातात. पण भारताबरोबरच इतर देशांमध्येही पतंग महोत्सवांचं आयोजन होतं. देशोदेशीच्या पतंग महोत्सवांविषयी...

- जपानमध्ये चार मे या दिवशी हमामात्सु महोत्सवाचं आयोजन होतं. या महोत्सवाची सुरुवात १५५८ मध्ये झाली होती. या महोत्सवात मोठ्या आकाराचे पतंग उडवले जातात.
- चीनमध्ये वेफंग इंटरनॅशनल काईट फेस्टिवलचं आयोजन होतं. दरवर्षी २० ते २५ एप्रिल दरम्यान हा महोत्सव साजरा होतो. या महोत्सवातही वेगवेगळ्या आकाराचे पतंग असतात.
- वॉशिंग्टनमधल्या नॅशनल मॉलमध्ये ब्लॉसम काइट्स फेस्टिवलचं आयोजन होतं. इथे मोठ्या प्रमाणावर पतंग उडवले जातात. इथे पहिला पतंग महोत्सव १९६७ मध्ये आयोजित करण्यात आला होता.
- लंडनमध्ये ब्रिस्टॉल काईट फेस्टिवलचं आयोजन होतं. दर वर्षी सप्टेंबरमध्ये हा महोत्सव साजरा होतो.
- इंडोनेशियातल्या बालीमध्ये बाली काईट फेस्टिवलचं आयोजन होतं. इथल्या सानुर बीचवर जुलै महिन्यात या फेस्टिवलचं आयोजन होतं.

गंमत ग्यान

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) ओटीपीचं पूर्ण रुप काय?
२) एफआयआरचं पूर्ण रुप काय?
३) कर्नाटकची राजधानी कोणती?
४) भारताच्या नवे लष्करप्रमुख कोण?
५) २०१९ चा मिस युनिव्हर्स किताब कोणी जिंकला?
६) डिस्कव्हरी ऑफ इंडिया हे पुस्तक कोणी लिहिलं?
७) नाट्यशास्त्राची रचना कोणी केली?
८) १९१३ मध्ये कोणत्या भारतीय व्यक्तीला नोबेल पारितोषिक देण्यात आलं?
९) पी.टी. उषा यांच्या आत्मचरित्राचं नाव काय?
१०) भूदान आंदोलनाची सुरूवात कोणी केली?

उत्तर : १) वन टाईम पासवर्ड २) फर्स्ट इन्फॉर्मेशन रिपोर्ट ३) बंगळुरु ४) जन. उपेंद्र द्विवेदी ५)झोझिबिनी टुन्झी ६) पंडित जवाहरलाल नेहरू ७) भरतमुनी ८) रवींद्रनाथ टागोर ९) गोल्डन गर्ल १०) विनोबा भावे

## सतार

ओळख वाद्यांची

सतार हे एक भारतीय तंतुवादय असून सितार, सेतार, सेतारा या नावांनी ओळखले जाते. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतामध्ये याचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. लांब लाकडी मानेसारखी रचना आणि मोठा गोल गोडीचा 'तुम्बा' हा सतारचा मु'य भाग असतो.सतारची रचना ही त्याच्या अनो'या ध्वनीचे रहस्य आहे.दांडी म्हणजेच बि'जवर तारा बांधल्या जातात आणि त्यातून ध्वनी निर्माण होतो.सतारला साधारणतः १८ ते २१ तारा असतात.त्यापैकी काही सूर निर्माण करण्यासाठी तर काही झंकारासाठी असतात. तुम्बाबहुतेकदा भोपळ्याचा बनलेला गोलाकार भाग आहे. त्यामुळे ध्वनीला गंभीरता आणि प्रतिध्वनी मिळतो.खुंट्यांचा उपयोग तारांना ट्यून करण्यासाठी केला जातो.चिकारी तारेचा उपयोग ठेका किंवा ताल ठेवण्यासाठी होतो.सतार वाजवण्यासाठी बोटांना लावल्या जाणार्याग धातूच्या किंवा प्लास्टिकचे छोट्या उपकरणाला मिजराब म्हणतात. १३ व्या शतकात सतार विकसित झाली असे मानले जाते. नंतर अनेक घराण्यांनी त्याच्या शैलीत भर घातली. सतारवर 'राग' सादर करताना सुरुवातीला 'आलाप' वाजवला जातो, त्यानंतर 'झोड' आणि 'झाला' यासारखे टप्पे येतात. त्यात रागाची लय, गती आणि भाव व्यक्त होतो. सतारच्या ध्वनीलहरी अतिशय गोड आणि मधुर असतात. पंडित रविशंकर, विलायत खान, निखिल बॅनर्जी यांसार'या दिग्गज कलाकारांनी सतारला आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवून दिली. शास्त्रीय संगीताबरोबरच चित्रपटसंगीत, फ्युजन आणि पाश्चात्य प्रयोगांमध्येही सतारचा मधुर आवाज ऐकायला मिळतो. सतार म्हणजे सूर, भावना आणि भारतीय परंपरेचा अद्वितीय संगम आहे.




## दोन भाऊ

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. इटलीतील एका छोट्या गावात दोन भाऊ राहत होते. मोठा भाऊ लुईजी हा अत्यंत लोभी आणि स्वार्थीहोता. त्याला जास्तीत जास्त पैसा आणि वस्तू हव्या असत. धाकटा भाऊ मार्को मात्र खूप सरळ, साधा आणि सज्जन होता. तो आपले काम मनापासून करीत असे आणि जे काही मिळेल त्यात तक्रार न करता सुखासमाधानाने राहत असे. आपल्या कुटुंबावर आणि गावातल्या लोकांवर त्याचे प्रेम होते. वेळ पडली तर स्वत: त्रास सहन करीत असे. पण लोकांना मदत करीत असे.प्राण्यांवर प्रेम करीत असे. त्यांना अन्नपाणी देत असे. एकदा मार्को जंगलात लाकूड गोळा करत असताना त्याला एक सुंदर परी भेटली. परीने हसून म्हणाली,'मार्को,मी अनेक वर्षे तुला पाहते आहे. तू खरोखरीच चांगला आणि दयाळू आहेस, यापुढे माझ्या आशीर्वादाने तुला काहीही कमी पडणार नाही.' त्या दिवसापासून मार्कोचा धंदा उत्तम चालू लागला. त्याला भरपूर पैसा मिळू लागला. अन्न, कपडे आणि वस्तूंची ददात पडेनाशी झाली. तो लोकांना आणखी मदत करू लागला. त्याचे सुख आणि आनंद दिवसेंदिवस वाढू लागला. हे पाहून लुईजीला खूप हेवा वाटू लागला. 'हे सारे कशामुळे झाले?' त्याने विचारले. मार्कोने त्याला परीच्या वरदानाबद्दल सांगितले. तेव्हा लुईजी घाईघाईने जंगलात गेला आणि परीला म्हणाला,'तू मार्कोला दिलेस तसेच मलाही वरदान दे!' पण परीला त्याच्या मनात असलेला स्वार्थ आणि लोभ माहीत होता. ती रागावली आणि म्हणाली,'तू फक्त स्वतःसाठी विचार करतोस. तुला कधीही आनंद मिळणार नाही.'


त्या दिवसानंतर लुईजीच्या घरात अंधार आणि दुःख पसरले. तेव्हापासून गावकरी म्हणू लागले,'जो दयाळू असतो त्याच्या आयुष्यात सूर्याचा प्रकाश आणि चंद्राची शांती येते. पण लोभ आणि स्वार्थामुळे फक्त अंधार मिळतो.'

इटालियन लोककथा

ठिपके जुळवा







## वाईल्डलाईफ बायोलॉजीविषयी...

दोस्तांनो, तुम्हाला प्राणी आवडतात का? ऑस्ट्रेलियातल्या जंगलांना अलिकडेच लागलेल्या आगीत काही लाख प्राण्यांचा मृत्यू झाला. बऱ्याच प्राण्यांची, पक्ष्यांची संख्या खूप कमी झाली आहे. अशा प्राण्यांची, पक्ष्यांची गणना दुर्मीळ प्रजातींमध्ये केली जाते. अशा सजीवांचना वाचवण्याबरोबरच संख्या वाढवण्यासाठीही देश-विदेशात बरेच प्रयत्न होतात, संशोधन केलं जातं. तुम्हालाही या क्षेत्रात रस असेल तर वाईल्डलाईफ बायोलॉजी म्हणजे वन्यप्राणी जीवशास्त्राचा अभ्यास करता येईल.

वाईल्डलाईफ बायोलॉजी ही बायोलॉजी अर्थात जीवशास्त्राचीच एक शाखा आहे. यात वन्य प्राण्यांचा अभ्यास केला जातो. वन्य प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या संरक्षणासाठी त्यांच्या वागणुकीची माहिती घेणं गरजेचं आहे. प्राणी, पक्षी काय खातात, कुठे राहतात, त्यांना कशाचा त्रास होतो ही सगळी माहिती जाणून घेतल्यानंतर संशोधन करणं सोपं जातं. या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन वाईल्डलाईफ बायोलॉजी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

कोण होणार?

वाईल्डलाईफ बायोलॉजिस्ट झाल्यानंतर तुम्ही प्राण्यांचा अभ्यास करू शकता. यासाठी तुम्हाला जंगलात रहावं लागतं. विशिष्ट प्रजातीचा अभ्यास करणारे बरेच प्रयोग करतात. त्यामुळे हे धाडसी करिअर आहे. यात तुम्ही काही तरी वेगळं करू शकता. बीएससी केल्यानंतर वाईल्डलाईफ बायोलॉजीमध्ये एएससी करता येईल. वाईल्डलाईफ इन्स्टीट्यूट ऑफ इंडिया, नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्स, सेंटर फॉर वाईल्डलाईफ स्टडीज अशा संस्थांमध्ये तुम्ही प्रवेश घेऊ शकता.

### दोस्त हे मस्त

## प्राण्यांनाही वाजते थंडी



मुलांनो, हिवाळ्यात आपण कुडकुडतो. माणसं अंगावर स्वेटर घालतात. पण प्राण्यांचं काय? त्यांना थंडी वाजत नाही का? या प्रश्नाचं उत्तर 'हो' असंच आहे. प्राण्यांनाही थंडी वाजते. म्हणूनच थंडीच्या दिवसात काही प्राणी शीतनिद्रेत किंवा सुप्तावस्थेत जातात. म्हणजे काही प्राणी थंडीत बराच काळ झोपूनच असतात. बॉक्स टर्टल हा असाच एक प्राणी. अमेरिका आणि त्याच्या आसपासच्या परिसरात आढळणारी ही कासवं थंडीत झोपून जातात. बॉक्स टर्टर तीन ते पाच महिने झोपू शकतात. थंडीत त्यांच्या श्वासाची गती तसंच हृदयाची धडधडही मंदावते. यामुळे ही कासवं अगदी गाढ झोपून जातात.

### खादाडी

## मस्त मिल्क बॉल्स



गोड खावंसं वाटलं तर तुम्ही मस्तपैकी मिल्क बॉल्स बनवू शकता. यासाठी आठ-दहा पिस्ते, एक कप कंडेन्स्ड मिल्क, एक चमचा तूप, एक कप मिल्क पावडर, आठ वेलच्या, थोडंसं केशर, चार चमचे कोकोनट पावडर असं साहित्य घ्या. मिल्क बॉल्स मायक्रोवेव्हमध्ये बनवायचे आहेत. यासाठी मायक्रोवेव्ह सेफ बाउल घ्या. त्यात मिल्क पावडर, तूप आणि कंडेन्स्ड मिल्क घाला. मिश्रणात वेलची पूड आणि केशर घाला. पिस्त्याचे कापही या मिश्रणात घाला. आता हा बाऊल मायक्रोवेव्हमध्ये ठेऊन मिनिटभर गरम करा. बाऊल बाहेर काढा. सर्व मिश्रण नीट हलवून घ्या. हे मिश्रण थोडं थंड होऊ द्या. हातांना तूप किंवा तेल लावा. या मिश्रणाचे गोल लाडू वळा. हे लाडू कोकोनट पावडरमध्ये घोळवा. तुमचे मिल्क बॉल्स तयार आहेत.

### स्टडी टिप्स

## व्यायामाने स्मरणशक्ती वाढवा



परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी भरपूर अभ्यास करायला हवा. चांगले गुण मिळवण्यासाठी हा अभ्यास लक्षात ठेवणं गरजेचं आहे. स्मरणशक्ती वाढावी, मेंदूचं कार्य सुरळीत सुरू रहावं आणि शरीरात उत्साह संचारावा यासाठी नियमित व्यायाम करणं गरजेचं आहे. दिवसातली फक्त १५ ते २० मिनिटं व्यायामासाठी द्या. व्यायामानंतर हृदयाची गती वाढते. यामुळे मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात सुधारणा होते. मेंदूला रक्तातून पोषक घटक मिळाले की स्मरणशक्ती सुधारते, एकाग्रता वाढते. म्हणून मोबाईल ठेवा बाजूला आणि व्यायामाला सुरूवात करा.

### योगा टाईम

## पोट दुखतंय... धनुरासन करा



मुलांनो, तुमच्या पोटात जंत होतात का? तुमचं पोट वरचेवर बिघडतं का? मग तुम्ही काही योगासनं करायला हवीत. धनुरासन हे असंच एक योगासन आहे. हे आसन नियमितपणे केल्यास पोटाच्या तक्रारी दूर होतात. जंत होण्याचं प्रमाणही कमी होतं. या आसनामुळे पाठीचे स्नायू बळकट होतात. यामुळे पोटदुखीसारख्या तक्रारीही दूर होऊ शकतात.

# ऐन दिवाळीत थांबणार लालपरीची चाके !

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

एसटी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वात परिवहन मंत्र्यांसह एसटी महामंडळाला १३ ऑक्टोबरपासून आंदोलनाची नोटीस दिली आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत एसटी बसची चाके थांबण्याची शक्यता आहे.

कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या मुद्यांवर महाराष्ट्र एसटी कामगार संघटना, महाराष्ट्र एसटी कामगार सेना, कास्ट्राईब राप कर्मचारी संघटना, शिव परिवहन वाहतूक सेना, महाराष्ट्र मोटार कामगार फेडरेशन, महाराष्ट्र एसटी कामगार काँग्रेस (इंटक), राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेस (इंटक), बहुजन परिवहन अधिकारी-कर्मचारी संघटना महाराष्ट्र, राष्ट्रीय मूनिवासी बहुजन कर्मचारी संघ, राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेस या दहा संघटना संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वात एकत्र आल्या आहेत.

मुंबईत झालेल्या समितीच्या बैठकीत कामगारांच्या मागण्यांसाठी १३ ऑक्टोबरला आंदोलन सुरू करण्यावर एकमत व्यक्त करून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि एसटी महामंडळाला आंदोलनाची नोटीस बजावली गेली.

कृती समितीच्या नेतृत्वात १३ ऑक्टोबरपासून मुंबईतील राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय परिसरात धरणे आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. कामगारांचे प्रश्न न सोडवल्यास राज्यभर तीव्र आंदोलन केले जाईल. त्याला एसटी महामंडळ व शासन जबाबदार राहील, असे एस.टी. कामगार संघटनचे राज्य उपाध्यक्ष अजय हट्टेवार म्हणाले.

## संयुक्त कृती समितीतर्फे आंदोलनाची नोटीस



### कृती समितीच्या मागण्या

एसटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ६,५०० रुपयांची वाढ एप्रिल २०२० पासून दिली. परंतु १ एप्रिल २०२० पासून वाढ गृहीत धरून कामगारांना थकबाकी द्यावी, सर्व कर्मचाऱ्यांना २०१८ पासूनची महागाई भत्त्याची थकबाकी द्यावी, सोबत घरभाडे भत्त्यासह इतरही थकबाकी द्यावी, दिवाळीनिमित्त १५ हजार रुपये दिवाळी भेट द्यावी, कामगार करारानुसार १२ हजार ५०० रुपये सण उचल द्यावी, कंत्राटी भरतीतून खासगीकरणाचा घाट रचण्याऐवजी कायम कर्मचाऱ्यांची भरती करावी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी एकरकमी द्यावी इत्यादी मागण्या कृती समितीद्वारे करण्यात आल्या आहेत.

### नऊ महिने आंदोलन


एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनांपैकी सर्वाधिक काळ चाललेले आंदोलन ऑक्टोबर २०२१ ते जुलै २०२२ (सुमारे ९ महिने) दरम्यान चालले होते.

एसटी कर्मचाऱ्यांचा ठाम आग्रह होता की महामंडळातील कर्मचाऱ्यांचे पूर्णपणे राज्य शासनात विलीनीकरण व्हावे, म्हणजे त्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रमाणे पगार व सेवा अटी मिळाव्यात. ऑक्टोबर २०२१ मध्ये आंदोलनाची सुरुवात झाली होती

## आचार्य प्रफुल दादा वाघदरे यांचा श्रीलंका येथे अपघाती मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २६ :

एक वर्षाच्या 'धम्म विनय' या साधनेसाठी श्रीलंकेला गेलेले तळेगांव (शा. पंत) ता. आष्टी जि. वर्धा येथील मानव विकास ज्ञान साधनाश्रमचे व्यवस्थापक आचार्य प्रफुलदादा ऊर्फ प्रदीप लक्ष्मणराव वाघदरे (वय ३४) रा. ब्राम्हणवाडा पो. मासोद ता. आर्वी यांचा श्रीलंकेत झालेल्या केबल कार अपघातात मृत्यू झाला.



अपघाताच्या वेळी मठात १३ बौद्ध भिक्षू केबल कारमधून प्रवास करीत होते. केबल तुटून पडल्याने किमान सात बौद्ध भिक्षूंचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

कुरुनेगाला रुग्णालयातील सूत्रांनी अदा डेराना यांना सांगितले की, मेल्सिरीपुरातील पानसियागामा येथील ना उयाना मठात (ना उयाना अरण्य सेनानाया) केबल कारची केबल तुटून खाली पडल्याने किमान सात बौद्ध भिक्षूंचा मृत्यू झाला आहे. मृत भिक्षूंमध्ये प्रफुलदादा यांचा समावेश होता. ही घटना बुधवार २४ च्या रात्री घडल्याची माहिती आहे.

## महाराष्ट्रात बंडाळीची स्थिती : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. २६ :

राज्यात अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे हाहाकार माजला असताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारला राज्यात बंडाळीची स्थिती निर्माण झाल्याचा इशारा दिला आहे. राज्य सरकारला पूरस्थितीने वेढलेल्या शेतकऱ्यांचे काहीही देणेघेणे नाही. त्यामुळे शेतकऱ्यांत संतापाची लाट निर्माण झाली आहे.

अतिवृष्टी व पुरामुळे बुलढाणा जिल्ह्यात विदारक स्थिती निर्माण झाली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील अतिवृष्टग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दिल्ली दौऱ्यावर निशाणा साधला. शेतकऱ्यांसाठी काँग्रेस रस्त्यावर उतरणार असल्याचा इशाराही दिला.



मुख्यमंत्री दिल्लीला जाऊन काय दिवे लावणार आहेत? ते केवळ दोन जातीत भांडणे लावतील. दोन जातींत भांडणे लावून राज्याचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करतील, असे ते माध्यमांशी बोलताना म्हणाले.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सरकारने त्यांना तत्काळ हेक्टरी ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य द्यावे, सर्वच प्रकारचे कर्ज माफ केले पाहिजे. पण सरकारने शेतकऱ्यांना अद्याप कोणतीही मदत केली नाही. त्यामुळे काँग्रेस २ ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरेल. शेतकऱ्यांनी आपल्या स्थितीविषयी मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला तर मुख्यमंत्री त्याला राजकारण करू नको असे म्हणत त्याचे तोंड गप्प बंद करतात. मुख्यमंत्र्यांचे हे विधान अतिशय असभ्य असल्याचे सपकाळ म्हणाले.

### साडी नेसवल्याचा निषेध

मुंबई स्थित काँग्रेस कार्यकर्त्याला साडी नेसवल्याच्या मुद्यावरूनही त्यांनी सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, राज्यातील कायदा सुव्यवस्था पूर्णतः ढासळली आहे. राज्यात ज्येष्ठ कार्यकर्त्यांना साडी नेसवली जात आहे. महिल्यांच्या साडीपर्यंत भाजपच्या कार्यकर्त्यांचा हात जात आहे.

आमच्या कल्याण येथील एका कार्यकर्त्याला भाजपच्या लोकांनी साडी नेसवली. काँग्रेस त्या आपल्या कार्यकर्त्याचा लवकरच सन्मान करेल. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे, असे सपकाळ म्हणाले.

### 'किडे' वळवळतात

किडे (संभाजी भिडे) अधूनमधून वळवळ करत असतात. भिडेंनी केलेले विधान हे सरकारला मदत करणारे आहे. अशा वादग्रस्त विधानांमुळे माध्यमांचे लक्ष तिकडे वळते आणि शेतकऱ्यांचे प्रश्न बाजूला पडतात. मुख्यमंत्र्यांनीच भिडे यांना फोन करून विधान करण्यास सांगितले असेल, असेही ते म्हणाले.

## अतिवृष्टीचा पेंच व्याघ्रप्रकल्पाला फटका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.२६ :

राज्यातील थांबलेले पर्यटन येत्या १ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू होणार आहे. त्यादृष्टीने व्याघ्रप्रकल्प, अभयारण्यांनी तयारी देखील सुरू केली आहे. पावसामुळे खराब झालेल्या रस्त्यांची डागडुजी सुरू झालेली आहे. मात्र, महाराष्ट्रातील पेंच व्याघ्रप्रकल्पातील पर्यटन रस्त्यांची अवस्था फारच बिकट झाली असून, १ ऑक्टोबरचा मुहूर्त या व्याघ्रप्रकल्पाला चुकवावा लागणार आहे. १५ ऑक्टोबरपासून मात्र पेंच व्याघ्रप्रकल्पातील नियमित पर्यटनाला सुरुवात होऊ शकते.

विदर्भात गेल्या काही दिवसात पावसाचा जोर वाढला आहे. मुसळधार पावसामुळे पेंच व्याघ्रप्रकल्पातील पर्यटनाचे रस्ते अतिशय खराब झाले आहेत. या रस्त्यावरुन पर्यटन वाहने फसण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळेच एक ऑक्टोबरपासून सुरू होणारे या व्याघ्रप्रकल्पातील पर्यटन यावर्षी १५ दिवस उशीराने सुरू होणार आहे.



पेंच व्याघ्रप्रकल्प व्यवस्थापनाने या व्याघ्रप्रकल्पातील पर्यटन रस्त्याच्या डागडुजीला सुरुवात केली आहे. युद्धपातळीवर हे काम सुरू असले तरीही रस्ते अधिकच खराब झाल्याने वेळ लागत आहे. पर्यटकांच्या जीवाला कोणताही धोका होऊ नये त्यामुळे रस्ते पुर्णपणे दुरुस्त झाल्याशिवाय पर्यटन सुरू न करण्याचा निर्णय पेंच व्यवस्थापनाने घेतला आहे.

दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक या व्याघ्रप्रकल्पात येतात. व्याघ्रदर्शन झाले नाही तरीही पेंचचे जंगल अतिशय समद्ध आहे. यावर्षी पावसाचा जोर अजूनही कायम आहे. रस्ते चिखलमय होऊन उखडले आहेत. मोठमोठे खड्डेही पडले आहेत. अशा रस्त्यावर वाहने फसण्याचीच अधिक शक्यता आहे. विशेषतः बखारी, भिवसेन कुटी, सलामाझबखारी आणि फेफडीकुंड या मार्गावरील रस्त्यांची सर्वाधिक दुरवस्था झाली आहे.

## शोध मंगळावरील जीव सृष्टीचा

लोकरंग

मंगळ ग्रहावर जीवसृष्टी होती, या शक्यतेला बळ देणारे काही पुरावे अमेरिकेच्या अंतराळ संशोधन संस्था अर्थात नासाने नुकतेच समोर आणले. मंगळ ग्रहावरील जीवसृष्टी काही काळाने नाहीशी झाले असेल तर त्याहून अनेक प्रश्न उभे राहतात. तिथले वातावरण विरळ झाले आहे का? पाणी कमी झाले आहे का? की भूगर्भीय प्रक्रियांमुळे परिसंस्था अस्थिर झालेली आहे असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. याच प्रश्नाची उकल करण्यासाठी मराठी विज्ञान परिषदेचे शास्त्रज्ञ डॉ. अ. पा. देशपांडे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

---

### मंगळ ग्रहावर जीवसृष्टीच्या संभाव्य खुणा आदळल्या ही नासाची बातमी खरी आहे का?

■ होय. नासाचा पॅसीव्हिएरन्स रोव्हर मंगळवारच्या जेजेरो क्रेटर यामध्ये २०२१ मध्ये उतरला तेंव्हापासून तो सातत्याने तिथल्या जमिनीचे नमुने गोळा करत आहे. जुलै २०२४ मध्ये त्याने या परिसरात खोलवर खोदकाम केले.

त्यात मातीसारख्या मदरस्टोन खडकाच्या आत काही विलक्षण रासायनिक खुणा सापडल्या. चेवया फाल्स खडकात व्हिव्हिनाइट (लोखंड -फॉस्पेट) आणि ग्रीनाईट (लोखंड सल्फाइड) या विशिष्ट प्रकारच्या खनिजांची ओळख पटली आहे. सौरमालेतील इतर ग्रहावर अशी खनिज दुर्मिळ आहेत. ही दोन्ही खनिज पृथ्वीवर ऑक्सिजनचा अभाव असलेलया दमट वातावरणात जैविक प्रक्रियेतून मिळतात. या खुणांवरून मंगळवार प्राचीन काली जीवन असल्याची शक्यता दाट झालेली आहे.

### एखाद्या ग्रहावर सजीवांचे अस्तित्व शोधण्याचे वैज्ञानिक निकष काय असतात?

■ सजीवांचे अस्तित्व एखाद्या ग्रहावर शोधताना वैज्ञानिक विविध प्रकारच्या खुणा किंवा बायोसिग्नेचर तपासतात. यात कार्बन समस्थानिके आणि इतर संस्थानिकांचे नेहमीपेक्षा वेगळे प्रमाण, मिथेनसारखी संयुगेअसे रासायनिक निर्देशक असू शकतात.

सूक्ष्म जीवांमुळे तयार झालेली खनिजे, जीवांच्या हालचालींचे ठसे किंवा सूक्ष्म जीवाष्म देखील असू शकतात. जेजेरो क्रेटोरो मधून मिळालेल्या अशा खुणाचा शोध घेऊन मग संशोधक अशा आग्रहावर जीवसृष्टी असल्याचा शोध घेतात.

### मंगळावरील संशोधनाचा पुढील टप्पा कसा असणार आहे?

■ पुढील टप्प्यात पर्सिव्हिअरन्स रोव्हरने गोळा केलेले नमुने पृथ्वीवर परत आणण्याची योजना आहे. त्यात मार्स सॅम्पल रिटर्न ही नासा आणि युरोपियन स्पेस एजन्सीची संयुक्त मोहीम महत्त्वाची ठरणार आहे. माती, खडक, रासायनिक संयुगे या नमुन्यांचे सूक्ष्म विश्लेषण करून सजीवांच्या खुणा अधिक विश्वासार्ह पद्धतीने तपासता येतील.

सखोल विश्लेषण झाल्यावरच मिळालेल्या खुणा निश्चितपणे जैविक आहेत किंवा नाहीत, हे ठरवता येईल. त्याचबरोबर मंगळावरील इतर संभाव्य ठिकाणांची तुलना केली जाईल. चीनसह इतर देशांनीही अशा मोहिमा जाहीर केल्या आहेत, तर भविष्यातील मानवी मोहिमा थेट शोधाची नवी संधी देऊ शकतात.

मंगळावर सजीवांच्या अस्तित्वाचे पुरावे मिळाले, तर त्याचे परिणाम अनेक पातळ्यांवर महत्त्वाचे आहेत. तिथले जीवन सूक्ष्मजीवांपुढे उत्क्रांत झाले होते का, गुंतागुंतीच्या परिसंस्था तिथे उभ्या राहिल्या होत्या का, याचा शोध घेता येईल.

## कॅप्री ग्लोबल कॅपिटलकडून ४०० कोटींपर्यंतच्या सुरक्षित, अपरिवर्तनीय रोख्यांची सार्वजनिक विक्री




कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेड (कंपनी) ने १,००० दर्शनी मूल्याच्या सुरक्षित, मानांकित, सूचिबद्ध, विमोचनयोग्य अपरिवर्तनीय रोख्यांची (एनसीडी किंवा रोखे) सार्वजनिक विक्री जाहीर केली आहे, ज्याची रक्कम २०० कोटी (बेस इश्यू साईज) आहे, ज्यामध्ये जास्त भरणा झाल्यास ४०० कोटीं (इश्यू) पर्यंतच्या रकमेपर्यंत (ग्रीन शू ऑप्शन) ओव्हरसबस्क्रिप्शन राखण्याचा पर्याय आहे.

या रोखे विक्रीचे ट्रस्ट इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून व्यवस्थापन पाहिले जात आहे.

कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक राजेश शर्मा म्हणाले, आम्हाला आमच्या एनसीडीच्या सार्वजनिक विक्रीची घोषणा करताना आनंद होत आहे. आमची कंपनी ही एक वैविध्यपूर्ण रिटेल-केंद्रित प्रणालीगत महत्त्वाची ठेवी न स्वीकारणारी बँकेतर वित्तीय कंपनी (एनबीएफसी) आहे, जी एमएसएमई कर्जे, गृह कर्जे, सुवर्ण कर्जे आणि बांधकाम वित्त यासारख्या चार प्राथमिक कर्ज विभागांद्वारे सुरक्षित आणि तारणयुक्त कर्जांची विस्तृत श्रेणी प्रस्तुत करते.

स्थापित उपस्थिती, मजबूत अंमलबजावणी क्षमता आणि भारतीय वित्तीय सेवा क्षेत्रातील १४ वर्षांहून अधिक अनुभवासह, आम्ही भारतातील या विभागांच्या वाढीच्या क्षमतेने सादर केलेल्या संधींचा फायदा घेण्यासाठी चांगल्या स्थितीत आहोत.

एनसीडी मासिक आणि वार्षिक व्याज पर्यायासह वार्षिक ८.५५% ते ९.७०% पर्यंतचे कूपन दर देतात. एनसीडीमध्ये १८ महिने, ३६ महिने, ६० महिने आणि १२० महिने असे चार मुदत कालावधीचे पर्याय उपलब्ध आहेत. खालील तक्त्यामध्ये एनसीडीच्या प्रत्येक मालिकेसाठी कूपन दर आणि कालावधीसह सर्व तपशीलांचा उल्लेख आहे. विक्रीपश्चात हे एनसीडी मुंबई शेअर बाजार अर्थात बीएसईवर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे.

## साताऱ्यातील फुलांचे घर कास पठार



सातारा हा महाराष्ट्रातील एक जिल्हा आहे जो पर्यटकांना त्याच्या सौंदर्य आणि सांस्कृतिक वारशाने मोहित करतो. ऐतिहासिक खुणांपासून ते मूळ धबधब्यापर्यंत, या मोहक प्रदेशात प्रत्येकासाठी काहीतरी आहे.

सातारा जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिम भागात वसलेला असून निसर्गसौंदर्य आणि ऐतिहासिक महत्त्व यासाठी ओळखला जातो. आल्हाददायक हवामान, हिरवळ आणि समृद्ध सांस्कृतिक टेपेस्ट्री यामुळे सातारा जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतो.कास पठार, ज्याला फ्लॉवर ऑफ व्हॅली म्हणूनही ओळखले जाते, हे भारतातील महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात असलेले एक मंत्रमुग्ध करणारे नैसर्गिक आश्चर्य आहे.

हे UNESCO जागतिक नैसर्गिक वारसा स्थळ फुललेल्या फुलांच्या दोलायमान कार्पेटसाठी प्रसिद्ध आहे, लँडस्केपला रंगांच्या नयनरम्य कॅलिडोस्कोपमध्ये बदलते. अंदाजे १२०० मीटर उंचीवर वसलेले हे पठार सुमारे १० चौरस किलोमीटर क्षेत्रफळात पसरलेले आहे आणि निसर्गप्रेमी, वनस्पतिशास्त्रज्ञ आणि छायाचित्रकारांसाठी ते स्वर्ग आहे.

पावसाळ्यात, साधारणपणे, ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात, कास पथर आश्चर्यकारक रानफुले आणि स्थानिक वनस्पतींसह जिवंत होते. पठारावर ८५० पेक्षा जास्त प्रजातींच्या फुलांचे घर आहे, ज्यात अनेक दुर्मिळ आणि धोक्यात आलेले आहेत. पिवळ्या, जांभळ्या, गुलाबी आणि पांढऱ्या रंगाच्या दोलायमान रंगांनी पठारावर रंग भरला आहे, ज्यामुळे एक चित्तथरारक दृश्य तयार होते जे दूरवरून पर्यटकांना आकर्षित करते.

कास पठार त्याच्या फुलांच्या व्यतिरिक्त सह्याद्रीच्या पर्वत रांगा आणि शांत कास तलावाचे आश्चर्यकारक दृश्य देखील देते. कास पठार महाराष्ट्रातील वनस्पतींचे सौंदर्य आणि विविधता दर्शविणारा मनमोहक अनुभव देते.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## बायोडिझेल पंपाच्या टाक्यात गुदमरून दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २६ :

बायोडिझेल पंपाच्या टाक्यात गुदमरून दोन तरुणांचा मृत्यू झाला असून, एक जण अत्यवस्थ झाला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा नजिकच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील नायगांव फाट्याजवळील ही घटना घडली.



गुरुवारी रात्री साडेदहा ते अकरा वाजेच्या दरम्यान ही घटना घडल्याचे वरिष्ठ पोलीस सूत्रांनी सांगितले. गंभीर जखमीवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

मलकापूर शहरातील तिघा युवकांसाठी काल गुरुवारची रात्र अक्षरशः काळ रात्र ठरली. या भीषण घटनेत साजीदखान जलीलखान (वय २२) आणि मुस्ताकखान जब्बारखान (वय ३८) अशी मृतांची नावे आहेत. या घटनेत आरिफखान बशिरखान (वय ३८) हा गंभीर जखमी झाला आहे.

हे तिघेही मलकापूर येथील पारपेठ परिसरातील रहिवासी आहेत. पंचवीस सप्टेंबर च्या रात्री साडेनऊ वाजताच्या आसपास हे तिघे कामावर जाण्यासाठी घरून बाहेर पडले होते. रात्री पावणे अकरा वाजताच्या आसपास पंपावर अपघात घडल्याची माहिती मृतकांच्या नातेवाईकांना देण्यात आली. यामुळे तिघा युवकांच्या घरी एकच आकांत उसळला.

काल मध्यरात्रीच्या सुमारास गंभीर जखमी आरिफखान याला तातडीने नांदुरा येथील आयुष्यमान रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याला अतिदक्षता विभागात ठेवून उपचार सुरू आहेत. तो मृत्यूशी झुंज देत आहे. दरम्यान, दोन्ही मृतदेहांना प्राथमिक तपासानंतर मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले.

आज शुक्रवार सकाळी या घटनेची माहिती सर्वत्र पसरली. यामुळे नांदुरा आणि मलकापूर तालुक्यात खळबळ उडाली या घटनेने नांदुरा व मलकापूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून पारपेठ ( मलकापूर) परिसर हादरला आहे. अपघात कसा घडला याबाबत वेगवेगळे तर्क वितर्क व्यक्त होत आहेत. या पम्प धारकाविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी संतप्त नातेवाईकांकडून होत आहे. घटनेचा तपास नांदुरा पोलीस करीत आहे.

## शालेय परीक्षेदरम्यान मुले तापाने फणफणली!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

उपराजधानीत सध्या व्हायरल आजाराचे प्रमाण वाढले आहे. घरोघरी सगळ्याच वयोगटातील व्यक्ती ताप, सर्दी, खोकला व अंगदुखीने त्रस्त आहेत. त्यात सर्वाधिक रुग्ण वृद्ध, लहान मुले आहेत.

परीक्षा तोंडावर असताना विद्यार्थी आजारी पडत असल्याने पालकांची चिंता वाढली आहे. हवामानातील बदल आणि दिवस-रात्रीतील तापमानातील फरकामुळे संसर्गजन्य आजार पसरत असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

शहरातील सरकारी व खासगी रुग्णालयात बालरुग्णांची गर्दी वाढली आहे. साधारणतः ५ ते १२ वर्षे वयोगटातील मुले जास्त प्रमाणात बाधित होत आहेत. तीव्र ताप, नाक बंद होणे, सतत शिंका येणे, खोकला, थकवा, अशी लक्षणे रुग्णांमध्ये दिसून येत आहेत. मेडिकल, मेयो, डागा या शासकीय रुग्णालयांत रोज सहसा ३०० ते ४०० मुले उपचाराला येत होती. ही संख्या आता तिप्पट होऊन १५०० पर्यंत गेली आहे.

सध्या काही शाळेत प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गाच्या परीक्षा सुरू आहेत तर काहींच्या सुरू होणार असताना मुले आजारी पडत असल्याने पालकांची चिंता वाढली आहे. मेडिकल, मेयो, डागातील डॉक्टरांच्या माहितीनुसार, हा हंगामी व्हायरल आजार आहे. घाबरण्याचे कारण नाही, पण दुर्लक्ष केल्यास न्यूमोनिया किंवा दमा यासारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. वेळेवर तपासणी व योग्य औषधोपचार आवश्यक आहे. मुलांना भरपूर द्रवपदार्थ द्यावेत, जड आहार टाळावा व मास्कचा वापर करावा, असे डॉक्टरांनी सुचवले आहे.

## शेकडो रूग्णांनी घेतला आरोग्य शिबिराचा लाभ



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २६ :

स्वस्थ नारी स्वस्थ परिवार अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र शहापूर येथे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्य प्रेमभाऊ वनवे तर अतिथी म्हणून जि. प. सदस्य आशाताई डोरले भंडारा पंचायत समिती सभापती कल्पनाताई कुर्जेकर, अतिरिक्त जिल्हार आरोग्य अधिकारी डॉ. सचिन चव्हाण, तालुका आरोग्य कार्यकारी डॉ. सुबोध थोटे प्रामुख्याने उपस्थित होते

सदर शिबिरामध्ये ४१६ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यात १०७ पुरुष आणि ३०९ महिलांची दंत तपासणी,, नेत्र तपासणी, शुगर, बीपी एनसीडी, किशोरवयीन मुलींनी तपासणी, मानसिक रोग तपासणी, करण्यात आली. या शिबिरादरम्यान, मोठ्या संख्येने आभा कार्ड, आयुष्मान कार्ड तयार करण्यात आले . याप्रसंगी आयोजित रक्तदान शिबिरात अनेकांनी स्वेच्छेने रक्तदान केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल झोडे, डॉ. श्रेयस फंदे, मुकेश मोटघरे, नितीन वैरागडकर, कु. प्रीती गायधने, कु. शुभांगी बघेले, कु. रंजु मेश्राम, सुषमा शेंडे, कोमल खापर्डे, शितल उईके, अतुल जोध, उमर खान, प्रतीक्षा बाभरे मयूर मोगरे, माधुरी बोरकर, गट प्रवर्तक, आशा व प्राथमिक आरोग्य केंद्र शहापूर येथील सर्व आरोग्य कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ शनिवार ■ दि. २७ सप्टेंबर २०२५ ■

## जड वाहनांना दुपारी १२ ते ४ मिळणार शहरात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

पोलिस उपायुक्त (वाहतूक) लोहित मतानी यांनी शुक्रवारी जड वाहनांच्या चालकांना काहीसा दिलासा देत नवीन अधिसूचना जारी केली आहे. ट्रक मालक-चालकांच्या मागणीला प्रतिसाद देत जड वाहनांच्या प्रवेशाबाबत आधी जारी केलेल्या अधिसूचनेत सुधारणा करण्यात आली आहे. नवीन अधिसूचनेनुसार, आता शहरात कामानिमित्त येणाऱ्या जड वाहनांना दुपारी १२ ते ४ या वेळेत शहराच्या हद्दित प्रवेश दिला जाईल. मात्र त्यांची कमाल वेग मयार्दा ताशी ३० किलोमीटर राहील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करीत मोटार वाहन कायद्यांतर्गत दंड आकारण्यात येईल.

डीसीपी मतानी यांनी स्पष्ट केले की, अनेक ट्रक मालक-चालकांनी शहरात कोणतेही काम नसताना केवळ शॉर्टकट म्हणून किंवा टोल टॅक्स वाचविण्यासाठी शहरातील मार्गांचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे ज्या वाहनांचे काम नागपूरमध्ये आहे त्यांनाच प्रवेश दिला जाईल. यासाठी ट्रक मालकांना त्यांच्या वाहनांची माहिती वाहतूक पोलिसांची वर सादर करावी लागेल. पोलिसांची परवानगी घेतल्यानंतरच वाहने शहरात प्रवेश करू शकतील. आदेशानुसार, सकाळी ६ ते दुपारी १२ आणि दुपारी ४ ते रात्री १० या वेळेत शहरात जड वाहनांच्या प्रवेशास सक्त मनाई असेल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ आणि १७९ अंतर्गत दंड आकारला जाईल आणि त्यांची वाहने तात्पुरती जप्त केली जातील. तथापि, एमआयडीसी परिसरात रिकाम्या झालेल्या वाहनांना दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत शहरातून बाहेर जाण्याची परवानगी असेल. ही सुधारित अधिसूचना पुढील सूचना मिळेपर्यंत लागू राहील.

# संत्रा गुणवत्ता वाढीसाठी नर्सरी कायद्यात बदल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

संत्रा ही विदर्भाची शान असून त्याचा दर्जा अधिक चांगला करून जागतिक बाजारपेठेत निर्यातयोग्य बनवण्यासाठी नर्सरी सक्षम करणे आवश्यक आहे. या दृष्टीने राज्य आणि केंद्र शासनाच्या कृषी धोरणात आवश्यक सुधारणा करण्यासाठी लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय कृषी व फलोत्पादन मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्याशी चर्चा करणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांनी दिली.

'उत्तम नर्सरीचे नियोजन आणि संत्रा उत्पादकांसाठी सुधारित धोरण' या विषयावर आयोजित बैठकीत गडकरी बोलत होते. यावेळी ना. गडकरी यांनी स्पष्ट केले की, संत्र्याचे उत्पादन आणि गुणवत्ता वाढवायची असेल, तर रोगमुक्त व उच्च प्रतीच्या कलमांची



नर्सरी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे यासाठी गांभीर्याने प्रयत्न होणे आवश्यक आहे. सरकार, कृषी विद्यापीठ आणि राष्ट्रीय लिंबू वर्गीय फळ संशोधन संस्था यांनी कार्यपद्धती निश्चित करावी. गडकरी म्हणाले, "स्पेन व इजरायलमध्ये पाहिलेले फलोत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान व नर्सरी व्यवस्थापन आपणही आत्मसात केले पाहिजे. यामुळे उत्पादन व उत्पन्न दोन्ही वाढेल." ते पुढे म्हणाले की, राज्यातील विद्यमान नर्सरी कायद्यात सुधारणा करून दर्जेदार आणि रोगमुक्त रोपवाटिका उभारण्यासाठी धोरण

### नितीन गडकरी मुख्यमंत्री, कृषी मंत्र्यांशी चर्चा करणार

तयार केले जावे असा आग्रह राज्य आणि केंद्र सरकारकडे धरणार आहे.

या बैठकीस ज्येष्ठ कृषी तज्ज्ञ डॉ. सी. डी. मायी, आंबा विषयातील तज्ज्ञ डॉ. भगवानराव कापसे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पंचभाई, फळशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शशांक भराड, जिल्हा कृषी अधीक्षक रविंद्र मनोहरे, राष्ट्रीय लिंबूवर्गीय संशोधन केंद्राचे डॉ. दास, महा ऑरेंजचे अध्यक्ष श्रीधरराव ठाकरे, अॅग्रोव्हिजनचे सुधीर दिवे, डॉ. प्रवीण भालेराव यांच्यासह नर्सरीधारक आणि संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

बैठकीत डॉ. शशांक भराड यांनी नर्सरी संचालनाच्या निकषांबाबत, आवश्यक गुंतवणूक, मातृवृक्ष बागेचे नियोजन, व संत्रा रोपे खरेदी करताना शेतकऱ्यांनी घ्यायची काळजी याबाबत सादरीकरण केले. डॉ. पंचभाई यांनी रूटस्टॉक व पारंपरिक नर्सरींच्या मयार्दा आणि रोगांविषयी माहिती दिली. जिल्हा कृषी अधीक्षक रवींद्र मनोहरे यांनी राज्यातील नर्सरी कायद्यावर सादरीकरण करताना सुचवण्यात आलेल्या सुधारणा स्पष्ट केल्या. डॉ. सी. डी. मायी यांनी कृषी विद्यापीठांनीदेखील दर्जेदार रोपवाटिकेची जबाबदारी घ्यावी, अशी सूचना केली.

या विषयावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी संत्रा उत्पादक, नर्सरीधारक, कृषी विद्यापीठ व शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सुधीर दिवे यांनी प्रास्ताविक केले. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

## नदीजवळ उलटला ट्रक
## आठ जण जखमी



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली येथून मराठी चित्रपटाचे चित्रीकरणाचे साहित्य व कामगारांना घेऊन परतणारा ट्रक शुक्रवारी दुपारी भिवापूरजवळील मारू नदी परिसरातील वळणावर उलटला. त्यात आठ जण जखमी झाले. सर्वांना नागपुरातील मेडिकलमध्ये दाखल करण्यात आले. त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर आहे.

गोष्ट सुरू होती या मराठी चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी हे कामगार आलापल्ली येथे गेले होते. नागपूरकडे येत असताना हा अपघात झाला. घटनेची माहिती कळताच भिवापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयप्रकाश निर्मल इतर सहकारी व होमगार्डसह घटनास्थळी पोहचले. त्यापूर्वी स्थानिक नागरिकांच्या मदतीने अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्याचे काम सुरू झाले होते. जखमींना तातडीने स्थानिक शासकीय रुग्णालय व येथून प्राथमिक उपचारानंतर नागपुरातील मेडिकल रुग्णालयात हलवले गेले. चालकाने दिलेल्या माहिनुसार, पुलाच्या तीव्र वळणावर त्याचे ट्रकवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक उलटला. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, मारू नदीच्या पुलाजवळ या महिन्यातली ही तिसरी दुर्घटना आहे. भिवापूर पोलिसांनी या पुलाला अपघातप्रवण ठिकाण म्हणून आधीच चिन्हांकित केले आहे. पोलिसांकडून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) पुलाच्या तुटलेल्या रेलिंगची दुरुस्ती करण्याबाबत माहिती दिली होती. जखमी कामगारांमध्ये गोविंद रामजी रघुटे (३५), आकाश मनोज यादव (२७), जावेद शेखरमाजन मन्सुरी (२९), हरीश कुवेरगन माहेर (३४), बसंत रामसिंग देहरिया (४७) आणि इतर सर्व रहिवासी छिंदवाडा, अभिषेक शिवप्रसाद यादव (२२) रा. सिवनी, मध्यप्रदेश, अनुप कुमार राजेंद्र प्रसाद महंतो (३८) रा. बिहार आणि आनंद देवबंद रॉय (३५) रा. विरार, मुंबई यांचा समावेश आहे. पोलिसांकडून सदर राष्ट्रीय महामार्गावर अपघात होत असून त्याची कारणे कळवली गेली होती. सोबत दुरूस्तीची विनंतीही केली गेली होती.

# काँग्रेस आमदार ६ महिन्यांचे मानधन पूरग्रस्तांना देणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

राष्ट्रवादी काँग्रेस पाठोपाठ भाजपनेही आपल्या आमदारांना एक महिन्याने मानधन पूरसग्रस्तांसाठी देण्याचे आवाहन केले आहे. काँग्रेस विधिमंडळपक्षाचे नेते विजय वडेट्टीवारांनी मात्र सहा महिन्यांचे मानधन मुख्यमंत्री सहायता निधीत देण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. उद्याच मुख्यमंत्र्यांना यासाठी पत्र देणार आहे. भाजप आणि काँग्रेसच्या आमदारांनी सहा महिन्याचे मानधन द्यावे असे आवाहन करून वडेट्टीवारांनी सर्वांचे टेंशन वाढवले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील



तटकरे यांनी पत्र काढून एक महिन्याचे वेतन आमचे आमदार शेतकऱ्यांच्या

### विजय वडेट्टीवार यांची घोषणा

मदतीसाठी दिणार असल्याचे जाहीर केले आहे. भाजपचे नेते आणि महसूलमंत्री यांनी एक महिन्यांचे मानधन देण्यात येणार असल्याचे सांगितले. आमचे आमदार, खासदार आणि कार्यकतेर्सुद्धा मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र वडेट्टीवारांनी थेट सहा महिन्यांचे वेतन देतो असे सांगून सर्वच आमदारांना कामाला लावले आहे.

मदतीबाबत राज ठाकरे यांचे काय म्हणणे आहे हे मला माहिती नाही. मात्र किमान ५० हजार रुपये या प्रमाणे हेक्टरी मदत केल्याशिवाय या संकटातून शेतकरी सावरला जाणार नाही ही वस्तुस्थिती आहे. यावर्षी पावसाने कहर केला.

दरवर्षी पुराचा फटका चंद्रपूर शहराला बसतो. केवळ थातूरमातूर नदीचा खोलीकरण केले जाते. सुरक्षा भिंत बांधली गेली असती तर चंद्रपूर शहराचा पुराचा धोका टाळता आला असला असेही ते म्हणाले. आम्ही शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जिल्हा जिल्ह्यात मोर्चे काढू, इतकी भयावह परिस्थिती सध्या आहे. याची गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने मदत केली पाहिजे.

## विदर्भ तेलीसमाज महासंघाची नियोजन बैठक आज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

ओबीसीच्या अस्तित्वासाठी सकल ओबीसी महामोर्चा दि. १० ऑक्टोबर २०२५ ला नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. त्या मोचार्ला विदर्भ तेली समाज महासंघाचे समर्थन असून मोर्च्या मध्ये तेली समाजाचा व्यापक सहभाग वाढवण्यासाठी नियोजनपर बैठक शनिवार २७ सप्टेंबर २०२५ वेळ सायंकाळी ५-०० वा.स्थळ सेवादल महिला महाविद्यालय, सक्करदरा चौक नागपूर येथे आयोजित केली आहे. अलिकडे ओबीसी आणि मराठा आरक्षणाच्या धुमश्चक्रीत मराठा आरक्षण लागू करण्याच्या प्रयत्नात ओबीसी वर अन्याय होण्याची दाट शक्यता आहे. तरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी न चुकता उपस्थित राहावे.

## चोरीच्या सोन्यासह दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

चोरी प्रकरणात वाठोडा पोलिसांनी दोघांना अटक केली. मोहम्मद शारीक मो. युनूस (२५) रा. कामठी आणि शोएब मो. शकील (३६) रा. आझाद कॉलनी, वाठोडा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून ७ तोळे दागिने जप्त करण्यात आले. दोन्ही आरोपींना गुरूवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना २ दिवस पोलिस कोठडी सुनावली.

पोलिस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपी शारीक आणि शोएब या दोघांनी वाठोडा परिसरात चोरी केली होती. या प्रकरणी १४ संप्टेबरला वाठोडा ठाण्यात तक्रार करण्यात आली. वाठोडा पोलिस आरोपींचा शोध घेत होते. दरम्यान पोलिसांनी कलीम कबाडी उर्फ कलीम खान याच्या घराची झडती घेतली. कलीमच्या घरून एक पिस्तूल आणि तीन काडतूस जप्त केले. आरोपी कलीमची चौकशी केली असता शोएब त्याच्याकडे काम करत असल्याची पोलिसांना माहिती मिळाली.

अधिक चौकशीत शोएबने त्याचा मित्र शारीक सोबत मिळून वाठोडा परिसरात चोरी केल्याचे सांगितले. पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारे दोघांच्याही मुसक्या आवळल्या. दोघांकडून जवळपास ६ लाखांचे दागिने जप्त केले. दोन्ही आरोपींना २७ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक हरिषकुमार बोराडे यांच्या नेतृत्वात उप-निरीक्षक पवार, स्वप्निल राउत, अश्विन बडगे, सुनील वानखेडे, रोशन सहारे, प्रफुल वाघमारे, मिलिंद ठाकरे, जितेंद्र मनगटे आणि कैलास चकोले यांनी केली.

## अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्यासह महावितरणला एनर्जी लिडरशिप अवॉर्ड




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाच्या विद्युत क्षेत्रामध्ये विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना वैयक्तिक गटात वर्ष 2025 साठी वूमन इन एनर्जी अवॉर्डने तर कंपनी गटात महावितरणला एनर्जी कंपनी (पॉवर) अवॉर्डने नवी दिल्ली येथील राष्ट्रीय एनर्जी लिडरशिप शिखर परिषदेत गुरुवारी (दि. 25) गौरविण्यात आले. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी या सन्मानाबद्दल अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आणि सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

केंद्रीय नवीन व नवीकरणीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक आणि सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्याहस्ते अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. इकॉनॉमिक टाइम्सच्या वतीने आयोजित दोन दिवसीय वार्षिक शिखर परिषद 2025 मध्ये ऊर्जा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा, खाण, पर्यावरण, वन आणि हवामान बदल आदी क्षेत्रातील सुमारे 500 राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींची उपस्थिती होती. या परिषदेत अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे महाराष्ट्रातील वीजक्षेत्राच्या सादरीकरणासह विशेष व्याख्यान झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ऊर्जा परिवर्तनातून सर्व वीजग्राहकांसाठी फायदेशीर आमुलाग्र सुधारणांना वेग दिला आहे. त्यामुळे वीज दरात प्रथमच घट झाली असून येत्या पाच वर्षांत ते आणखी कमी होत जाणार आहे. जगातील सर्वात मोठ्या 16 हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे.

## शहरातील बनावट डॉक्टर, वकील आणि चार्टर्ड अकाउंटंटचा नापाक व्यवसाय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

वकील, चार्टर्ड अकाउंटंट आणि डॉक्टर हे समाजाचे महत्त्वाचे सदस्य आहेत आणि समाजाच्या विविध पैलूंमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. वकील न्यायव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात, चार्टर्ड अकाउंटंट आर्थिक सल्ला देतात आणि डॉक्टर आरोग्य सेवा देतात.

या व्यावसायिकांना समाजासाठी महत्त्वाचे मानले जाते आणि त्यांच्या कामाचे मूल्य आहे. ते त्यांच्या क्षेत्रातील कौशल्य आणि ज्ञानाने समाजाची सेवा करतात आणि समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतात.

शहरातील काही फसवे व्यक्ती डॉक्टर, वकील आणि चार्टर्ड अकाउंटंट म्हणून काम करून लोकांची फसवणूक करत आहेत. हे फसवे व्यक्ती त्यांच्या कार्यालये आणि घरांबाहेर फलक लावून लोकांना आमिष दाखवतात, त्यांना त्यांच्या जाळ्यात अडकवतात. खोट्या प्रतिष्ठेसाठी अपूर्ण ज्ञान देऊन ते लोकांना फसवतात आणि त्यांच्याकडे पदवी नसते.

या फसव्या व्यावसायिकांच्या पद्धती अतिशय हुशारीने आखल्या जातात. ते त्यांचे कार्यालय मोठ्या होर्डिंगने सजवतात आणि लोकांना आकर्षित करण्यासाठी मोठे दावे करतात. ते लोकांना त्यांच्या जाळ्यात अडकवण्यासाठी विविध युक्त्या वापरतात. तक्रार केल्यास लोकांना ठार मारण्याची धमकी देतात आणि गुंडगिरीचा अवलंब करतात.

### सरकारने आणि संस्थांनी कारवाई करावी

सरकार आणि संबंधित संस्थांनी अशा फसव्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करावी. वकील, डॉ. आणि चार्टर्ड अकाउंटंटच्या संघटनांनीही त्यांच्या सदस्यांचे ऑडिट करावे आणि या व्यावसायिकांच्या नावाचा वापर करून फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करावी.

लोकांनी अशा फसव्या व्यावसायिकांपासून सावध राहावे. कोणत्याही व्यावसायिकांना भेटण्यापूर्वी त्यांची पात्रता आणि अनुभव तपासा. त्यांचे बोर्ड आणि जाहिराती तपासा आणि ते संबंधित संस्थेकडे नोंदणीकृत आहेत का ते पहा. सरकार आणि संबंधित संस्थांकडून अशा फसव्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. अशा फसव्या व्यावसायिकांपासून जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी मोहिमा सुरू केल्या .

## गोलू लिहितकरवर लावला एमपीडीए

**नागपूर:** अनेक वर्षांपासून गुन्हेगारीत सक्रीय गुंड अश्विन उर्फ गोलू सुदेश लिहितकर (२९) रा. रघुजीनगर क्वॉर्टर, सक्करदरा याच्याविरुद्ध पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी एमपीडीए लावला आहे.

गोलूविरुद्ध सक्करदरा ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी मागणे, जिवे मारण्याची धमकी देणे, जमिन किंवा घरावर अतिक्रमण, दंगा, सशस्त्र हल्ला, मारहाण, गुन्हेगारी कट रचणे, गुन्हेगारांना आसरा देण्यासह अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्याला लगाम लावण्यासाठी २०१६ आणि २०२३ मध्येही त्याच्यावर एमपीडीए लावून तुरूंगात डांबण्यात आले होते. मात्र त्याच्यात कोणतीही सुधारणा झाली नाही. तसेच २०२४ मध्ये पोलिसांनी त्याच्याविरुद्ध बीएनएसच्या कलम १२९ (ई) (ग) अन्वये प्रतिबंधक कारवाई करून दोन वर्षांसाठी बंधपत्रही लिहून घेतले होते. त्याने बंधपत्राचे उल्लंघन करून काही दिवसांपूर्वी एका व्यक्तीला शस्त्राच्या धाकावर खंडणी मागून जिवे मारण्याची धमकी दिली होती.

# प्रत्येक नागरिकाने वर्षातून किमान दोनदा जनहितार्थ माहितीच्या अधिकारात माहिती मागावी

■ सुजाता बंडावार
नागपूर, दि. २६ :

> देशातील सर्व नागरिकांनी वर्षातून किमान दोनदा प्रामाणिक हेतू ठेवून माहितीच्या अधिकारात माहिती मिळवावी. यामध्ये त्रयस्थ पक्षाची तसेच व्यक्तिगत गोपनीय माहिती देण्याला अपवाद आहे.जी माहिती खासदार व आमदाराला देता येते तीच माहिती सामान्य नागरिकालाही मिळविता येते.कोरोनाच्या काळात व त्यानंतरच्या काळात येणाऱ्या जवळपास 5500 केसेस पेंडिंग आहेत. ते निकालात काढण्याचे काम सुरू आहे. माहितीचा अधिकार कायद्याची मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली असून माहिती जर योग्य वेळेत मिळत असेल तर गैरव्यवहाराला संधी नाही.
>
> **गजानन निमदेव, राज्य माहिती आयुक्त नागपूर खंडपीठ**

> 1766 मध्ये माहिती अधिकाराचा कायदा करणारा पहिला देश म्हणून स्वीडनला ओळखल्या जाते.भारतामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 1997 ची अंमलबजावणी करून तमिळनाडू हे राज्य माहितीच्या अधिकारावर कायदा करणारे पहिले राज्य ठरले आहे.

1994 मध्ये मजदुर किसान शक्ती संघटनेने माहितीच्या अधिकारासाठी तळागाळात मोहीम सुरू केली. संघटनेने ग्रामीण राजस्थानमधील विकास कामांची व दुष्काळ निवारण कामांसंबंधी नोंदी व हिशेब यांच्या माहितीसाठी 1996 मध्ये राजस्थानमधील ब्यावर येथे आंदोलन उभारले व त्याची परिणिती म्हणून माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात आला. म्हणूनच ब्यावरला माहिती अधिकारी कायद्याची जन्मभूमी असे म्हणतात. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाची या कायद्याच्या अंमलबजावणीत मोठी भूमिका असून त्यानंतर या कायद्याची जनजागृती, व्याप्ती व प्रसार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात झाला. त्याचा परिणाम म्हणून सार्वजनिक प्राधिकरणामध्ये लाखोंनी अर्ज येत आहेत. 28 सप्टेंबर हा दिवस जागतिक माहितीचा अधिकार दिन म्हणून सर्वत्र पाळण्यात येतो. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने जनहितार्थ वर्षातुन किमान दोनदा माहितीच्या अधिकारात माहिती मिळविण्याचे आवाहन राज्य माहिती आयुक्त गजानन निमदेव यांनी केले आहे.

राजस्थानमधील चळवळीची प्रेरणा घेऊन महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार अधिनियम 2002 मंजूर केला. त्यात आवश्यक सुधारणा करण्यासाठी अण्णा हजारे यांनी मोठी चळवळ उभी केली ज्याची परिणिती केंद्र सरकारने 2005 साली लागू केलेल्या माहितीचा अधिकार कायद्यात झाली. यासच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 असेही म्हणतात.

अण्णा हजारे यांच्या प्रयत्नांमुळे सरकारी कामकाजात पारदर्शकता वाढविण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी माहितीचा अधिकार अत्यंत महत्वाच ठरत आहे.

प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामात अधिकाधिक पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण करणे, सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळविता येणे, शासन व त्यांच्या यंत्रणा यांना जनतेला जाब देण्यासाठी उत्तरदायी ठरविणे, माहिती मिळविण्यासाठी इच्छुक असणाऱ्या नागरिकाला विशिष्ट माहिती पुरविण्याची तरतूद करणे. अशा प्रकारे जनतेच्या न्यायार्थ व हितार्थ हा कायदा महत्वाचा ठरत आहे.

## खंडणी मागणारा गुंड गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

कॅफे मालकाला तलवारीच्या धाकावर धमकावून खंडणी मागणाऱ्या गुंडाला कळमना पोलिसांनी अटक केली आहे. मोहम्मद अयूब उर्फ सोनू मोहम्मद शफीक (२७) रा. भवानीनगर, जुनी कामठी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी आनंदसागर विद्यार्थी पांडे (२६) रा. बालाजीनगर, कळमना याचे जुन्या कामठी रोडवर नाका क्र. ४ जवळ बॅक बेंचर कॅफे नावाने रेस्टॉरेंट आहे. गत गुरूवारी सोनू पांडेच्या कॅफेत आला. तलवारीचा धाक दाखवून कॅफे चालवायचा असेल तर ३ हजार रुपये खंडणी मागितली. पैसे मिळाले नाहीतर जिवे मारण्याची धमकी देऊन तो निघून गेला. या प्रकाराने पांडे चांगलाच घाबरला. त्याने घटनेबाबत चूप राहणेच योग्य समजले. मात्र कुटुंबीयांनी धीर दिल्यानंतर त्याने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून सोनूला अटक केली.

३ ऱ्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
चि. स्वर्णिम
अमेय मेटांगळे

शुभेच्छूक :
• अमेय चंद्रशेखर मेटांगळे (पप्पा)
• अश्विनी अमेय मेटांगळे (मम्मी)
• चंद्रशेखर पांडुरंग मेटांगळे (आबा)
• साधना चंद्रशेखर मेटांगळे (आजी)
• अक्षय चंद्रशेखर मेटांगळे (काका)

# कर्तव्यदक्ष व अनुभवी पोलीस अधिकारी बापूसाहेब रोहम यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २६ :

काटोल उपविभागीय पोलिस अधिकारी बापूसाहेब रोहम यांच्या निरोप समारंभाच्या औचित्याने माँ सरस्वती चॅरिटेबल ट्रस्ट व नवरात्र उत्सव मंडळ, सरस्वती नगर, काटोल यांच्या वतीने त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करून भव्य सत्कार करण्यात आला.



कर्तव्यदक्ष व अनुभवी पोलिस अधिकारी म्हणून प्रसिद्ध असलेल्या रोहम साहेबांनी आपल्या दीर्घ सेवाकाळात नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत उपविभागात कायदा व सुव्यवस्था राखण्यात मोलाचे योगदान दिले.

काटोल शहरातील एका मोठ्या सार्वजनिक रॅलीदरम्यान रोहम साहेबांनी आखलेल्या रणनीतिक नियोजनामुळे कोणतीही अप्रिय घटना घडली नाही. नागरिकांच्या सुरक्षेसोबतच प्रशासनाची कार्यक्षमता यावेळी विशेषत्वाने अधोरेखित झाली.

त्यांच्या कार्यकाळात छोट्या-मोठ्या गुन्ह्यांवरील तात्काळ प्रतिसाद व सामुदायिक पोलिसिंगमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला. पूर आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात रोहम साहेबांनी दाखवलेल्या कार्यक्षमतेमुळे शेकडो नागरिकांना वेळेत मदत पोहोचली. या प्रसंगी बोलताना वरिष्ठ अधिकारी व स्थानिक मान्यवरांनी रोहम साहेबांचे अनुभवी मार्गदर्शन हे केवळ पोलिस प्रशासनासाठीच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांसाठीही सुरक्षा व विश्वासाचे प्रतीक ठरल्याचे गौरवोद्गार काढले. त्यांच्या कार्यकाळात उपविभागात सुरक्षा व कायदा-सुव्यवस्थेची भावना अधिक बळकट झाली.

सत्कार समारंभाला नवरात्र उत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बैलवाडामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २६ :

नागपूर तालुक्यातील बैलवाडा ग्रामपंचायत मध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. ग्रामसभेत ग्रामस्थांना अभियानाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. सुशासनयुक्त पंचायत लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन, सक्षम पंचायत स्वनिधी व लोक वर्गणीद्वारे स्वच्छ व हरित गाव निर्माण, यावर चर्चा झाली. मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण, गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदानाद्वारे चळवळ अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत राहणार आहे. उत्कृष्ट ग्रामपंचायत निवडीसाठी जिल्हा व पंचायत पातळीवर गुणांकन पद्धती लागू करणार असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर धारपुरे यांनी सांगितले.

# धानल्यात स्वच्छता अभियानाचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २६ :

तालुक्यातील धानला ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या गावातील नागरिकांनी आपले गाव आपला विकास ही संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी पुढाकार घेत धानला गावाला जोडणाऱ्या मुख्य मार्गापासून ते गावापर्यंत ग्रामस्थांनी एकत्र येत ग्रामपंचायत अंतर्गत माझी वसुंधरा योजने अंतर्गत गावात स्वच्छ व प्लास्टिक बंदी प्रसार दिंडी काढण्यात आली. संपूर्ण गावातून प्रभात फेरी काढून गावातील ठिकठिकाणचे प्लास्टिक गोळा करण्यात आले. हे स्वच्छता अभियान मोठ्या उत्साहात राबविण्यात आले.



दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी अभियानाचा शुभारंभ सकाळी ९ वाजता सरपंच ज्योती सावरकर यांच्या नेतृत्वात करण्यात आला, आज २५ सप्टेंबर २०२५ रोजी माझी वसुंधरा योजने अंतर्गत स्वच्छता अभियानाचा शुभारंभ करण्यात आला असून गावात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करण्याचा समस्त गावकऱ्यांनी एकत्र येत निर्धार केला आहे.

धानला या गावाने या आधीही गावात लोकसहभागातून स्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव, निर्धार चुल युक्त गाव, दारूमुक्त गाव, तंटामुक्त गाव यशस्वीपणे राबवून शासनाच्या विविध पुरस्कारावर शिक्कामोर्तब करण्यात मौलिक भुमिका बजावली आहे. गावाला आतापर्यंत लाखो रुपयाचे पुरस्कार मिळाले. धानला ग्रामपंचायत च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड, फळबाग लागवड करून गावाचा चेहरामोहरा बदलून टाकण्यात मौलिक भुमिका बजावली आहे.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी अनुप रामटेके यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची सखोल माहिती देऊन ग्रामस्थांना आपला गाव आपला विकास करण्यावर भर देण्यासाठी प्रेरित केले असल्याने गावात विविध लोकाभिमुख उपक्रम राबवून अभियान यशस्वी करण्यासाठी गावकऱ्यांनी चांगलीच कंबर कसली आहे. या स्वच्छता अभियानात उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर कृणाल उंदीरवाडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा निशा सावरकर, स्वच्छता अभियान अधिकारी जिल्हा परिषद नागपूर अंजली पाटणकर, सरपंच ज्योती सावरकर, ग्राम अधिकारी अनुप रामटेके, निखिल रोदावकर, आशिष रावडे , मोहन विरखरे, शरद दानोडे, निलेश राखडे, शुभांगी मोडक. अजय हारोडे, मंगेश ठोंबरे, नारायण मेश्राम, संदीप पत्रे, सूर्यकांत रोडे, उमाकांत पत्रे, जितेंद्र डांगरे, दुर्गेश बच्छीरे, त्याचप्रमाणे धानला गावातील सर्व सर्व शिक्षक, आरोग्य अधिकारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, गावातील महिला भजन मंडळ व समस्त ग्राम वासी उपस्थित होते.

# एक पेड माँ के नाम अंतर्गत इको क्लबद्वारा वृक्षदिंडी



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २६ :


दि. २४ सप्टेंबर ला राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ कला महाविद्यालय नवेगाव खैरी द्वारा संचालित इको क्लब व वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पारशिवनी (सामा. वनी.) यांचे संयुक्त विद्यमाने नवेगाव खैरी परिसरात २४ सप्टेंबरला एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षदिंडी काढण्यात आली. यावेळी आयोजित चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या आईसोबत वृक्षारोपण करतानाचे चित्र रंगवून वृक्षारोपणाचा संदेश दिला. पर्यावरणपूरक घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला. नवेगाव, खैरी, बच्छेरा टोला, पेंच कॉलनी परिसरात वृक्षदिंडीच्या माध्यमातून लोकजागृती करण्यात आली.

याप्रसंगी शाळेचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजू बर्वे, प्रमुख पाहुणे वनपरिक्षेत्र अधिकारी किशोर कैलुके, इको क्लबचे समन्वयक शिक्षक साक्षोधन कडबे यांनी उपस्थितांना वृक्ष संवर्धन व संरक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. कार्यक्रमाला वनपाल अनिल राठोड, प्रा. अरविंद दुनेदार, अनिल कोल्हे, दिलीप पवार, प्रशांत पोकळे, सतीश जुननकर, अमित मेश्राम, शैलेंद्र देशमुख, रितेश मैंद, प्रा. मोहना वाघ, अर्चना येरखेडे, साक्षी सहारे, वन कर्मचारी सूरज चोपडा, मनोहर शेंडे, बाळकृष्ण ढोके, गजानन ढोंगे, शालेय कर्मचारी गोविंद कोठेकर, लिलाधर तांदूळकर, मोरेश्वर दुनेदार, राशिद शेख तसेच वैष्णवी महिला भजनी मंडळ यांनी सहकार्य केले. वृक्षदिंडीमध्ये इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# आपल्या उर्जेने हिमालयीन सद्गुरु नागपुरात करणार मंगलमूर्तीचा अभिषेक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

हिमालयीन सतगुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी ध्यानस्थळ नागपुर येथे पुनरआगमन करण्यास सज्ज असून, २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ध्यानस्थली, मध्यभारत समर्पण आश्रम, ठाणा (पादरी), बुटीबोरी-उमरेड रोड, नागपूर मध्ये होणा-या या आध्यात्मिक सत्संगात साधकांना आपली आध्यात्मिक उन्नती साधण्याची एक सोनेरी संधी या ठिकाणी असणार आहे. सतगुरू ची दिव्य उपस्थिति आणि त्यासोबतच



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत, ज्यामुळे हा सोहळा आणि विशेष होणार आहे.

सतगुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचे भांडार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त साधकांनी या सोहळ्याला उपस्थित राहून ज्ञानार्जन करीत आत्मिक आनंदाची अनुभूती घ्यावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे नागपूर शहर हे सतगुरू ची जन्मभूमी आणि गुजरात ही त्यांची कर्मभूमी आहे. सतगुरू आता नागपूरला येऊन पुढील अनेक वर्षांसाठी ऊर्जेचे एक केंद्र स्थापित करणार आहेत. येथे येऊन सर्व साधक या दिव्या ऊर्जा केंद्राच्या सान्निध्यात येणार आहेत.

महानवरात्री अनुष्ठानाच्या शुभारंभासह ध्यानस्थळ नागपूर, मध्यभारत समर्पण आश्रम, बुटीबोरीमध्ये हा अनोखा आध्यात्मिक समारोह होणार आहे. हिमालयीन सतगुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी आपल्या ऊर्जेद्वारे प्राणप्रतिष्ठा करणार आहेत. ही संधी नागपूरकरांसाठी जीवनात फारच दूर्मिळ असणार आहेत. या सुवर्णक्षणांचे साक्षीदार होण्यासाठी नागपूरकरांनी या सोहळ्याला उपस्थिती लावणे गरजेचे आहे. या सोहळ्यात सतगुरू च्या ऊर्जेत स्नान करण्याचा योग साधकांना उपलब्ध होणार आहे.

महानवरात्री अनुष्ठनचा परमोच्च क्षण २ ऑक्टोबर २०२५ ला होणारा पूर्णाहूती समोरह आहे. ध्यानस्थळ नागपूर, मध्यभारत समर्पण आश्रम, बुटीबोरी येथे हजारो साधक या दिव्य कार्यासाठी एकत्रित येणार आहेत.

या ऐतिहासिक समारोहात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहणार आहेत. यानिमित्ताने या सोहळ्याचे महत्व अनेक पटींनी वाढणार आहे.

## खडगावात पं. दीनदयाल उपाध्याय जयंती उत्साहात

**वाडी :** खडगाव येथे एकात्म मानववादाचे प्रणेते, भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक व विचारवंत पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती वृक्षारोपणाच्या उपक्रमाने सरपंच देवराव कडू यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. यानिमीत्ताने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी उपसरपंच किशोर सरोदे, ग्रा.पं. सदस्य भोजराज मांडवगडे , नानाजी ठाकरे, भारतीय जनता पार्टी गोधनी मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष गौरव ठाकरे, तेजस सरोदे, अमोल उइके, सचिन ठाकरे, मयूर ठाकरे, पंकज गोमकर उपस्थित होते.

# कामठी तहसील कार्यालय परिसरात निष्काळजी की दुर्लक्ष?

■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. २६ :

कामठी तहसील कार्यालयात दररोज शहरी व ग्रामीण भागांतून शासकीय जसे संजय गांधी निराधार योजने सारख्या इतर योजनांकरिता, काही शेतीच्या कामाकरिता तर शेती, मकान व प्लॉटच्या खरेदी विक्री संबंधात येत असतात. काही आधार कार्डाच्या इतर कामांकरिता, काही रेशनींगच्या कामासाठी येत असतात.

कामठी तहसील कार्यालय परिसरात पाणी साचून चिखल साचलेला दिसतो. त्याचप्रमाणे तहसील कार्यालयाचे कंपाउंडला लागुन असलेल्या नालीची साफसफाई होत नसल्याने नालितिल पाणी साचून आवागमन करणाऱ्या गेट पासुन या परिसरात पाणी साचून जागोजागी खळगे पडलेले दिसतात. त्यामुळे येथे येणाऱ्या नागरिकांची तारांबळ उडते. वाहने ये जा करतांना नागरिकांच्या कपड्यावर घान व खराब पाणी उडुन कपडे खराब होत असल्याचा संताप करतांना दिसतात.

या तहसील कार्यालय परिसरात लिखा पढ़ीची कामे करणारे यामुळे इक-डे तिकडे अस्ताव्यस्त बसलेले दिसतात. वरील समस्यांचे निवारण करण्या करिता तहसिलदार यांना १४ जूलै २०२५ ला भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने नागपुर जिल्हा अध्यक्ष व जेष्ठ नागरिक सुरेश अढाऊ यांनी लेखी निवेदन दिले. परंतू समाधान न निघाल्या मुळे तहसिलदार साहेबांना दोन तीन वेळा भेटुन स्मरण केले. परंतु आश्वासनांशिवाय काहिच उपयोग झाला नाही. याची दखल घ्यावी अशी नागरिकांची मागणी होत आहे.



# महिन्याला दीडशेवर निपुत्रिक जोडप्यांना अपत्यप्राप्तीचा आनंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

मातृत्वाचा आनंद अवर्णनीय असतो. प्रत्येक स्त्रीला मातृत्व साद घालत असते. काही वेळा वंध्यत्वामुळे काहींना हा आनंद उपभोगता येत नाही. परंतु प्रगत तंत्रज्ञान, औषधांसह आयव्हीएफ उपचारातून वंध्यत्वावर मात करणे शक्य झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञान मातृत्वासाठी वरदान ठरत असून उपराजधानीत दरमहा दीडशे निपुत्रिक जोडप्यांना अपत्यप्राप्तीचा आनंद मिळत असल्याची माहिती बिर्ला फर्टिलिटी अँड आयव्हीएफचे सेंटर प्रमुख डॉ. प्रमोद येरणे यांनी बर्डी येथील सेंटरमध्ये दिली.



आधुनिक तंत्रज्ञानातून मिळालेले यश स्त्री व प्रसुतीरीग तज्ज्ञांनी सत्कार्मी लावले असून उपराजधानीत सुमारे ३० आयव्हीएफ सेंटर असून या केंद्रात एप्रिल २०२४ पासून आजपर्यंत ३०० प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर डॉ. येरणे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आययुआई, आयव्हीएफ या तंत्रज्ञानामुळे मातृत्वाचे सुख लाभून निपुत्रिकांना मिळवून देण्यात येतो. लग्नानंतर दोन वर्षे बाळ न झाल्यास तत्काळ आयव्हीएफ सेंटरमध्ये यावे मात्र मात्र अनेक वर्षे प्रसुतीतज्ज्ञांकडे उपचार केल्यानंतर चाळीशी लोटल्यानंतर सेंटरमध्ये येतात.

लग्नानंतर ऐन उमेदीच्या वयात गर्भधारणा न होणे ही समस्या बनली आहे. तांत्रिकदृष्ट्या जोडप्यात वंध्यत्व असणे ही एक बाब. परंतु तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन, धूम्रपान, मद्यपान यासारख्या व्यसनामुळे महिला आणि पुरुषांना वंध्यत्व येण्याचे प्रमाण वेगाने वाढले आहे. वंध्यत्वासाठी महिला ४५ टक्के तर पुरुष ४० टक्के टक्के जबाबदार आहेत. कॅरिअरच्या मागे धावाधाव करणारी महिला, तर तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन, धूम्रपान, मद्यपान करणाऱ्या पुरुषांत वंध्यत्वाची जोखीम वाढते,यामुळे व्यसनमुक्त राहावे असा सल्ला डॉ. येरणे यांनी दिला.

शहरासोबतच ग्रामीण भागात वंध्यत्वाची समस्या आहे. यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोफत महिला पुरुषांच्या तपासणीसाठी शिबिरांचे आयोजन करण्यात येते. ग्रामीण भागातील निपुत्रिक जोडप्यांसाठी ग्रामीण भागात मोफत शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्यामुळे त्यांच्यासाठी आशेचा किरण असल्याचे डॉ. प्रमोद येरणे यांनी सांगितले.

# रमानगर उड्डाणपुल वाहतुकीसाठी खुला होणार

■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. २६ :

कामठी शहरातील रमा नगर रेल्वे उड्डाणपुलचे रखडलेले बांधकाम शेवटी पूर्ण करण्यांत आले. येत्या सोमवारी २९ तारखेला सकाळी १०,३० वाजता केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपुर जिल्ह्याचे पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुलाचा लोकार्पण सोहळा होणार आहे. या सोहळ्याला माजी राज्य मंत्री अँड. सुलेखा ते कुंभारे ह्यांचीही उपस्थिती राहणार आहे.

मागील सात वर्षापासुन वरील बांधकाम रखडले होते. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या लाखो अनुयायांना ड्रैगन पेलेसला सुलभ व सुरक्षीत जाता यावे. याकरिता अँड. सुलेखा ताई कुंभारे यांनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करत निवेदन दिले होते. २५ सप्टेंबरला आंदोलनाची घोषणा झाली होती.

## एमडीसह तरुणास अटक

**नागपूर :** मानकापूर पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारावर एका तरुणाला मेफेड्रॉन ड्रग्ज (एमडी)सह अटक केली. तापसकुमार अनूपकुमार शर्मा (३८) रा. गोविंद अपार्टमेंट, झिंगाबाई टाकळी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. मानकापूर पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान संत ज्ञानेश्वर सोसायटीतील हॉटेल वेस्टर्नच्या खोली क्र. २०६ मध्ये एक इसम थांबला असून त्याच्याकडे अंमलीपदार्थ असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी हॉटेलमध्ये पोहोचून तापसला ताब्यात घेतले.

# बेलदा परीसरातील अवैध दारूविक्रीविरोधात महिलांचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २६ :

रामटेक तालुक्यातील बेलदा गावातील अवैध दारूविक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी सरपंच स्नेहा उमेश भांडारकर तसेच गावातील महीलांच्या विविध संघटनेने देवलापार पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक नारायण तूरकुंडे यांना दि.२३ सप्टेंबर ला निवेदन देवून दारु बंदी करण्याची मागणी केली आहे.



बेलदा, नवेगाव खुर्द, गोरेघाट या परिसरात मागील काही वर्षापासून अवैध दारूविक्री सुरू आहे. त्यामुळे परिसरातील महिलांना खूप त्रास सहन करावा लागतो. घरातील कर्ते पुरुष रोज दारू पिऊन येतात व महिला, मुलांना त्रास देतात. पैसे जबरदस्तीने घेऊन जातात. त्यामुळे गावातील महिलांची आर्थिक व मानसिक स्थिती खराब होत आहे. दारूबंदीचे पालन करून अवैध दारू विक्रेत्यांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी निवेदन देताना बेलदा ग्राम पंचायतच्या सरपंच स्नेहा उमेश भंडारकर,माजी सरपंच तथा रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उमेश भंडारकर, विशाल भंडारकर, नरेंद्र असवाले, वैशाली कुंभारकर, नरहरि गरद, सुरेश मरकुटे, इंद्र कुमार कुमरे, केशोराव कुमरे, सीमा कुमरे, राजश्री कुमरे, किशोर कुंभारकर, द्रौपदी वरखड़े, सुभाष कुमरे, नगीना कुमरे, सुनीता अडमाची, भगवती सरयाम, सुशीला मरस्कोल्हे, जयवंती सरयाम सह आदी महीला, पुरुष,युवा,वरीष्ठ नागरीक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# साधनाताई आमटे अंगणवाडी येथे पोषण जागरुकता कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २६ :

कांद्री एकात्मिक बाल विकास सेवा योजना साधनाताई आमटे अंगणवाडी क्रमांक १५८ येथे गुरुवार रोजी पोषण अभियान जन आंदोलन अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ता वामन देशमुख, प्रकल्प अधिकारी पारशिवनी किशोर खेडकर, पर्यवेक्षिका अश्विनी ऊईके, कार्यक्रम व्यवस्थापक स्नेहा शहाणे, जेष्ठ अंगणवाडी सेविका शेशीकला बागडे सह आदि मान्यवरांचा हस्ते सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. मान्यवरांनी पोषण आहार बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



मुलांमधील आणि महिलांमधील कुपोषण कमी करणे, गर्भवती आणि स्तनदा मातांना पुरेसे पोषण मिळावे यासाठी प्रयत्न करणे, स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या अन्नपदार्थांमधून पौष्टिक आहार कसा मिळवावा, याबद्दल जागरूकता निर्माण करणे, सकस आहार, निरोगी खाण्याच्या सवयी आणि आरोग्यविषयक पद्धतींना प्रोत्साहन देणे. अशी या कार्यक्रमाची उदिष्टे होती. अंगणवाडीत येणाऱ्या मुलांना व महिलांना पौष्टिक आहाराचे महत्त्व आणि ते कसे मिळवावे, हे समजावून सांगितले. ०-६ वर्षांची मुले, गर्भवती आणि स्तनदा माता यांना आवश्यक असलेले कॅलरीज आणि प्रथिने देणारा पूरक पोषण आहार पुरवला जातो. असे ही मान्यवरांनी आपल्या संबोधनातुन उपस्थितांना मार्गदर्शन केले. परिसरात पोषण जागरूकता रैली काढुन नागरिकांना पोषण आणि आरोग्याचे महत्व पटवुन सांगितले.

कार्यक्रमात पोषण आहार प्रदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन मनिषा वासनिक आणि आभार प्रदर्शन अंगणवाडी सेविका मिना पोटभरे यांनी केले. या प्रसंगी सेविका रेखा मस्के, मंगला कामडे, शोभा सरोदे, लक्ष्मी देशमुख, सुनिता मारबते, प्रभा कारामोरे, पुष्पलता राऊत, सविता बावनकुळे, सुलताना बानो, सुमित्रा वैध, प्रतिषा सुकदेवे, प्रतिभा डोरले, सत्यफुला आष्टनकर सह आदि सेविका, मदतनीस, आशा वर्कर, गरोदर माता,स्तनदा माता प्रामुख्याने उपस्थित होते.

## थोर पुरुषांची यशोगाथा वर्धापन दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

दी बुद्धिष्ट गोल्डन इरा वुमन्स फाउंडेशनच्या थोर पुरुषांची यशोगाथा या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त एक दिवसीय विपश्यना शिबीर आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठान, कामठी रोड, सिद्धार्थ नगर टेका, नागपूर येथे २७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत पार पडणार आहे.या शिबिरात आदरणीय भन्ते ज्ञानज्योती महास्थवीर व भिक्खू संघ, ताडोबा अभयारण्य, चंद्रपूर हे धम्म देशना देतील. तसेच विपश्यना आचार्य नामदेव गेडाम गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसीय विपश्यना शिबीर होणार आहे.कार्यक्रमात जनजागृती व संविधानाच्या महत्त्वावर आधारित लघुनाटिका सादर केली जाणार असून, या नाटिकेत सुनंदा कोचे, डॉ. अर्चना सुखदेव, रेखा लोखंडे, मनीषा राऊत, सोनाली बेहरे, योगिता शेंडे व छाया बेहेरे आपली भूमिका साकारतील. सदर शिबिर सर्वांसाठी खुला असून, ध्यान, शांती व सामाजिक जागरूकतेसाठी ही एक महत्वपूर्ण संधी आहे.

# तथागत ट्रॅव्हल्सला पर्यटकांची पहिली पसंती

तथागत ट्रॅव्हल्सची स्थापना १९७५ मध्ये दिवंगत के.टी. मेश्राम (गुरुजी) यांनी केली होती. मध्यमवर्गीयांच्या बजेटमध्ये धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना प्रवास उपलब्ध करून देण्याचे काम हे फाउंडेशन करते.



जागतिक पर्यटन दिनानिमित्त विशेष लेख

पर्यटकांशी मैत्रीपूर्ण संबंध, आवडीनिवडी राखणे, बजेट-फ्रेंडली प्रवास नियोजन, नाविन्यपूर्ण प्रवास संकल्पना, सुनियोजित तयारी, मनोरंजन आणि शाकाहारी आणि मांसाहारी मेनू यामुळे ही संस्था ग्राहकांमध्ये लोकप्रिय आहे. सध्या, ही एक पर्यटन कंपनी आहे ज्याला आएस आय प्रमाणपत्र, ट्रेडमार्क, कॉपीराइट इत्यादी अधिकार आहेत आणि एलआयसी आणि युको बँककडून अधिकृत ट्रॅव्हल एजंट म्हणून देखील मान्यता मिळाली आहे.

पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल, दै. लोकमत टाईम्सकडून तथागत ट्रॅव्हल्सला "शायनिंग स्टार ऑफ नागपूर" पुरस्कार सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते मा.आ. विजय वडेट्टीवार (विरोधी पक्षनेते महाराष्ट्र) आणि भाजप आमदार डॉ.परिणय फुके यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. "माय एफएम ९४.३" कडून "बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड (ग्लोबल ट्रॅव्हल अँड टुरिझम) सई ताम्हणकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. न्यूज इंडिया २४ कडून "विदर्भ गौरव" पुरस्कार , प्रतीक पांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रेडिओ सिटीकडून मुग्धा गोडसे यांच्या हस्ते विदर्भ आयकॉन पुरस्कार जाहीर करण्यात आला. आणि एम.बी.एस.अमरावतीकडून "धम्मभूषण" पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अमरावतीने तथागत ट्रॅव्हल्सला तथागत ट्रॅव्हल्स पुरस्काराने सन्मानित केले. तथागत ट्रॅव्हल्सने त्यांच्या ग्राहकांना प्रवास-आधी, नंतर पैसे द्या आणि सुलभ हप्त्यांमध्ये पैसे भरण्याचे पर्याय देण्यासाठी वित्तीय कंपन्यांशी करार केला आहे. या आस्थापनाची प्रतिष्ठा पाहता, अनेक लोक त्याच नावाने एसएमएस पाठवत आहेत. या खोट्या संदेशांमुळे ग्राहकांची दिशाभूल होत आहे. आस्थापनेने पर्यटकांना अधिकृत वेबसाइटवर संपर्क साधण्याचे आणि फसवणूक टाळण्याचे आवाहन देखील केले आहे.

तथागत ट्रॅव्हल्स दुकान क्रमांक ७२, राहुल कॉम्प्लेक्स क्रमांक २, बस स्टँड चौक, हॉटेल शिवाला समोर, गणेशपेठ, नागपूर ४४००१८, मोः +९१-९३७३२८६७१५/९५९५६८०५८५ येथे संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

## शिक्षकांच्या सुप्त गुणांना वाव देणारा स्तुत्य उपक्रम : आ. सुधाकर अडबाले

# टीचर्स म्युझिकल ग्रुपचा पुरस्कार वितरण समारोप



▪ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २६ :
शिक्षक केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता त्यांच्या अंगी दडलेले कला, साहित्य, क्रीडा, नेतृत्व, व्यवस्थापन, समाजकार्य यांसारखे सुप्त गुण समाजासमोर आणण्याची एक सुंदर संधी टीचर्स म्युझिकल ग्रुपच्या उपक्रमामुळे मिळाली असून शिक्षकांच्या सुप्त गुणांना वाव देणारा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी केले.

टीचर्स म्युझिकल ग्रुपच्या तीन दिवसीय सुगम संगीताचा पाचवा वर्धापन दिन रविवार २१ सप्टेंबर रोजी पार पडला. त्यावेळी बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. संगीतप्रेमी करीता सस्मरणीय असा हा कार्यक्रम शुक्रवार १९ सप्टेंबर, २० सप्टेंबर आणि २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी सीताबर्डी, नागपूर येथील विदर्भसाहित्य संमेलनाच्या मधुरागंण सभागृहात तीन टप्यात पार पडला. नागपूर शहर, ग्रामीण व इतर जिल्ह्यातील प्रतिभासंपन्न शिक्षकांनी यात आपला सहभाग नोंदविला होता. एकाहून एक अशा श्रवणीय गीतांच्या प्रस्तुतीने रसिक मंत्रमुग्ध झाले होते. यात सहभागी कलाकारांसह काही निवडक संगीत संयोजकांचा सुद्धा सत्कार करण्यात आला.

संचालन शिक्षिका रीना पुरी, रोहित वाघ व सविता रेलकर यांनी तर आभार शिक्षिका माधुरी हुमणे यांनी मानले. टीचर्स म्युझिकल ग्रुपचे अध्यक्ष प्रमोद अंधारे यांच्या मार्गदर्शनात गठित समितीमध्ये संकल्पना, डॉ. अरविंद काळे यांची होती. तर सल्लागार म्हणून डॉ. सुशील गडेकर होते. सचिव प्रा. राजू देशपांडे, कोषाध्यक्ष अल्का लाडे, कार्याध्यक्ष, डॉ. धनंजय वेळूकर, उपाध्यक्ष, नितीन भोळे, श्याम डहाके, सहसचिव, प्रा. खुशाल कोडापे, राजेंद्र नांदुरकर स्वागत समिती माधुरी हुमणे, हेमलता सलामे, प्रा. संजीव सराफ, राजेश धुंडाड तर संगीत संयोजन प्रवीण भिवगडे यांचे होते.

डॉ.नीतू गुप्ता, सुनील भुसे, गोपालसिंग ठाकूर, वीरेंद्र गुफावार, विजय वैद्य, संदीप सराडकर, रोशनी सावरकर, डॉ. मंदा उमाठे प्रा. भारती लोखंडे, कुमुदिनी राघोर्ते अशोक तुक्याल, प्रकाश पिडकलवार, संदीप, डॉ. नसीम, प्रकाश जावळे, सुनीता मुंजेवार, अब्दुल रज्जाक, सुनीता गुफेकर, संगीता आरेकर श्वेता कुरझडकर, आढाऊ, विजया वैद्य, राजेश धुंदाड यांनी अप्रतिम गायन केले. यावेळी विमाशि संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, प्रांतीय कोषाध्यक्ष भुषण तल्हार, महानगर जिल्हा कार्यवाह अविनाश बडे, ग्रामीण जिल्हा कार्यवाह संजय बारकर, महानगर जिल्हा कार्याध्यक्ष अरुण कराळे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज राऊत, लक्ष्मीकांत व्होरा, निलेश खोरगडे होते.

# इंदिराबाई भोसले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापनादिन



▪ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २६ :
येथील राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयात रा.से.यो. स्थापनादिन उत्साहात साजरा करण्यात आला. मार्गदर्शक म्हणून निवृत्त राज्यशास्त्र विभाग प्रमुख व एन एस एस विभाग प्रमुख डॉ. रमेश चौधरी उपस्थीत होते. महाविद्यालयातील नव नियुक्त एन.एस.एस. विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी झाडे सह प्रमुख दिनेश घाटोळ यांच्या संयोजनात प्रस्तुत स्थापना दिन साजरा करण्यात आला. मार्गदर्शक डॉ रमेश चौधरी आपले विचार व्यक्त करतांना म्हणाले, सरकारच्या लोककल्याणकारी योजना सामान्यांपर्यंत पोहचाव्या यासाठी युवकांची भूमिका महत्वाची असते.

त्यासाठी रा.से.यो. हे माध्यम महत्वाचे योगदान देते. सोबतच युवकांच्या कृतीशीलतेतून समर्थ राष्ट्राची निर्मिती होते. आत्मनिर्भर व सशक्त राष्ट्र निर्माण ही आज काळाची गरज आहे असेही ते यावेळी म्हणाले. ऑपिरेशन सिंदूर व सद्यस्थितीत अमेरीकेसारखे राष्ट्र आपल्या सामर्थ्याने जगाला आपल्या अंकित ठेवण्याचा जेव्हा प्रयत्न करते, तेव्हा राष्ट्रीय अस्मीता आपल्या प्रतिष्ठेसाठी शक्तीची साधना करते. ही शक्ती साधना स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी स्वातंत्र प्राप्तीच्या संग्रामात प्रकर्षाने विदीत केली.

प्रसंगी पूर्व कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रविण लामखाडे, डॉ.संजय चव्हाण यांनी केलेल्या विभागातील कार्याचा समुचित गौरव प्राचार्य गजानन मांडेकर यांनी यावेळी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परीचय डॉ. गायत्री कुकडे यांनी केले. संचालन कु.स्नेहा भिवगडे या बी.कॉम. फायनलचे विद्यार्थीनीने तर आभार बी.ए.तृतिय वर्षाची विद्यार्थीनी कु. प्रगती गाडगे हिने मानले. या वेळी महाविद्यालयातील डॉ. कटमुसरे, डॉ. लामखेडे, डॉ.चव्हाण, डॉ.केने, प्रा.पिसे, प्रा.सोमकुंवर यांची ऊपस्थीती होती. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी डॉ. पंकज करंबे, विजय देशमुख, संजय टेकाम, भरत वानखेडे, टेकेश्वर देशमुख यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.

# राज्य मानस सचिवपदी उदय चांदुरकर



▪ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २६ :
महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन जिल्हा सरचिटणीस पदावरून थेट राज्य मानस सचिव पदी उदय चांदुरकर यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हा सरचिटणीस पदावरील उत्कृष्ट सराहणीय कार्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डि एन ई.१३६ ची त्रैमासिक सभा अहिल्या नगर पटेल मंगल कार्यालय येथे पार पडली. ३४ जिल्ल्यातून सर्व जिल्हाध्यक्ष व सरचिटणीस सभेला उपस्थित होते. राज्य कार्यकारिणी रिक्त पदे भरणे करीता नागपुर जिल्हातील म. रा. ग्रामपंचायत अधिकारी युनियन चे जिल्हा सरचिटणीस उदय चांदुरकर यांची राज्य मानद सचिव या पदी नियुक्ती करण्यात आली.

याप्रसंगी राज्य अध्यक्ष निकम साहेब, राज्य सरचिटणीस सुचित घरत, उमेशचंद्र चिलबुले, राज्यअध्यक्ष महासंघ तसेच नागपूर जिल्हाध्यक्ष सुनिल ईचे व जिल्हातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनी अभिनंदन केले. तसेच सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# जिल्हा शालेय सिलंबम स्पर्धेत धर्मराज व शिवशंभू आखाड्यांचा खेळाडूंचे घवघवीत यश



▪ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २६ :
नागपुर कविवर्य सुरेश भट्ट सभागृह येथे जिल्हा शालेय सिलंबम स्पर्धेत धर्मराज शाळेच्या व शिवशंभु आखाड्यांचा खेळाडुंनी गोल्ड मेडल, ब्रॉझ मेडल व सिल्वर मेडल पटकावुन जिल्ह्यात कन्हान, कांद्री, टेकाडीचे नाव रोशन केल्याने नागरिकांन कडुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.

मंगळवार (दि.२३) सप्टेंबर रोजी नागपुर कविवर्य सुरेश भट्ट सभागृहात जिल्हा शालेय सिलंबम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत धर्मराज शाळेच्या व शिवशंभु आखाड्यांचा खेळाडुंनी मुख्याध्यापक प्रकाश डुकरे, उपमुख्याध्यापक मोहन भेलकर, कोच अनिकेत निमजे यांचा मार्गदर्शनात सहभाग घेतला. ९ खेळाडुंनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन विरोधी खेळाडुला पराभुत करुन ७ गोल्ड मेडल, १ ब्रॉझ मेडल व १ सिल्वर मेडल पटकावुन घवघवीत यश मिळवला.

खेळाडु कन्हान परिसरात दाखल होताच नागरिकांन कडुन फटाक्यांची आतिषबाजी करुन आणि मिठाई घालुन खेळाडुंचे अभिनंदन केले. यामध्ये शिक्षक पीटीआय उदयचंद्र भस्मे, विजय पारधी सर, हरीश केवटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या प्रसंगी इंद्रपाल वंजारी, संदीप मेश्राम, हर्षल कोसरे, नैतिक कुंभलकर, आदित्य मांढरे प्रामुख्याने उपस्थित होते.

# काटोल येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न



▪ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २६ :
पंचायत समिती अंतर्गत पारडसिंगा, खानगाव, येनवा व मूर्ती केंद्रांतर्गत सर्व शिक्षकांची शिक्षण परिषद जिल्हा परिषद शिक्षक व प्रशिक्षण हॉल बी .आर. सी काटोल येथे दिनांक 25 सप्टेंबर रोज शुक्रवार ला आयोजित करण्यात आली सदर शिक्षण परिषदेमध्ये चारही केंद्रांतर्गत शंभर शिक्षक उपस्थित होते.

शिक्षण परिषद प्रास्ताविकामधून केंद्रप्रमुख राजू धवड यांनी शिक्षण परिषद घेण्याचा उद्देश, पाच मार्चच्या शासन निर्णयचे वाचन, पायाभूत चाचणी, मुख्यमंत्री समृध्द पंचायत अभियान अंतर्गत शाळा स्तरांवर करावयाच्या कार्यवाही, यू डायसमध्ये भरावयाची माहिती , एक भारत श्रेष्ठ भारत, शिष्यवृत्ती सराव परीक्षा, आकारिक व संकलित मूल्यमापन बाबत माहिती दिली. निपुण महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांची भाषा व गणित पायाभूत साक्षरता साधण्यास कोणती कार्यवाही करावी.

याबाबत आदर्श शिक्षक दामोदर कुटे यांनी मार्गदर्शन केले व डॉ. जयंत नारळीकर गणित विज्ञान अध्ययन समृध्दी कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत प्रात्यक्षिक व मार्गदर्शन घनश्याम भडांगे, कमलेश सोनकुसले व जीवन भेलकर यांनी केले.

शिक्षण परिषद मध्ये केंद्रांतर्गत जीपऊप्रा शाळा दिग्रस येथील मुख्याध्यापिका नंदाताई पाटमासे यांची नरखेड येथे शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती झाल्याबद्दल शाल व श्रीफळ देऊन अभिनंदन करण्यात आले पारडसिंगां कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केंद्रप्रमुख योगेश चरडे यांनी केले.

# कपड्याच्या दुकानात घुसले चोर

### १ आरोपी अटकेत, २ फरार

▪ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
पहाटेच्या सुमारास बडकस चौकाजवळील एका कपड्याच्या दुकानात ३ चोरटे शिरले. शेजाऱ्याने दुकानातून खटपटचा आवाज ऐकून दुकान मालकाला माहिती दिली. दुकानदाराने तत्काळ दुकानात पोहोचून एका आरोपीला पकडले, मात्र त्याचे दोन साथीदार पळून गेले. इश्वर रवी सोनटक्के (२५) रा. वसंतराव नाईक झोपडपट्टी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

न्यू इतवारी मार्गावर कुंभारपुरा येथे राहणाऱ्या पियूष राजू बांगरे (२७) यांचे घरीच तळ माळ्यावर राजलक्ष्मी फॅशन नावाने कपड्यांचे दुकान आहे. वरच्या माळ्यावर ते कुटुंबासह राहतात. पहाटे ४.३० वाजताच्या सुमारास शेजाऱ्याने त्यांना फोन करून दुकानातून आवाज येत असल्याची माहिती दिली. पियूष आणि शेजारी तत्काळ खाली आले. दुकानाजवळ गेले असता शटर मध्यभागातून उचकलेले दिसले. दोघेही आत शिरताच दोन आरोपींनी पळ काढला, मात्र इश्वर दुकानातच लपून राहिला. पियूष यांनी तपासले असता रोख ४० हजार आणि १० साड्या चोरी झाल्याचे लक्षात आले. तसेच लपलेला इश्वरही हाती लागला. पोलिसांनी घटनास्थळ गाठून इश्वरला अटक केली. त्याच्या साथीदारांचा शोध सुरू आहे.

# रामटेक तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेतर्फे शिबिराचे आयोजन




▪ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २६ :
दि. २५ सप्टेंबर जागतिक फार्मसिस्ट दिवसाचे औचित्य साधून रामटेक तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने रक्तदान, रक्ततपासणी, कार्डियाक स्क्रिनिंग आणि अवयवदान या शिबिराचे आयोजन किंमतकर हॉस्पिटलच्या दुसऱ्या माळ्यावर करण्यात आले होते.

यात्रसंगी २९ रक्तदात्यांनी रक्तदान करून कर्तव्याचे पालन केले,४२ जागरूक नागरिकांनी रक्ततपासणी, २३ सजग व्यक्तींनी कार्डियाक स्क्रिनिंग आणि ५० सेवाभावी लोकांनी अवयवदानाचा संकल्प घेतला. रियान मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटलचे संस्थापक डॉ. प्रदीप बोरकर यांच्या कडून इसीजी करून देण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. शिबिराचे उद्धाटन रामटेकातील सुप्रसिद्ध डॉ. दाम्पत्य डॉ. मजुषा व बापू सेलोकर तसेच डॉ.अश्विनी व डॉ. गजेंद्र बरबटे यांनी करून शुभेच्छा दिल्या. अंधश्रद्धेतून बाहेर पडून लोकांनी अवयवदानाचे संकल्प घ्यावे यावर डॉ सेलोकर यांनी भर दिला तर डॉक्टर आणि रुग्णांच्या मधातील जोडणारा केमिस्ट हा सेतू असून त्याची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे वक्तव्य डॉ. बरबटे यांनी केले.

यावेळी रामटेक चे उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांनी शिबिराची प्रशंसा करतांना केमिस्ट संघटना रुग्णांच्या दृष्टीने उत्तम कार्य करत असल्याचे सांगितले. लोकांची रक्ततपासणी, इसीजी करवून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी म्हटले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. मंजुषा सेलोकर,कल्पना किंमतकर,शुभांगी सहारे या महिलांनी सुद्धा रक्तदानाचे कर्तव्य पार पाडले हे विशेष. या प्रसंगी सवलतीचे प्रलोभन दाखवून ऑनलाईन औषधी विक्रीद्वारे रुग्णांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी शासनाने कठोर कायदे करावे यावर लक्ष वेधले. औषधी विक्रेत्यांनी चौका - चौकात मूक निदर्शन करून या विषयी जनजागरण करण्यात आले.

सर्व केमिस्ट बंधूंच्या सहकार्याने शिबिर खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. सर्व शिबिरार्थी करिता जेवणाची सोय रामटेक तालुका केमिस्ट संघटनेतर्फे करण्यात आली होती. याच प्रसंगाला रामटेक होमगार्ड पथक आणि रामटेक केमिस्ट बंधू यांच्या संयुक्त विद्यमाने १०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

# १ ऑक्टोबरला आरक्षण अंमल मेळाव्याचे आयोजन

▪ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा च्यावतीने राष्ट्रीय अध्यक्ष नारायणराव बागडे यांच्या नेतृत्वाखाली पत्र परिषद घेण्यात आली. तेव्हा त्यांनी सांगितले की, येणारा धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्यावतीने आरक्षण अंमल मेळाव्याचे आयोजन टिळक पत्रकार भवन धंतोली नागपूर च्या सभागृहात १ ऑक्टोबर रोजी दुपारी 2 वा. आयोजित करण्यात येणार आहे. या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे, उद्घाटन चंद्रकांत सोनवणे, प्रमुख पाहुणे कृष्णा बेडसे, उद्धव तायडे, दशरथ कांबळे, विकास काटे, प्रा.संध्या रायठक, मंगला बिहारे, डॉ. आशा पारधे, नामदेवराव निकोसे, प्रा.सुधा जनबंधू, राधाबाई पाटील,धमार्जी बागडे, देवेंद्र बागडे हे उपस्थित राहतील. या मेळाव्याचे आयोजक प्रा.रमेश दुपारे सुखदेवराव मेश्राम, राजू पांजरे, प्रकाश कांबळे, जयदेव चिवंडे, बबलू कडवे, शालिक बांगर हे राहणार आहे. मेळाव्यात राज्यातील आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या प्रणित महिला मोर्चा, युवा मोर्चा, विद्यार्थी मोर्चा, कामगार मोर्चाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने मध्य रेल्वेकडून विशेष गाड्यांचा प्रवास

▪ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
धम्म चक्र प्रवर्तन दिन 2025 च्या निमित्ताने, अपेक्षित जास्त प्रवासी गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने प्रवाशांच्या सोयीसाठी आणि आरामासाठी विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे. तिकीटे वळर ॲपद्वारे बुक करता येतील. गाडी क्र. 01215/01216 पुणे-नागपूर- पुणे स्पेशल (02 फेऱ्या) गाडी क्र. 01215 पुणे येथून 01 ऑक्टोबर रोजी 14:50 वाजता प्रस्थान करेल आणि दुसऱ्या दिवशी 07:30 वाजता नागपूर येथे पोहोचेल. गाडी क्र. 01216 नागपूर येथून 02 ऑक्टोबर रोजी 23:00 वाजता प्रस्थान करेल आणि दुसऱ्या दिवशी 16:20 वाजता पुणे येथे पोहोचेल. दौंड कार्ड लाइन, अहमदनगर (अहिल्यानगर), बेलापूर, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जलगाव, भुसावल, मलकापूर, शेगाव, अकोला, मुतीर्जापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा, अजनी. संरचना 16 सामान्य कोच, 02 लगेज-कम-गार्ड ब्रेक वॅन. रेल्वे क्रमांक 01224 नागपूर- नाशिक MEMU स्पेशल रेल्वे क्रमांक 01224 नागपूरहून 02 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी 16.20 वाजता प्रस्थान करेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी 04.15 वाजता नाशिक पोहोचेल.

रेल्वे क्रमांक 01226 नागपूर- नाशिक MEMU स्पेशल रेल्वे क्रमांक 01226 नागपूरहून 03 व 04 ऑक्टोबर रोजी दुपारी 12.00 वाजता प्रस्थान करेल आणि त्याच दिवशी रात्री 23.15 वाजता नाशिक पोहोचेल. थांबे: मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जलगाव, भुसावल, मलकापूर, शेगाव, अकोला, मुतीर्जापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा, अजनी.

गाडी क्र. 01019/01020 सीएसएमटी-नागपूर-सीएसएमटी स्पेशल (02 फेऱ्या) गाडी क्र. 01019 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून 01 ऑक्टोबर रोजी 14:30 वाजता प्रस्थान करेल आणि दुसऱ्या दिवशी 06:10 वाजता नागपूर येथे पोहोचेल. गाडी क्र. 01020 नागपूर येथून 02 ऑक्टोबर रोजी 22:30 वाजता प्रस्थान करेल आणि दुसऱ्या दिवशी 17:20 वाजता उरटळ येथे पोहोचेल. थांबे: उरटळ, दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जलगाव, भुसावल, मलकापूर, शेगाव, अकोला, मुतीर्जापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा, अजनी. गाडी क्र. 01132/01131 नागपूर-अकोला-नागपूर स्पेशल (02 फेऱ्या) गाडी क्र. 01132 नागपूर येथून 02 ऑक्टोबर रोजी 18:40 वाजता प्रस्थान करेल आणि 23:30 वाजता अकोला येथे पोहोचेल. गाडी क्र. 01131 अकोला येथून 03 ऑक्टोबर रोजी 00:20 वाजता प्रस्थान करेल आणि 04:50 वाजता नागपूर येथे पोहोचेल.

# कलश, कावड यात्रा काढून नवरात्र महोत्सवाचा शुभारंभ



कलशाची पुजा अर्चना करून १०८ कलशात जल भरून बीकेसीपी शाळे पासुन महामार्गाने कलश धारी कन्या व महिला आणि कावड धारी पुरुषा सह नवदुर्गेचे नव रूप प्रतिमा, हवन कुंडच्या रथ, भजन, जस मंडळ, डि जे, बँड वाजवित दुर्गे मातेचा जय जयकार करून नाचत

▪ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. २६ :
कन्हान - पिपरी शहरातील प्राचिन दुर्गा माता मंदीर चौक पिपरी येथे सार्वजानिक नवदुर्गा उत्सव मंडळ पिपरी-कन्हानद्वारे कन्हान नदीच्या पावन जल भरुन भव्य कलशधारी महिला, कावड धारी पुरुष, देवीचे नऊ रूपाचे रथ, भजन मंडळ, बँड वाजा, डिजेच्या मधुर आवाजात भव्य कलश, कावड यात्रा काढुन नवरात्र महोत्सवाचा शुभारंभ करून नऊ दिवस आरती, भजन, जस आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून नवरात्र महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

दरवर्षी प्रमाणे सार्वजानिक नवदुर्गा उत्सव मंडळ पिपरी- कन्हान व्दारे प्राचिन दुर्गा माता मंदीर चौक पिपरी येथे पारंपरिक संस्कृती प्रमाणे सोमवार (दि.२२) सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पावन कन्हान नदी पात्रात नदी व गाजत भव्य कलश, कावड यात्रा काढुन महामार्गाने गांधी चौक, नगरपरिषद, कन्हान पोलीस स्टेशन, आंबेडकर चौक होत पिपरी मार्गाने दुर्गा माता मंदीरात पोहचली.

पिपरी मंदीरात या कन्हान नदीच्या पावन कलशातील दुध, दही, जल, पंचअमृताने मातेचा जलअभिषेक करून पुजन व घटस्थापना करून नवरात्र महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. दररोज सकाळ व संध्याकाळ पूजापाठ, महाआरती, भजन, जस, जागरण सह धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून मंगळवार (दि.३०) रोजी अष्टमी महायज्ञ २१ हवन कुंड पूजन, बुधवार (दि.०१) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता पासुन भव्य महाप्रसाद. गुरूवार (दि.२) ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता घट विसर्जन आणि सायंकाळी ७ वाजता रावण दहन करून नवरात्री महोत्सवाची सांगता करण्यात येईल. कन्हान व परिसरातील भाविक भक्तांनी वेळेवर उपस्थित राहुन नवदुर्गा मातेचा आशिर्वाद घेऊन या नवरात्र महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन सार्वजानिक नवदुर्गा उत्सव मंडळाचे अध्यक्ष देवा चतुर यांनी केले आहे.

महोत्सवाच्या यशस्वितेकरिता मंडळाचे राधेश्याम भोयर, माजी नगरसेविक मनोज कुरडकर, प्रशांत मसार, शालिकराम ठाकरे, केसरीचंद पटेल, बाला खंगार, शितल भीमनवार, फजित खंगारे, प्रमोद मोटवानी, अशोक मेश्राम, विशाल येलमुले, विजय खडसे, गंगाधर तिवाडे, दुर्गेश फुलझेले, सारंग कुथे, नंदु येलमुले, सुनिल सचिन खंगार, विशाल ढोमणे, तुषार येलमुले, चापले, कृणाल येलमुले, कृणाल खडसे सह समस्थ पिपरी, कन्हान नगरवासीयांनी कलश, कावड यात्रेत मोठ्या सख्येने उपस्थित राहुन नवरात्र महोत्सव करिता सहकार्य करित आहे.

# हायमास्ट लाईटचे लोकार्पण



▪ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २६ :
येथील नवनीत नगर मधील श्री हनुमान मंदीराच्या प्रांगणात दोन हायमास्ट लाईटचा लोकार्पण सोहळा वाडी नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष नरेश चरडे यांच्या हस्ते माजी उपसरपंच आनंद बाबू कदम, माजी सरपंच नितीन अडसड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी प्रभाकर महाजन, रामदास घोरपडे, वासुदेव कामनापुरे, नंदकिशोर बडवाईक, सतीश लाडे, शरद बोंडे रविंद्र गावंडे, मोहन खंडारे, सुभाष इंगोले, शरद गाठे परिहार मांडवकर, अरविंद वाटकर, कोळजावळे पारधी, तसेच हनुमान मंदिर कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दिव्यांगत्व तपासणी व निदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात आलेल्या दिव्यांग सर्वेक्षणामध्ये अनेक दिव्यांगांकडे युडीआयडी कार्ड नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा दिव्यांगांचे युडीआयडी कार्ड तयार करण्याकरिता मनपाच्या आरोग्य व समाज विकास विभागाद्वारे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या सहकार्याने विशेष दिव्यांगत्व तपासणी व निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. ९ ऑक्टोबरपर्यंत सुरु असलेल्या या शिबिराला शहरातील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. दिव्यांग बांधवांनी या शिबिराचा मोठ्या संख्येत लाभ घ्यावा असे आवाहन मनपाद्वारा करण्यात आले आहे.



दिव्यांग सर्वेक्षणमध्ये युडीआयडी कार्ड पासून वंचित असल्याचे आढळलेल्या अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांगांकरिता पेइंग वार्ड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसर येथे २२ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत ३६१ दिव्यांगांची तपासणी करून त्यांचे युडीआयडी कार्ड तयार करण्यासाठी प्रक्रिया करण्यात आली आहे.

मनपाच्या आशा सेविकांनी झोननिहाय केलेल्या सर्वेक्षणानुसार शहरात एकूण ७० हजार ८८४ पेक्षा अधिक संभाव्य दिव्यांग आहेत. यातील अस्थिव्यंग प्रवर्गात २४ हजार ६३८ संभाव्य दिव्यांग असलेल्याचे निदर्शनास आले असून यापैकी ९४७६ दिव्यांगांकडे युडीआयडी कार्ड आहेत. तर १५ हजार १६२ दिव्यांगांकडे युडीआयडी कार्ड नाही. या सर्व संभाव्य दिव्यांगांची तपासणी करून त्यांना युडीआयडी कार्ड प्रदान करण्याकरिता नागपूर महानगरपालिकेद्वारे टप्प्याटप्प्याने दिव्यांगात्व तपासणी व निदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात ५० वर्षाखालील संभाव्य अस्थिव्यंग दिव्यांगांची तपासणी व निदान करून युडीआयडी कार्ड करिता प्रक्रिया करण्याकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरातील पेइंग वार्डमध्ये हे विशेष शिबिर आहे.

### दिव्यांगांचे युडीआयडी कार्ड तयार करण्यासाठी मनपाचा विशेष पुढाकार

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनात व उपायुक्त डॉ. रंजना लाडे आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांच्या मार्गदर्शनामध्ये सुरु असलेल्या शिबिराला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांच्या मार्गदर्शनात अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांच्या नेतृत्वात डॉ. स्नेहल शंभरकर व त्यांची पूर्ण चमू आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चे प्रकल्प समन्वयक अभिजीत राऊत यांचे सहकार्य लाभत आहे. दिव्यांग बांधव आणि भगिनींच्या सुविधेकरिता शिबिराविषयी मनपाद्वारे एसएमएस पाठविण्यात येत आहेत. याशिवाय अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार यांच्या नेतृत्वात मनपा आरोग्य विभागाच्या चमूकडून फोन करून सदर संभाव्य दिव्यांगांना फोन करून माहिती दिली जात आहे व त्यांना ठराविक तारखेला उपस्थित राहण्याबाबत सांगितले जात आहे. याशिवाय आवश्यक सर्व सहकार्य देखील चमुद्वारे करण्यात येत आहे.

सर्व विभागांच्या समन्वयातून सुरु असलेल्या या शिबिराला संभाव्य दिव्यांगांकडून देखील उत्तम प्रतिसाद मिळत आहे. २२ ते २६ सप्टेंबर २०२५ या ५ दिवसांमध्ये ३६१ दिव्यांगांची तपासणी करून त्यांची युडीआयडी कार्ड करिता नोंदणी करण्यात आली आहे. शिबिरामध्येशासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे औषधवैद्यकशास्त्र, अस्थीव्यंगोपचार, बालरोगशास्त्र, भौतिकोपचार व व्यवसायोपचार विभाग तज्ज्ञांची चमू दररोज सेवा देत आहेत. ९ ऑक्टोबर पर्यंत शनिवार, रविवार आणि सुट्टीचे दिवस वगळता हे शिबिर सकाळी १० ते दुपारी १२.३० या वेळेत सुरु राहणार आहे.

# करंट लागून तरुण शेतमजूराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २६ :



खुमारी शिवारात येत असलेल्या शेतात फवारणी करण्यासाठी गेलेल्या एका तरुण शेतमजुराला जिवंत विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना दि. २४ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास घडली.याच आधारे रामटेक पोलिसांनी शेतमालकावर गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार,तलाठी सा.जा क्रमांक २५ मधील खुमारी हद्दीत येत असलेली सर्व्हे क्रमांक ४५/२ ही शेती अंकित लीलाधर धानोरे यांच्या मालकीची आहे.बोरडा (सराखा) येथील शेतमजूर राघो जेठीराम नारनवरे वय ३८ वर्षे, हे गावातील काही इतर मजुंसोबत धानोरे यांच्या शेतात फवारणीचे काम करायला गेले होते. फवारणी करीत असतांना धानोरे यांनी राघो नारनवरे यांना आवाज दिला व दूर अंतरावर लावण्यात आलेल्या मिटरमधून अंदाजे १०० ते १५० मीटरपेक्षा जास्त अंतरावर असलेल्या झोपडीत लाईट लावण्याकरिता वायर नेण्यास सांगितले. सांगितल्याप्रमाणे राघो यांनी लाकडी बल्लीवरून वायर नेण्यास सुरुवात केली असता तो वायर ठिकठिकाणाहून कट असल्याने राघोला जोरदार धक्का बसला. यातच त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

उपस्थित शेतमजूरांनी मृतकाला तात्काळ उपजिल्हा रुग्णालय रामटेक येथे आणले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.रामटेक पोलिसांनी तात्काळ उपजिल्हा रुग्णालय गाठले व पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदन करण्याकरिता शवविच्छेदन केंद्रात पाठविले. शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी बोरडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

या अनुषंगाने मृतकाचे चुलत भाऊ संभा नारनवरे यांच्या तक्रारीवरून धानोरे यांनी विद्युत प्रवाह चालू असतांना व विद्युत तारेचा स्पर्श होऊन कुणाचाही मृत्यू होऊ शकतो असे माहित असूनही मृतकाला काम करायला लावल्यास त्याचा मृत्यू झाला असून राघो यांच्या मृत्यूला शेतमालक जबाबदार असल्याने रामटेक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास रामटेक पोलीस करीत आहे. मृतक राघो यांच्या पश्चात पत्नी,मुलगी (१२ वर्ष), मुलगा (७ वर्ष) व म्हातारे वडील असा आप्तपरिवार आहे.राघो हे घरातील एकमेव कमावणारे व्यक्ती असल्याने अचानक अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.या संपूर्ण घटनेने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिवार उघड्यावर आला.

## ठकबाजांचा विधवेला १.१० कोटींचा चुना

**नागपूर :** म्युच्यूअल फंडमध्ये पैसे गुंतवून बक्कळ नफा कमावण्याचे आमिष दाखवून एका ठकबाजाने पत्नी व भावासोबत मिळून एका विधवा महिलेची तब्बल एक कोटी १० लाख ९० हजार रुपयांनी फसवणूक केली. हा प्रकार कोतवाली पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी वर्षा मंगेश ठाकरे (३९) रा. रामजी निवास, दसरा रोड, महालच्या तक्रारीवरून तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. राम जगजीवनदास वसानी (४३), सेजल राम वसानी (४३) दोन्ही रा. साई प्लाझा, छापरूनगर आणि नरेश जगजीवनदास वसानी (५४) रा. व्यंकटेशनगर, नंदनवन अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी मुख्य आरोपी राम याला अटक केली असून न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी वर्षा यांचे पती कळमना मार्केट येथे धान्याचे दलाल होते. २०२३ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांनी मृत्यूपूर्वी विम्याच्या दोन पॉलिसी काढल्या होत्या. त्यांच्या निधनानंतर वर्षा यांनी विमा कार्यालयात क्लेम केला. त्यांना व त्यांच्या मुलाला विम्याची १ कोटी १० लाख ९० हजारांची रक्कम मिळाली. आरोपी नरेश हा मंगेशकडे काम करायचा. लेखाजोखा सांभाळण्याचे त्याच्याकडे काम होते. त्यामुळे वर्षा त्याला चांगल्यानी ओळखत होत्या.

# २८ सप्टेंबर रोजी संघगीत संग्रहाचा लोकार्पण सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

असंख्य भारतीयांच्या हृदयात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या संघगीतांनी आजवर मंत्रशक्तीचे कार्य केले आहे. यापैकी काही निवडक संघगीत ख्यातनाम गायक-संगीतकार शंकर महादेवन यांनी नव्याने संगीतबद्ध केली असून ती त्यांनी गायिली देखील आहेत. नव्या संगीताचा साज चढलेल्या या संघगीत संग्रहाचे लोकार्पण रविवार, दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वा. कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे.

खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूर द्वारे आयोजित या विशेष सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक प. पू. डॉ. मोहन भागवत यांच्या शुभहस्ते या संघगीत संग्रहाचे लोकार्पण होणार आहे. कार्यक्रमाला शंकर महादेवन स्वतः उपस्थित राहणार असून गीते यावेळी सादर करतील.

या सोहळ्यास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विशेष उपस्थित राहणार असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

या अद्वितीय सोहळ्याला रसिकांनी आणि संघप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. सुरक्षेच्या दृष्टीने निमंत्रण पत्रिका सोबत आणावी. तसेच, कार्यक्रम सुरू होण्याच्या किमान मिनिटे आधी आपापले स्थान निश्चित करावे, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## दीड लाखाच्या मालावर डल्ला

**नागपूर:** अज्ञात चोराने एका हार्डवेअरच्या दुकानात प्रवेश करून ड्रॉव्हरमधील दीड लाखाची रोकड चोरून नेली. ही घटना अजनी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी महावीर जगन्नाथ गुरारीकर (६५) रा. श्रीनाथ साईनगर, ओमकारनगर चौक, मानेवाडा रिंगरोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

महावीर यांचे घरीच तळमाळ्यावर पेंट व हार्डवेअरचे दुकान आहे. बुधवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास ते दुकानाला कुलूप लावून वरच्या माळ्यावर आपल्या घरी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने शटर मध्यभागातून उचकवत त्यांच्या दुकानात प्रवेश केला. ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली १ लाख ५० हजार ६०० रुपयांची रोकड चोरून नेली.

## विदर्भाची सृष्टी झळकणार मोठ्या पडद्यावर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :



दंतवैद्यक क्षेत्रातून अभिनयाकडे वळलेली सृष्टी विजय बाहेकर लवकरच मराठी चित्रपटसृष्टीत झळकणार आहे. गोंदियात जन्मलेली व वाढलेली सृष्टी आता आपल्या पहिल्या मराठी चित्रपटातून प्रेक्षकांना भेटणार आहे. छबी हा चित्रपट २६ सप्टेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे.

अद्वैत मसरकर दिग्दर्शित व जया चेडा निर्मित या चित्रपटात मकरंद देशपांडे, समीर धर्माधिकारी, शुभांगी गोखले, जयवंत वाडकर, संजय कुलकर्णी, राजन भिसे, ध्रुव चेडा, लीना पंडित, अनघा अतुल यांच्यासह सृष्टी महत्त्वाची समांतर प्रमुख भूमिका साकारणार आहे. चित्रपटाचे संगीत रोहन-रोहन यांनी दिले आहे. सृष्टीने यापूर्वी शिवा, तुमची मुलगी काय करते, जय जय स्वामी समर्थ आणि करण गुन्हाला माफी नाही या मालिकांमधून अभिनयाची छाप पाडली आहे. आता ती मोठ्या पडद्यावर पदार्पण करत आहे. सृष्टी म्हणाली, ह्माझा पहिला चित्रपट म्हणजे माझ्यासाठी एक मोठं स्वप्न साकार झाल्यासारखं आहे.आई-वडिलांच्या पाठिंब्यामुळेच मी इथपर्यंत पोहोचले. अशी माहिती प्रसिध्दी पत्रकारे देण्यात आली.

# वीज चोरीची एफआयआर प्रक्रिया कठोर

## स्मार्ट मीटरिंगवरही विशेष लक्ष ठेवण्याचे कार्यकारी संचालकांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :



महावितरणच्या कार्यकारी संचालक (दक्षता व अंमलबजावणी) श्रीमती अपर्णा गिते (म.पो, से.) यांनी वीज चोरीच्या प्रकरणांमध्ये त्वरित, नियमानुसार आणि अत्यंत कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. नागपूर प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेल्या दक्षता व अंमलबजावणी विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना त्या बोलत होत्या.

या बैठकीला नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक (दक्षता व अंमलबजावणी) सुनील थापेकर, तसेच नागपूर विभागातील सर्व भरारी पथके व क्षेत्रीय दक्षता युनिटचे प्रमुख उपस्थित होते.

गिते यांनी भरारी पथके आणि क्षेत्रीय दक्षता युनिट्सच्या कामगिरीचा यावेळी सखोल आढावा घेतला आणि वीज चोरीच्या प्रकरणांत 'एफआयआर' दाखल करण्याच्या पद्धतीत महत्त्वाचे बदल सुचवले. वीज चोरीच्या प्रकरणांची 'एफआयआर' केवळ ऑनलाइन न नोंदवता, सोबतच तातडीने ऑफलाइन नोंदवणे आवश्यक आहे. मागील आर्थिक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या 'एफआयआर' कायदेशीर प्राधिकरणाच्या मदतीने त्वरित दाखल करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. आरोपीचा मागोवा घेण्यासाठी आधार आणि मतदार ओळखपत्रासारख्या अचूक पत्त्याच्या पुराव्यांचा 'एफआयआर'मध्ये वापर करणे अनिवार्य असल्याचेही अपर्णा गिते यांनी यावेळी सांगितले.

चोरीच्या प्रकरणांचा मागोवा घेण्यासाठी आणि योग्य पाठपुरावा करण्यासाठी 'ई-कोर्ट ॲप' वापर करण्यासोबतच वीज चोरीच्या प्रकरणांत प्रभावीपणा वाढवण्यासाठी, तसेच केस तपासणीपासून ते निकालापर्यंत पद्धतशीर दृष्टिकोन ठेवण्यासाठी मागील न्यायिक निर्णय आणि विद्युत कायदा, 2003 च्या कलम 135अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांचा सखोल अभ्यास करण्याचे आवाहन करण्यात आले. भरारी पथकाने दाखल केलेल्या न्यायनिवाड्यावर चर्चा करून, सर्व पथकांना त्या प्रकरणाचा अभ्यास करण्याची सूचना यावेळी त्यांनी केली.

'एफआयआर'सह चोरीचा जप्त केलेला मुद्देमाल संबंधित पोलीस स्टेशनकडे तातडीने सुपूर्द करावा. प्रलंबित मुद्देमाल हस्तांतरित करण्यासाठी सविस्तर पत्र जारी करण्याचे आदेश या बैठकीत देण्यात आले. दक्षता विभागाच्या कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि मूल्यांकन पद्धतीत सुधारणा करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला, 'एएमआयएसपी' ने मीटर सीलचा रेकॉर्ड महावितरणसोबत प्रभावी देखरेखीसाठी तातडीने सामायिक करण्याचे निर्देश दिले. शिवाय, भरारी पथकांनी उघडकीस आणलेल्या स्मार्ट मीटर टॅम्परिंगच्या प्रकरणांचा योग्य अभ्यास करण्याची सूचना यावेळी देण्यात आली. वीज चोरी आणि स्मार्ट मीटर टॅम्परिंगच्या प्रकरणांमध्ये शक्य असेल तिथे भारतीय न्याय संहिता कलम 324 चा वापर करण्याची सूचना गिते यांनी केली. कामगिरी सुधारण्यासाठी उच्च-मूल्याच्या वीज चोरीच्या प्रकरणांच्या तपासणीवर विशेष लक्ष देण्याचे आवाहन करतांना त्यांनी अनेक प्रकरणांत वीज चोरीचा मूल्यांकन कालावधी 12 महिने घेतला जात असून, उपलब्ध रेकॉर्ड, सीपीएलनुसार घेतला जात नाही. त्यामुळे वीज चोरीचा कालावधी जिथे निश्चित करता येईल.

# मुसळधार पावसामुळे दुर्गा महोत्सवाची सजावट उद्ध्वस्त



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २६ :

### सरस्वतीनगरात झाड कोसळल्याने रोषणाईचे खांब व साहित्य नुकसानग्रस्त

प्रशासनाने दिलेला मुसळधार पावसाचा इशारा शनिवारी, २६ सप्टेंबरच्या दुपारी अक्षरशः खरा ठरला. अचानक हवामानाचा कौल बदलला आणि काटोल तहसीलमध्ये सुमारे दीड तास मुसळधार पावसासह वादळी वाऱ्यांचा जोरदार तडाखा बसला.

या अवकाळी पावसाने महानवदुर्गा महोत्सवाच्या तयारीवर अक्षरशः पाणी फेरले. विशेषतः काटोल शहरातील सरस्वतीनगर परिसरात रोषणाईदार खांब व सजावटीची साधने पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. वादळी वाऱ्यांसह पडणाऱ्या मुसळधार पावसात अचानक एक मोठे झाड कोसळले. त्या झाडाखालील मंडपातील रोषणाईचे खांब, झगमगणाऱ्या सजावटीच्या लाईट्स व इतर साहित्य मोडीत निघाले. महोत्सवाची सर्व सजावट गडगडून पडली.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, घटना इतकी अचानक घडली की काही क्षण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, माता सरस्वतीच्या कृपेने कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर अपघात झाला नाही. सतत दीड तास कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक रस्ते पाण्याखाली गेले. नाल्यांना आलेल्या उफानामुळे ठिकठिकाणी पाणी साचले. त्यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला व नागरिकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.

सरस्वतीनगर दुर्गा महोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, पावसामुळे सजावटीचे मोठे नुकसान झाले आहे. रोषणाईच्या खांबांची दुरुस्ती व नवे साहित्य बसवावे लागेल. तथापि, त्यांनी ठामपणे सांगितले की, मातेची पूजा व महोत्सव नेहमीप्रमाणे भक्तिभावाने पार पाडला जाईल.

मौसम विभाग व नागपूर/काटोल प्रशासनाने आधीच मुसळधार पावसाचा इशारा दिला होता.

महासागर प्रभाग वार्ता

# कळमना कावळा पेट पुलाखाली अंधार, नागरिक असुरक्षित

प्रदीप पौनिकर,
नागपूर दि. २६

प्रभाग क्र.४ आणि ५ ला जोडणारा कळमना कावळा पेट पुलाच्या खाली लाईट नसल्याने विद्यार्थ्यांची आणि नागरिकांची भीती वाढली आहे.

पुलाच्या खाली लाईट नसल्याने असामाजिक तत्त्वांचे साम्राज्य वाढल्याने येणाऱ्या जाण्याऱ्या विद्यार्थ्यांची आणि नागरिकांची भीती वाढली आहे. परिसरात कोचिंग क्लासेस आणि शाळा असल्याने मोठ्या संख्येने विद्यार्थी रात्री येणे जाणे करतात, त्यामुळे विद्यार्थ्यांची भीती अधिक वाढली आहे. पुलाच्या खाली लाईट नसल्याने असुरक्षितता वाढली आहे.

असामाजिक लोकांच्या साम्राज्य वाढल्याने विद्यार्थ्यांची आणि नागरिकांची भीती वाढली आहे.



पुलाच्या खाली लाईट लावणे आवश्यक आहे जेणेकरून विद्यार्थ्यांची आणि नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित होईल.पुलाच्या आसपास सुरक्षा गस्त वाढवणे आवश्यक आहे जेणेकरून असामाजिक लोकांवर नियंत्रण मिळवता येईल.नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना पुलाच्या खालील भागात सावधगिरी बाळगण्याबाबत जागरूक करणे आवश्यक आहे.

नागरिकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी प्रशासनाची आहे आणि त्यासाठी योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रशासनाने त्वरित कारवाई करून पुलाच्या खाली लाईट लावणे आणि सुरक्षा सुनिश्चित करावी अन्यथा आम आदमी पक्षाचा वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.यावेळी आम आदमी पक्षाच्या वतीने सहाय्यक आयुक्त शत्रूंची यांना निवेदन देण्यात आले. यावेळी प्रदिप पौनिकर किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल, संदीप साखरे, किशोर मौंदेकर, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेककर, हरी निखारे, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, कृष्णा पाठराबे, प्रिती पौनिकर, स्वाती तारवानी, अंशु बिरेवार,अमोल उके, संजू पटले,राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, गोविंदा केळवदकर, अनिल चांदेकर, अरुण गुणारकर, बाबुराव निमजे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कॅनव्हेंशन सेंटरसमोरील परिसरात घाणीचे साम्राज्य

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि. २६

इंदोरा प्रभाग ७ येथील कामठी रोडवर वसलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कॅनव्हेंशन सेंटर हे सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र या प्रतिष्ठित केंद्रासमोरच परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याजवळ प्रचंड घाण आणि दुर्गंधीचे वातावरण तयार झाले असून, यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या घाणीमुळे परिसराचे सौंदर्य आणि पवित्रता दोन्ही धुळीस मिळत असून, याला महावितरण व नागपूर महानगरपालिकेच्या आशी नगर झोनच्या अधिकाऱ्यांची बेपर्वाई कारणीभूत असल्याचा आरोप स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे.सामाजिक कार्यकर्ते राकेश निकोसे, आसिफ़ शेख, बाबू खान, सतीश पाली, निषाद इंदुरकर यांच्या पुढाकाराने सदर प्रकरणी महावितरणचे अधिकारी हेमेन्द्र गौर, विंचुलवार आणि मनपाचे प्रशासनिक अधिकारी प्रदीप सरपाते (अधिक्षक अभियंता) यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. त्यांनी तात्काळ हा परिसर स्वच्छ करून सौंदर्यीकरण करण्याची मागणी अधिकाऱ्यांकडे केली. या परिसरात असलेल्या पुतळ्यांभोवती अस्वच्छता, कचरा व साचलेले पाणी हे केवळ पर्यावरणीय समस्याच नव्हे, तर समाजाच्या महापुरुषांविषयी असलेल्या आदरभावनांनाही धक्का देणारे आहे. म्हणूनच या मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी नागरिक व कार्यकर्ते करत आहेत. महानगरपालिका व महावितरण प्रशासनाने या समस्येचे गांभीर्य ओळखून लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात, अन्यथा व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.



## वाहतुकीला अडथळा ठरणारा रोडवरील म्हशीचा तबेला प्रशासनाचे दुर्लक्ष?



प्रमोद जांभुळकर,
नागपूर दि. २

प्रभाग क्रमांक १, नारा येथील संत ताजुद्दीन सोसायटी परिसरातील मुख्य रस्त्यावर उभारण्यात आलेल्या एका खासगी तबेल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. राकेश यादव आणि देवीलाल यादव यांच्याकडून सार्वजनिक रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या या तबेल्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला असून, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीनेही धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे.

तबेल्यातील म्हशी रस्त्यावर आणि फुटपाथवर मोकळ्या फिरत असतात. त्या रस्त्यावरच मलमूत्र विसर्जन करतात, परिणामी परिसरात तीव्र दुर्गंधी पसरते आहे. रस्त्यावर पडलेला चारा, शेण आणि चिखलामुळे अनेक वेळा दुचाकीस्वार घसरून अपघातास सामोरे जात आहेत. विशेषतः शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या मार्गावरून ये-जा करताना रोजचा त्रास सहन करावा लागत आहे.

नागरिकांनी याबाबत अनेक वेळा तक्रारी करूनही नागपूर महानगरपालिकेचे प्रशासन अद्याप कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाही. सहाय्यक आयुक्तांकडे निवेदन देऊनही परिस्थितीत बदल झालेला नाही. स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, शहरातील नियमांनुसार सार्वजनिक रस्त्यालगत तबेला उभारणे, पशुधन खुले सोडणे आणि सार्वजनिक ठिकाणी घाण करणे हे स्पष्टपणे कायद्याविरोधात आहे. तरीदेखील संबंधित अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष सुरू असून, तबेला धारक बिनधास्तपणे नियम मोडत आहेत. नागरिकांनी एकत्र येऊन महापालिकेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे की, संबंधित तबेल्याची जागा तत्काळ हलवा-वी व सार्वजनिक रस्ता नागरिकांसाठी मोकळा करून द्यावा. लक्ष्मण राहंगडाले, विवेक केदार, रविंद्र मसराम, अशोक जांभूळकर, रोहन मेश्राम, सावन चव्हाण, कृष्णाजी मुडे, रविंद्र चहांदे, राजेश गायसमुद्रे, कार्तिक लारोकर, दीपक गेडाम, शोभा वाघमारे, आकाश बिसेन, दिलेश पटले, निर्मला पटले, दीपक रगडे, शशीकांत जांभूळकर, पूजा गवळी. नागरिकांची मागणी केली आहे रस्त्यावरचा तबेला तत्काळ हटवण्यात यावा,म्हशींच्या मोकाट फिरण्यावर बंदी आणावी, सार्वजनिक रस्त्यावर स्वच्छता आणि सुरक्षितता सुनिश्चित करावी, संबंधित अधिकाऱ्यांवर दुर्लक्षाबद्दल जबाबदारी निश्चित करावी प्रशासनाची भूमिका काय असेल? आता नागरिकांच्या या संतप्त भावना आणि तक्रारींच्या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिका काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.